NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020
YEAR : 44) 15th November 2019 ( No. of Pages 44 ) ( No : 14

# विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतचा संघर्ष

*लेखन*
**प्रा.बी.टी.देशमुख**
*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**वेतन आयोग संघर्ष**
**विशेषांक**

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH, NAGPUR.
## WRIT PETITION NO.7784 OF 2017

**PETITIONER :- (1)** Dr.Archana Devidasrao Bobade, Aged about 49 years, Occupation-Service, R/o Behind IMA Hall, Camp Road, Amravati-444603. **(2)** Mahendra V.Mete, Aged about 46 uyears, OccupationService,R/o 38, Ganediwal Layout, Campt Amravati-444602. **(3)** Vilas Rambhau Thakare, Aged about 60 years, Occupation-Service, R/o 41, Sanjivani Colony, Near Congress Nagar, Old by Pass, Camp, Amravati-444602. **(4)** Mangesh Prataprao Deshmukh, Aged about 46 years, Occupation-Service R/o P.R.Deshmukh, Near Datta Mandir, Vinayak Nagar, Amravati-444603.

**VERSUS**

**RESPONDENTS :- (1)** The State of Maharashtra , Through Principal Secretary, Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai-32. **(2)** Director of Higher Education Maharashtra State, Central Building Pune. **(3)** Joint Director of Higher Education, Amravati Division, Amravati. **(4)** Sant Gadge Baba Amravati University, Amravati, through its Registrar, Amravati. **(5)** Shivaji Arts and Commerce College,Through its Principal, Amravati. **(6)** Matoshree Vimlabai Deshmukh Mahavidyalaya, Through its Principal Amravati. Mr. A.I.Shaikh, counsel for the petitioners. Ms.K.K.Pathak, counsel for respondent no.4. Mr. Ambarish Joshi, AGP for respondent Nos.1 to 3.

CORAM :R.K.DESHPANDE & VINAY JOSHI, JJ.

**DATED : 21.08.2019.**

ORAL JUDGMENT (Per : R.K.DESHPANDE, J.)

**1.** Rule. Rule made returnable forthwith.

**2.** Heard finally by consent of the learned counsels appearing for the parties.

**3.** The State Government has passed an order dated 08.10.2018 clarifying the position and on the basis of decision of this Court in Writ Petition No.1913 of 2013 (Maharashtra Federation of University and College Teachers Organization Vs. The State of Maharashtra and ors.) and other connected matters, decided on 23.01.2019 issued certain directions.

**4.** The petitioners claim salary for 71 days for the month of March 2013, April 2013 and 10 days of May 2013 for not getting the work during the period of boycotting the examination work. It was agreed that the payment for this duration shall be released and accordingly the court directed that the amount be released as per decision taken in the meeting held on 25.09.2018.

**5.** In view of the aforesaid decision and the order passed by the Government dated 8.10.2018, it is not in dispute that the petitioners would be entitled to the relief as is claimed in this petition. **The petition is therefore allowed and the respondents are directed to release the salary of the petitioner for a period of 71 days within a period of six months from today, failing which the amount shall carry interest @ 18% per annum.**

Rule is made absolute in the aforesaid terms.

No order as to costs.

JUDGE JUDGE

---

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**

ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION

**WRIT PETITION NO. 1913 OF 2013**

Maharashtra Federation of University and College Teachers Organization ..Petitioner

**VERSUS** The State of Maharashtra and ors...Respondents

**CORAM : S. C. DHARMADHIKARI & M. S. KARNIK, JJ.**

**DATE : 23rd JANUARY, 2019**

**(For Full Text of this Judgment, Please See Page 9 of 2019 NUTA Bulletin)**

---

# HIGH COURT OF BOMBAY

Case Details : Bench:- Bombay : Presentation Date:-18/10/2019

Lodging No.:-CONPWL/105/2019 Filing Date:-18/10/2019

Main Matter

| | |
|---|---|
| Lodging No.:-WPL/1760/2013 | Reg No.:-WP/1913/2013 |
| Petitioner:- | Maharashtra Federation of University and College Teachers Organization |
| Respondent:- | Saurabh Vijay and 2 Ors. Dhanraj Mane, Rohidas Kale |
| Petn.Adv.:- | Ankit Kulkarni and Bhavan Mhatre |
| District:- | MUMBAI |
| Bench:- | DIVISION |
| Status:- Pre-Admission | Category:-CONTEMPT MATTERS WRIT |
| Act :- | Mah. Universities Act, 1994 |

# विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतचा संघर्ष

### प्रस्तावना

**१.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेपासून तर आज पर्यंत या महासंघाने व महासंघाच्या घटक संघटनांनी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वात व स्वतंत्रपणे उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी जो संघर्ष केला तो शब्दबद्ध केला जावा अशा प्रकारचा विचार सर्वप्रथम "सुटा" संघटनेकडून मांडला गेला असे दिसून येते. 'सुटा'चे माजी अध्यक्ष व महाराष्ट्रातील प्राध्यापक चळवळीतील एक ज्येष्ठ नेते प्रा.एस.जी.पाटील यांनी एका लेखामध्ये हा विचार मांडला. तो शब्दशः पुढीलप्रमाणे:-

"दिनांक २४ एप्रिल, २०११ रोजी मराठा महामंडळ, सांगली येथे 'सुटा'ची जनरल कौन्सिलची बैठक ठेवलेली होती. तसेच प्राध्यापकांचा मेळावाही बोलाविला होता. त्या मेळाव्यास मार्गदर्शन करण्याकरिता 'एम्फक्टो'चे माजी अध्यक्ष व माजी आमदार आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. अध्यक्षस्थानी प्रा.संभाजीराव जाधव होते. प्रा.संभाजीराव जाधवांचे ते प्राध्यापकांच्या मेळाव्याला उद्देशून केलेले शेवटचेच भाषण. कार्यक्रम संपल्यानंतर कोल्हापूर जिल्हा संघटनेचे पदाधिकारी, मी, संभाजीराव जाधव व प्रा.बी.टी.भाऊ प्रथम कोल्हापूरला आलो व नंतर संभाजीरावांबरोबर पूर्वी झालेल्या चर्चेनुसार पन्हाळ्याला एका मित्राच्या बंगल्यावर रात्री मुक्कामाला गेलो. जेवणापूर्वी व जेवणानंतर प्राध्यापक संघटनांपुढील प्रश्नांवर चर्चा झाली. आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला. आमच्या सोबत प्रा.ढमकले हेही होते. त्या वेळेस मी बी.टी.भाऊ व संभाजीरावांना म्हणालो की, "तुम्ही 'एम्फक्टो'ची स्थापना करण्यापासून ते आज तारखेअखेर, त्या संघटनेत कार्यरत आहात. आपण दोघांनीही त्या संघटनेचे अध्यक्षपद भूषविलेले आहे. आज तारखेअखेरपर्यंत 'एम्फक्टो'तर्फे जी सर्व विविध प्रश्नांकरिता झालेली आंदोलने ठरविण्यामध्ये व ती सर्वार्थांनी यशस्वी करण्यात आपणा दोघांचाही सिंहाचा वाटा आहे. तेव्हा आपणा दोघांनाही एक कळकळीची विनंती करतो की, आपण 'एम्फक्टो' संघटनेचा लवकरात लवकर इतिहास लिहून काढावा. जी नवीन पिढी या व्यवसायात आली आहे. त्यांना संघटनेची गरज व महत्त्व या दोन्ही गोष्टी समजतील व त्यांना त्यातून स्फूर्तीही मिळेल. दोघांनीही 'होय' म्हणून प्रतिसाद दिला." *(प्रा.संभाजीराव जाधव शैक्षणिक चळवळीचा मानदंड : प्रा.संभाजीराव जाधव स्मृतिग्रंथ पृष्ठ ११४)*

**२.** प्रा.एस.जी.पाटील यांनी हा जो विचार मांडला त्यापूर्वी काही वर्षे अगोदर असा इतिहास लिहून काढावा याबाबतीत बऱ्याच घडामोडी 'सुटा'च्या पातळीवर झालेल्या होत्या असे दिसून येते. 'सुटा'च्या वतीने दिनांक १२ जून २००५ रोजी 'सुटा'च्या पदाधिकाऱ्यांची एक बैठक कोल्हापूर येथे बोलाविण्यात आलेली होती. या बैठकीमध्ये "**तिसरे टीपण : नेतृत्त्व पात्रता**" या मथळ्याचे प्रा.संभाजीराव जाधव यांनी तयार केलेले एक टीपण प्रसृत करण्यात आलेले होते. या टिपणातील शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :-

"१८. 'सुटा' इतिहास - लेखन : नोव्हेंबर २००५ मध्ये 'सुटा' स्थापन होऊन बरोबर तीस वर्षे पूर्ण होतील. या प्राध्यापक संघटनेच्या इतिहासाचे लेखन आता होणे आवश्यक आहे. पुरेसा कालावधी झालेला आहे. त्या काळातील सक्रिय प्राध्यापक येव्हाना सेवानिवृत्त होत आलेले आहेत. काळ जसजसा जाईल. तसतसा हा इतिहास अधिकाधिक पुसट होत जाईल. **शिवाय, 'सुटा'ची कागदपत्रेही आता क्रमवार, विषयवार लावून झालेली आहेत. लेखन करण्यास दीर्घकाल लागणार आहे. काळ व परिस्थिती अधिक प्रतिकूल होण्याअगोदर हे काम सुरु होणे आणि संपणेही आवश्यक आहे,** निदान पहिला मसुदा तरी तयार होणे जरुरीचे वाटते. हे काम संभाजी जाधव यांना करावे लागणार आहे. असे दिसते. तेंव्हा, सप्टेंबर, २००५ पासून हे काम करण्यासाठी, त्यांना संघटनेच्या दैनंदिन कामातून मुक्त करावे लागेल. व्यक्तिगत प्रकरणे व समस्या, विद्यापीठ/ शासन पातळीवरील वरिष्ठांच्या भेटी/ बैठका / चर्चा, 'प्राध्यापक विश्व' सल्लामसलत, आणि सुटा संघटनेपर्यंतच्या बैठका / चर्चा या सर्वांतून त्यांना ह्या कामासाठी आता मुक्त होणे जरुरीचे आहे. संभाजी जाधव यांचे सध्याचे काम इतर सर्वांनी सांघिकपणे करण्याचे ठरविले पाहिजे, त्याची योग्य रितीने विभागणी करून घेतली पाहिजे. म्हणजे कोठेही पोकळी जाणवणार नाही, कामही अडून पडणार नाही." *(सन २०११ चे नुटा बुलेटीन पृष्ठ ६८)*

**३.** सन २००५ नंतरच्या ५-६ वर्षांच्या काळात प्रा.संभाजीराव जाधव यांना त्या कामासाठी जो निवांतपणा मिळायला पाहिजे होता तसा तो मिळाला नाही असेच पुढच्या घटनाक्रमावरुन दिसून येते. 'सुटा'च्या इतिहास लेखनाबाबत नंतर काय प्रगती झाली? हे कळू शकले नाही. मात्र त्याच दरम्यान (२००५) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेच्या सुरुवातीच्या काळातील इतिहास नमूद असलेला २५ परिच्छेदांचा "**महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एमफक्टो) प्रारंभ व घडामोडी**" या मथळ्याचा प्रा.संभाजीराव जाधव यांनी लिहिलेला एक लेख "**पुक्टो बुलेटीनच्या 'रौप्यसंचित' या विशेषांकात**" **प्रकाशित झालेला आहे. त्यांच्या मागे लागून त्यांच्या हातून हे काम पूर्ण करुन घेतल्याबद्दल 'पुक्टो'च्या पदाधिकाऱ्यांना मनापासून धन्यवाद दिले पाहिजेत.** हा लेख अतिशय माहितीपूर्ण असून तारखा, महिने, वर्ष, घटनांचे संदर्भ, व्यक्तीचे व शासकीय कागदपत्रांचे बिनचूक उल्लेख यांनी हा लेख खचाखच भरलेला आहे. त्यादृष्टीने या लेखाचे वाचन केल्यास त्या लेखाच्या संदर्भसमृद्धीची श्रीमंती लक्षात यायला वेळ लागत नाही.

**४.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी आपल्या व्यावसायिक सेवाशर्तीवर होणारे हल्ले परतवून लावण्यासाठी जो संघर्ष केला, त्याबाबतचे तपशीलवार विवेचन लिहून काढण्याची संधी प्रस्तुत लेखकाला कशी प्राप्त झाली याबाबतीत थोडीशी माहिती देणे मला आवश्यक वाटते. मी माझ्या विद्यार्थी जीवनामध्ये अमरावती येथून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक 'हिंदुस्थान'मध्ये काम करीत माझे विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले होते. सन १९८० मध्ये विधानपरिषदेत सदस्य म्हणून निवडून गेल्यानंतर विधानपरिषदेमध्ये मी जे काम करीत होतो त्याबद्दल दैनिक 'हिंदुस्थान'चे संस्थापक संपादक व ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी श्री.बाळासाहेब मराठे मोठ्या उत्सुकतेने चौकशी करीत असत. सभागृहातील चर्चेची अधिकृत प्रतिवेदने मागवून घेऊन ती शब्दशः दैनिक 'हिंदुस्थान'मध्ये प्रकाशित केली जात असत. बाळासाहेबानंतर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव व माझे मित्र डॉ.अरुण मराठे यांनी दैनिक 'हिंदुस्थान'च्या संपादकत्वाची सूत्रे सांभाळली. सत्यशोधन समितीच्या अहवालाप्रमाणे नागरी पाणी पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेला प्रदेश म्हणजे विदर्भ व सर्वात जास्त अनुशेष असलेले या प्रदेशातील नंबर एकचे शहर म्हणजे अमरावती. प्रश्न पाणी पुरवठ्याचा असल्यामुळे आम्ही काही प्रतिनिधींनी सभागृहामध्ये व सभागृहाच्या बाहेर सुद्धा या प्रश्नाच्या बाबतीत जोरदार संघर्ष केला. हा संघर्ष लिहून काढावा व तो आपण दैनिक

**प्रा. रमेश पाटील, उपाध्यक्ष (अकोला जिल्हा नुटा कार्यकारिणी) तर्फे**
**''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा बुलेटीन'च्या विशेषांकास हार्दिक शुभेच्छा**
शुभेच्छूक : प्रा. रमेश प्र. पाटील, अकोला

'हिंदुस्थान'मध्ये तपशीलवार प्रसिद्ध करू अशी इच्छा डॉ.अरुण मराठे यांनी माझ्याकडे व्यक्त केली. बऱ्याच तयारीनंतर तसे करणे मला शक्य झाले. या घडामोडीतून **'विधानमंडळात आमचे प्रश्न'** हे सदर दैनिक 'हिंदुस्थान'मध्ये दर रविवारी सुरू झाले. या सदराखाली दर रविवारी एक पानभर मजकूर दैनिक 'हिंदुस्थान'मध्ये प्रकाशित व्हायला लागला.

**५.** रविवार, दिनांक १९ जानेवारी, १९९७ रोजी "अमरावती शहराची वाढीव पाणी पुरवठा योजना" या विषयावरील पहिल्या लेखाने ही लेखमाला सुरू झाली. एकूण ७९ आठवडे ही लेखमाला सुरू होती. त्यानंतर डॉ.अरुण मराठे यांनी हा अमरावती पाणी पुरवठ्याचा विषय संपलेला असला तरी हे सदर बंद करू नये अशी इच्छा व्यक्त केली व त्यानुसार 'विधानमंडळात आमचे प्रश्न' हे सदर दर रविवारी दैनिक 'हिंदुस्थान'मध्ये सातत्त्याने प्रकाशित होत राहिले व ते आजही तसेच सुरू आहे. या लेखमालेतून पाणी पुरवठ्याचे प्रश्न, सिंचन प्रकल्पांचे प्रश्न, सिंचन अनुशेषाचे प्रश्न, रस्त्याच्या अनुशेषाचे प्रश्न, कृषी पंपाना वीज पुरवठ्याचे प्रश्न प्रामुख्याने मांडल्या गेले. या लेखमालेच्या आधारावर नुटा बुलेटीनचे अनेक विशेषांक प्रकाशित झाले. (१) "घाटंजी शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजना विशेषांक" *(P29-40NB1996)* (२) "अनुशेष विशेषांक" *(P46-112NB1996)* (३) "वणी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना विशेषांक" *(P49-60NB1997)* (४) "पांढरकवडा शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना विशेषांक" *(P61-72NB1997)* (५) "अकोला पूर नियंत्रण योजना विशेषांक" *(P93-108NB1998)* (६) अकोला पूर नियंत्रण योजना (दुसरा) विशेषांक : २००२" *(P69-80NB2002)* (७) केळकरी कारस्थान विशेषांक" *(P157-208NB2015)* हे काही विशेषांक उदाहरण म्हणून सांगता येतील. आजही हे विशेषांक 'नुटा बुलेटीन'च्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. डॉ.अरुण मराठे यांच्यानंतर सर्वश्री विलास मराठे, उल्हास मराठे, विवेक मराठे यांनी दै.हिंदुस्थानचा कारभार सांभाळला. या मंडळींनीसुद्धा हे सदर सुरू ठेवावे असा आग्रह धरला. तसे ते सदर सुरू आहे.

**६.** दैनिक 'हिंदुस्थान'मधून प्रकाशित होणाऱ्या 'विधानमंडळात आमचे प्रश्न' हे सदर रविवार, दिनांक १९ जानेवारी १९९७ रोजी सुरू झाले व रविवार, दिनांक २७ ऑक्टोबर २०१९ रोजी या सदराला ११४७ आठवडे पूर्ण झालेत. या सदरामध्ये दर रविवारी दिनांक १ जानेवारी २०१७ रोजी पासून "वेतन आयोग संघर्ष" या मथळ्याची एक लेखमाला प्रकाशित झाली. या लेखांमधून मुख्यत्वे सर्व स्तरावरच्या शिक्षकांनी व त्यांच्या संघटनांनी वेतन आयोगासाठी केलेल्या संघर्षाचे तपशील नमूद केलेले आहेत. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या संघर्षाशी व्यक्तिशः प्रस्तुत लेखकाचा संबंध हा दोन प्रकारे आलेला आहे. एक म्हणजे विधानपरिषद सदस्य या नात्याने, त्यांचा एक प्रतिनिधी म्हणून व दुसरे म्हणजे प्राध्यापक संघटनेचा एक पदाधिकारी या नात्याने. इतर शिक्षकांच्या वेतन आयोगातील संघर्षाशी आलेला संबंध हा विधानपरिषद सदस्य या एकेरी नात्याने आलेला असून त्या संघर्षात या संघटनांच्या मार्गदर्शकाची भूमिका पार पाडण्याची संधी विधानपरिषद सदस्य या नात्यानेच प्रस्तुत लेखकाला मिळाली.

**७.** या लेखमालेतील परिच्छेद ७ ते २३६ मधून सर्व स्तरावरील शिक्षक संघटनांनी केलेल्या संघर्षाची माहिती नमूद केलेली आहे. मुख्यत्वे राज्यस्तरावरील बडकस वेतन आयोग व भोळे वेतन आयोग यांच्या संदर्भातील घडामोडी, त्यावेळेला श्री.र.ग.कर्णिक यांच्या नेतृत्त्वाखाली राज्यशासकीय, निमशासकीय कर्मचारी व शिक्षक संघटनांनी केलेल्या संघर्षातून राज्यस्तरीय वेतन आयोग नेमण्याची पद्धत बंद होणे, पुढे न्यायमूर्ती नाईक यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेली समानिकरण समिती, समानिकरण समितीचे स्वरूप बदलवून राज्य वेतन सुधारणा समिती श्री.द.म.सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली पाचव्या वेतन आयोगाच्या वेळेला नेमली जाणे, सहाव्या वेतन आयोगाच्या वेळेला नेमण्यात आलेली हकीम समिती, याबाबतचा आढावा या परिच्छेदातून तपशीलवारपणे नमूद केलेला आहे. त्याचबरोबर व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील शिक्षक यांना प्राप्त झालेला उच्च न्यायालयाचा धोरणात्मक निर्णय व असा धोरणात्मक निर्णय मिळाल्यानंतरसुद्धा त्यांना करावा लागलेला संघर्ष, आय.टी.आय. निदेशक, अशासकीय तांत्रिक माध्यमिक शाळेतून काम करणारे शिक्षक **यांनी केलेल्या संघर्षाची तपशीलवार माहिती परिच्छेद ७ ते २३६ मध्ये नमूद केलेली आहे. विस्तारभयास्तव हा मजकूर या विशेषांकात समाविष्ट केलेला नाही.**

**८.** या संघर्षामधील महत्त्वपूर्ण बाब म्हणजे सुकथनकर समिताचा अहवाल रद्दबातल होण्यासाठी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ व महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ या दोन राज्यस्तरीय संघटनांनी समान मागण्यांच्या आधारावर त्यावेळी उभारलेल्या संयुक्त आंदोलनाचा उल्लेख करता येईल. या संयुक्त आंदोलनाला उत्तम यश मिळाले व पुढे सुकथनकर समितीचा अहवाल पूर्णपणे कचऱ्याच्या टोपलीत टाकून केंद्रशासनाने प्रस्तावित केलेल्या वेतनश्रेण्या जशाच्या तशा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना महाराष्ट्रात लागू करण्यात आल्या. **परिच्छेद २३७ पासून तर परिच्छेद १०२४ पर्यंत विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू होणाऱ्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाबाबत झालेल्या संघर्षाची तपशीलवार माहिती नमूद करण्यात आलेली आहे.**

**९.** हे सारे तपशील शब्दबद्ध करीत असतांना वापरण्यात आलेल्या आधारभूत साधनसामुग्रीचा उल्लेख करणे सुद्धा मला आवश्यक वाटते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेपासून तर आजतागायत सातत्त्याने मी या कार्यकारी मंडळाचा एक सदस्य आहे. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचा १९७४ पासून तर सातत्त्याने २०११ पर्यंत अध्यक्ष या नात्याने संघटनेचा एक पदाधिकारी म्हणून माझा या संघर्षाशी अतिशय जवळून संबंध आला.

(i) अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ यांनी प्रसृत केलेली सर्व कागदपत्रे, ठराव, परिपत्रके, वृत्तपत्रीय प्रसारणे ही अगदी सुरुवातीच्या काळापासून तर आज पर्यंत माझ्याकडे नीटपणे लावून ठेवलेली आहेत. संघटनेचा पदाधिकारी या नात्याने तो माझ्या कामाचा एक भाग होता. पुढे विधानपरिषद सदस्य या नात्याने प्रदीर्घ काळ काम करण्याची संधी मिळाली. त्या संधीमुळे कागदपत्रे नीट लावून ठेवण्याच्या सवयीचे जे दृश्य व अदृश्य लाभ सभागृहात दिसायला लागले त्यातून ती सवय आणखीच धारदार झाली. हे लेखन करीत असतांना त्या कागदपत्रांचा मला अतिशय उपयोग झाला. त्यातील अनेक महत्त्वपूर्ण कागदपत्रे ही सोबत सहपत्रे म्हणून या लेखमालेत समाविष्ट करण्यात आलेली आहेत. ही मूळ व अस्सल कागदपत्रे असल्यामुळे त्यांची अधिकृतता वादातीत आहे.

(ii) चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या संघर्ष काळी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष प्रा.किशोर ठेकेदत्त व सरकार्यवाह प्रा.मृण्मय भट्टाचार्य हे होते. या दोघांनी त्या घटनाक्रमाचे तपशील शब्दबद्ध करणारा "Indefinite Strike of University and College Teachers in 1987 and 1998" या मथळ्याचा एक लेख अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगी प्रसिद्ध झालेल्या स्मरणिकेमध्ये समाविष्ट आहे. *(AIFUCTO Golden Jubilee Souvenir pp 9-14)* या दोघांनी शब्दबद्ध केलेला "The Second All - India Strike of University and College Teachers-1997" या मथळ्याचा दुसरा एक लेख "Teachers' Movement" या अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या मुखपत्रामध्ये प्रसृत झालेला आहे. *("Teachers' Movement"volume 15, Issue 6, June 2013 pp 9-11)* ते दोनही लेख त्यांचे महत्त्व लक्षात घेऊन सन २०१३ च्या नुटा बुलेटीनमध्ये अनुक्रमे पृष्ठ १०२ व पृष्ठ ११० वर पुनःप्रकाशित करण्यात आलेले आहेत.


**स्व. प्रा. हरिभाऊ रामचंद्र हिवरे, अकोला यांच्या स्मृती प्रित्यर्थ**

**प्रा. डॉ. विवेक हरिभाऊ हिवरे यांच्या तर्फे**

**''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा बुलेटीन'च्या विशेषांकास हार्दिक शुभेच्छा**

शुभेच्छूक : प्रा.डॉ. विवेक ह. हिवरे, अकोला

प्रत्यक्ष रणांगणावर संघर्ष करणाऱ्या दोन अखिल भारतीय स्तरावरच्या सरसेनापतींनीच लिहिलेला हा संदर्भसमृद्ध मजकूर असल्यामुळे त्या मजकुराची अधिकृतता वादातीत आहे. मी माझ्या या लिखाणामध्ये त्या समृद्धीचा वापर केलेला आहे.

(iii) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची एक प्रभावी घटक संघटना असलेल्या 'पुक्टो' या संघटनेने रौप्य महोत्सवा निमित्त "पुक्टो बुलेटीन १९७८-२००३ रौप्य महोत्सवी विशेषांक : रौप्यसंचित" या मथळ्याचा एक विशेषांक प्रकाशित केलेला आहे. हे सुद्धा या संदर्भातील एक महत्त्वाचे प्रकाशन आहे. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ व त्यांच्या घटक संघटना यांच्या बाबतची तपशीलवार व अधिकृत माहिती समाविष्ट असलेला संदर्भग्रंथ असे स्वरूप या स्मरणिकेला प्राप्त करून देण्यासाठी या महासंघाचे एक ज्येष्ठ नेते प्रा.डॉ.अरुण दिक्षीत यांनी उपसलेले कष्ट व घेतलेली मेहनत इतकी स्पष्ट आहे की, या विषयावर लेखन करणाऱ्या कोणालाही या प्रकाशनाची भेट घेतल्याशिवाय पुढे जाता येणार नाही.

(iv) "सचिवांचा वार्षिक अहवाल विशेषांक" या मथळ्याचा एक विशेषांक प्रकाशित करावा अशी कल्पना 'नुटा'चे अध्यक्ष प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी मांडली. असे सर्व वार्षिक अहवाल एका विशेषांकामध्ये समाविष्ट करून तो सुवर्ण महोत्सवी समारंभाच्या निमित्ताने प्रकाशित करावा, असा निर्णय नुटाच्या कार्यकारी मंडळाने सोमवार, दिनांक २२ जुलै २०१३ रोजी वर्धा येथे झालेल्या बैठकीत घेतला. सन १९६३ ते सन २०१२ या प्रदीर्घ काळातील वार्षिक अहवालांचे संकलन असलेला नुटा बुलेटीन विशेषांक सन २०१३ चा १३ वा अंक म्हणून प्रकाशित करण्यात आला. या अंकाची या लेखनामध्ये खूप मदत झाली. **शिक्षकांच्या व्यावसायिक जीवनावर आलेली किंवा येऊ शकणारी संकटे व त्यांच्या बंदोबस्तासाठी अखिल भारतीय स्तरावर, महाराष्ट्राच्या स्तरावर व स्थानिक स्तरावर संघटनांनी उपसलेले कष्ट व केलेली मेहनत यांच्या माहितीने हे सर्व अहवाल खचाखच भरलेले आपणास दिसून येतील.** मुख्य म्हणजे हा प्रत्येक अहवाल सचिवांनी तयार केलेला, त्यानंतर कार्यकारी मंडळाने मान्य केलेला व शेवटी आमसभेने संमत केलेला असल्यामुळे **त्यामधील माहितीच्या अधिकृततेची पातळी सर्वोच्च दर्जाची आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.**

(v) "**प्रा.संभाजीराव जाधव शैक्षणिक चळवळीचा मानदंड**" या मथळ्याचा "**प्रा.संभाजीराव जाधव स्मृतिग्रंथ" शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या (सुटा) वतीने** प्रकाशित करण्यात आलेला आहे. ४१० मुद्रित पृष्ठांच्या या ग्रंथामध्ये निरनिराळ्या ७७ मान्यवरांचे लेख समाविष्ट आहेत. लेख लिहिणाऱ्या मान्यवरांमध्ये जागतिक प्राध्यापक महासंघाचे, अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अनेक नेते समाविष्ट आहेत. दोन माजी कुलगुरु व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे एक माजी अध्यक्ष व अनेक सामाजिक व राजकीय विचारवंताचा या लेखकांमध्ये समावेश आहेत. त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी जवळून पाहिलेले संभाजीराव शब्दबद्ध केलेले आहेत. हा स्मृतिग्रंथच असल्यामुळे हे सर्व लेख प्रा.संभाजीराव जाधव यांच्या नेतृत्वगुणांशी संबधीत आहेत हे तर खरेच पण त्याचबरोबर हेही खरे की, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेपासूनचे एक ज्येष्ठ नेते हे त्यांचे स्थान लक्षात घेता १९७० ते २०११ या काळातील महाराष्ट्रातील प्राध्यापक चळवळीच्या इतिहासाचे धावते दर्शन असे काहीसे स्वरुप या ग्रंथाला प्राप्त झाले आहे. अनेक उपयुक्त संदर्भ त्यातून उपलब्ध होतात. "नव्या पिढीतील प्राध्यापकांना प्राध्यापक संघटनेचा इतिहास कळावा, संघटनेतील कार्यकर्त्यांचा त्याग, समर्पण, ज्ञात व्हावे, प्राध्यापक संघटनेची निकड लक्षात यावी, चळवळीबाबत व आंदोलनाबाबत दिशादर्शन व्हावे, त्यांच्यासमोर प्रा.संभाजीराव जाधव यांचा एक मानदंड असावा, त्यांना सतत त्यातून प्राध्यापक हितासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळावी, हा सदर स्मृतिग्रंथ प्रकाशनाचा मुख्य उद्देश आहे." असे संपादक मंडळाने या ग्रंथाच्या संपादकीयातच नमूद केले आहे.

(vi) विद्यापीठ अनुदान आयोगाने "Sixty Years of the University Grants Commission" या नावाने एक पुस्तक प्रकाशित केले असून तिसऱ्या वेतन आयोगा पूर्वीच्या घटनाक्रमाचे बरेचसे तपशील या पुस्तकावरून घेतलेले असल्यामुळे त्याचीही अधिकृतता वादातीत आहे, असे म्हणता येईल.

**१०.** या संकलनातील **एक महत्त्वाचे वैगुण्य** मला नमूद केले पाहिजे. प्रत्येक लेख हा दर रविवारी स्वतंत्रपणे प्रकाशित झाल्यामुळे तो स्वयंस्पष्ट व्हावा म्हणून काही महत्त्वाच्या मुद्यांची पुनरावृत्ती झाली आहे. त्या दिवशीचा विषय स्पष्ट होण्यासाठी ही पुनरावृत्ती टाळता येण्यासारखी नव्हती, हे समजून घेतल्यास वाचकांना त्या वैगुण्याचे उगमस्थान लक्षात येईल अशी खात्री आहे. या लेखातील **दुसरे महत्त्वाचे वैगुण्य** सुद्धा मला नमूद केले पाहिजे. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ या स्तरावर झालेल्या घडामोडींशी संबंधित असलेल्या कागदपत्रांचा आधार घेऊन ही लेखमाला तयार करण्यात आलेली आहे. या संदर्भात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सर्व घटक संघटनांनी आपापल्या स्तरावर बरीच मेहनत केलेली असली तरी घटक संघटनांच्या घडामोडींबाबत फक्त नुटा संघटनेच्या पातळीवरीलच कागदपत्रे माझ्या दप्तरी उपलब्ध असल्यामुळे इतर घटक संघटनांच्या क्षेत्रीय पातळीवरील महत्त्वाच्या एखाद्या घडामोडींची नोंद झालेली नाही असे वाचकांना वाटणे स्वाभाविक आहे आणि त्यामुळे त्या त्या घटक संघटनांच्या स्तरावरील घडामोडींच्या तपशीलवार माहितीची भर घालण्यास मोठा वाव आहे. त्या त्या घटक संघटनांच्या स्तरावरील नेत्यांना व कार्यकर्त्यांना ही पोकळी भरून काढण्यासाठी मेहनत करावी लागेल हे उघड आहे.

**११.** हा विशेषांक मुख्यत्वे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी तिसऱ्या वेतन आयोगापर्यंत केलेल्या वेतन आयोग संघर्षाशी संबंधित आहे. परिच्छेद १ ते ३८२ (परिच्छेद ७ ते २३६ वगळून) या परिच्छेदामध्ये समाविष्ट असलेल्या या मजकुरामध्ये तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतच्या संघर्षाची तपशीलवार माहिती नमूद आहे. हा सर्व मजकूर प्रकाशित करणे हे आर्थिकदृष्ट्या मोठ्याच खर्चाचे काम आहे, मात्र नुटाच्या कार्यकारी मंडळाने याबाबत योजना ठरवून निदान या कामाची सुरुवात तरी झाली पाहिजे यासाठी काही निश्चित निर्णय घेतले. या निर्णयाचा भाग म्हणून परिच्छेद ३८२ पर्यंतचा म्हणजे तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतचा तपशील या नुटा बुलेटीनच्या विशेषांकामध्ये प्रकाशित करण्यात आला आहे.

**१२.** एकदा नुटाच्या कार्यकारी मंडळामध्ये याबाबतचा निर्णय झाल्यानंतर मंडळाच्या सर्वच सदस्यांनी अतिशय तत्परतेने याबाबतची कार्यवाही पार पाडली. विशेषतः नुटाचे अध्यक्ष प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी, कोषाध्यक्ष डॉ.प्रकाश तायडे व सहसचिव प्रा.सतेश्वर मोरे यांनी बराच वेळ देऊन जे परिश्रम केले त्याशिवाय हा अंक निर्धारित वेळेत प्रकाशित झाला नसता हे मी मुद्दाम नमूद करीत आहे. या संघर्षामध्ये सहभागी असलेल्या त्या पिढीच्या शिक्षकांना त्या संघर्षमयी क्षणाच्या आठवणीने अभिमान वाटेल व त्यानंतर या व्यवसायात आलेल्या शिक्षकांना संघर्षाशिवाय साध्या साध्या गोष्टीसुद्धा प्राप्त होत नाहीत. या अनुभवानंदामध्ये सहभागी होता येईल. तसे झाल्यास ही मेहनत उपयोगी पडल्याचा आनंद मला होईल.

**प्रा.बी.टी.देशमुख**

**२४ नोव्हेंबर २०१९**

*माजी विधान परिषद सदस्य व*
*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

### *संदर्भ*

या संपूर्ण लेखमालेमध्ये वापरण्यात आलेल्या संदर्भाबाबत

(१) "Sixty Years of University Grants Commission" - Publication of UGC यापुढे उल्लेख संदर्भ एक म्हणून.

(२) "पुक्टो बुलेटिन १९७८-२००३ रौप्य महोत्सवी विशेषांक : रौप्यसंचित" यापुढे उल्लेख संदर्भ दोन म्हणून.

(३) "प्रा.संभाजीराव जाधव शैक्षणिक चळवळीचा मानदंड : प्रा.संभाजीराव जाधव स्मृतिग्रंथ" यापुढे उल्लेख संदर्भ तीन म्हणून.

(४) नुटा बुलेटीन : अधिकृत कागदपत्रे त्या त्या वेळी नुटा बुलेटीनमध्ये प्रकाशित करण्यात आली, त्याचा संदर्भ (P29NB1996) असा देण्यात आला असेल तर सन १९९६ च्या नुटा बुलेटीनचे पृष्ठ २९ असा समजावा.

(५) इतर संदर्भ : लेखामध्ये त्या त्या ठिकाणी नमूद केल्याप्रमाणे.

*****

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

## संघटनेच्या अध्यक्षांचे मनोगत

**१.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ व नुटाचे माजी अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी शब्दबद्ध केलेला "विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतचा संघर्ष" या मथळ्याचा नुटा बुलेटीनचा विशेषांक प्रकाशित करतांना मला आनंद होत आहे. नुटाने सामाजिक दायित्वातून प्रकाशित केलेल्या विविध विषयांवरील विशेषांकांच्या समृद्ध परंपरेत भर घालणारा हा "वेतन आयोग संघर्ष विशेषांक" आज प्रकाशित करीत आहोत. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वात संबंध महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी केलेल्या संघर्षाचा हा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. सोबतच महासंघाचा इतिहास सुद्धा या निमित्ताने पुढे आला आहे. महासंघाने केलेल्या लढ्यांमध्ये तिसऱ्या वेतन आयोगाचा लढा हा ऐतिहासिक आणि तेवढाच मूलगामी स्वरूपाचा होता. कारण त्या लढ्याच्या प्रभावातूनच पुढे झालेल्या संघर्षाचे परिणाम शासकीय पातळीवर दिसून आले. आजही ते ओसरलेले नाहीत. याची परिणती सातव्या वेतन आयोगाच्या लढ्याच्या वेळीसुद्धा दिसून आली. तो मूलगामी परिणाम करणारा संघर्ष या विशेषांकातून उजागर होत आहे. तिसऱ्या वेतन आयोगासाठी महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी केलेल्या त्या लढ्याने व्यावसायिक संघटनांच्या समोर एक आदर्श उभा केला असून आपल्या व्यवसायावर येणाऱ्या संकटावर - आपली भूमिका आणि त्या भूमिकेप्रती असणारी आपली निष्ठा यामुळे - कशी मात करता येते याचा वस्तुपाठच या आंदोलनाने दिला आहे.

**२.** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या संदर्भातील इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, वेतन आयोग हा केवळ आर्थिक लाभाचा मुद्दा नसतो तर त्यासोबतच व्यावसायिक सेवाशर्तीचे कोणते लटांबर अनाहूतपणे सोबत जोडले जाईल याचा काहीच नेम नसतो. म्हणून या वेतन आयोगाकडे पाहतांना केवळ आर्थिक लाभाच्या नव्हे तर आपल्या व्यावसायिक हिताच्या दृष्टीनेही पाहिले पाहिजे. वेतनधारकांना मिळणारे वेतन हे रुपयाच्या स्वरूपात असते. आपला काहीही दोष नसतांना सातत्याने होणारी रुपयाची घसरण होतांना आपण पाहतो. त्यावर उपाय म्हणून वेतनआयोगाची स्थापना केली जाते आणि रुपयाचे घसरलेले मूल्य लक्षात घेऊन वेतनश्रेणींची पुनर्रचना करून तशी शिफारस केली जाते. भारत प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांसह कोणत्याही अधिकाऱ्यांच्या समुहाला पात्रतेच्या किंवा सेवेच्या नव्या अटी लागू करण्याची संधी म्हणून शासन वेतन आयोगाच्या संधीचा वापर करीत नाही. परंतु शिक्षकांना मात्र सेवाशर्तीच्या नव्यानव्या अटींचा जाच सहन करावा लागतो. प्रत्येक वेळी हे घडले आहे. तिसऱ्या वेतन आयोगाच्या वेळी अस्तित्वातच नसलेल्या एम्.फील. पदवीचे लटांबर सेवेत असलेल्या शिक्षकांच्या गळ्यात अडकविण्याचा शासनाने अयशस्वी पण शक्तीपूर्ण प्रयत्न केला. चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी नेट-सेटचे असेच लटांबर शिक्षकांच्या गळ्यात बांधण्यात आले आणि पाचव्यामध्ये पी.एचडी., सहाव्यामध्ये एपीआय तर सातव्यामध्ये पदवी आणि पदव्युत्तर अशी विभागणी केली. प्रत्येक वेळी या वेतन आयोगाने प्रस्तावित केलेल्या वेतनाच्या पुनर्रचनेसोबतच नव्या सेवाशर्ती लादण्याचा प्रयत्न झाला. त्या प्रत्येक वेळी त्याविरुद्ध संघर्ष टाळता आला नाही असे दिसून येते.

**३.** संघर्ष हा संघटनेचा स्थायीभाव असतो. कारण तिचा जन्मच संघर्षातून होतो. मागणे आणि मिळविणे यात फरक आहे संघटना ही केवळ मागण्याच्या भूमिकेतून उभी राहत नाही, ती मिळविण्याच्या भूमिकेतून मजबूतपणे उभी राहते. तसेही मागण्यातून मनाजोगे काही मिळाले असा इतिहास नाही. तर मिळविण्याच्या भूमिकेतून जो संघर्ष झाला, त्यातून बरेच काही मिळाले असाच इतिहास आहे. 'नुटा' हे आमचे व्यावसायिक संघटन आहे. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ या शीर्षस्थ संघटनांनी केलेल्या संघर्षातून आम्हाला व्यावसायिक सुरक्षिततेने विधिमय कवच प्राप्त झाले. यावर माझा केवळ या संघटनेचा अध्यक्ष म्हणून नाही, तर या संघर्षात सातत्याने लढणारा एक साधा सैनिक म्हणून विश्वास आहे. व्यावसायिक संघटना या व्यावसायिक सन्मानासाठी आणि त्या व्यवसायातील उणिवांना उजागर करून त्याच्या निमूर्लनासाठी कृतिशील असतात. नुटाने आपल्या गेल्या अर्धशतकाच्या प्रवासात ते केले.

**४.** अमरावती येथून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक 'हिंदुस्थान'मध्ये विधानमंडळात प्रक्रिया झालेल्या विविध विषयांवर दर रविवारी, 'विधानमंडळात आमचे प्रश्न' या सदराखाली प्रा.बी.टी.देशमुख यांनी लिहिलेला एक पानभर मजकूर गेली २१ वर्षे प्रकाशित होत आहे. रविवार, दिनांक १९ जानेवारी १९९७ रोजी या सदरामधील पहिला लेखांक प्रसिद्ध झाला व रविवार, दिनांक २७ ऑक्टोबर २०१९ रोजी ११४७ वा लेखांक प्रकाशित झाला. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रश्नाविषयीची तपशीलवार माहिती 'नुटा बुलेटीन'मध्ये वेळोवेळी प्रकाशित होत असल्यामुळे 'विधानमंडळात आमचे प्रश्न' या सदरामध्ये ती फारशी प्रकाशित झाल्याचे दिसून येत नाही. नुटा बुलेटीनमध्ये ही माहिती प्रकाशित होते हे खरे असले तरी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या एखाद्या प्रश्नाविषयी सुसंगतपणे लिहिलेला इतिहास असे त्या माहितीचे स्वरूप कधीही नव्हते. (त्या त्या विषयावरील विशेषांक हे याला अपवाद समजावे.) त्यामुळे वेतन आयोगाविषयी संघटनांनी केलेला संघर्ष व सेवाशर्ती साठी केलेला संघर्ष याबाबतची माहिती सुसंगतपणे लिहून काढल्यास नवीन शिक्षकांना हा जूना इतिहास कळण्यास मोठी मदत होईल असे वाटल्यावरून मी स्वतः व संघटनेतील व कार्यकारी मंडळातील माझ्या सहकाऱ्यांनी तशी विनंती नुटाच्या गोल्डन जुबली वर्षामध्ये प्रा.बी.टी.देशमुख यांना केली होती.

**५.** अशा लिखाणासाठी आधारभूत असलेली सर्व साधनसामुग्री गोळा करून प्रत्यक्ष त्या विषयावरची लेखमाला सुरू करण्यास थोडा वेळ झाला ही गोष्ट खरी असली तरी वेतन आयोग संघर्ष ही लेखमाला 'विधानमंडळात आमचे प्रश्न' या सदरामध्ये रविवार, दिनांक १ जानेवारी २०१७ रोजी सुरू झाली व पाचव्या वेतन आयोगापर्यंत झालेल्या संघर्षाची तपशीलवार माहिती नमूद करून रविवार, दिनांक ३० जून २०१९ रोजी पर्यंत ती चालली. या लेखमालेअंतर्गत परिच्छेद १ पासून तर परिच्छेद १०६१ पर्यंतचा मजकूर समाविष्ट आहे. हा विशेषांक प्रकाशित करावा असा निर्णय एकदा कार्यकारी मंडळामध्ये झाल्यानंतर त्यासाठी उभे करावयाच्या आर्थिक बळाचा विचार केला तर ते बरेच मोठे काम असल्याचे दिसून आले. **तथापि, केवळ आर्थिक बळा अभावी हे काम थांबू नये असा विचार करून तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतचा (परिच्छेद ३८२ पर्यंतचा) मजकूर समाविष्ट असलेला विशेषांक प्रकाशित करावा असा निर्णय नुटाच्या कार्यकारी मंडळाने घेतला.**

**६.** आज प्रकाशित होत असलेल्या या विशेषांकामध्ये चौथ्या व पाचव्या वेतन आयोगासाठी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ व घटक संघटनांच्या पातळीवर जो जबरदस्त संघर्ष झाला त्याबाबतचा 'विधानमंडळात आमचे प्रश्न' या सदराच्या निमित्ताने लिहून तयार असलेला मजकूर हाती असला तरी तो प्रकाशित करता आलेला नाही. तसे करणे शक्यही नव्हते. चौथ्या व पाचव्या वेतन आयोग संघर्षाविषयीचा मजकूर परिच्छेद ३८३ ते ८५३ मध्ये समाविष्ट असून यथावकाश तो प्रकाशित करण्याबाबत नुटाच्या कार्यकारी मंडळामध्ये व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळामध्ये विचार करण्यात यावा असे प्रस्तावित आहे.

**७.** तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वेतन आयोगापर्यंतच्या संघर्ष लेखनासाठी आवश्यक साधनसामुग्रीची जुळवाजुळव हे बरेच वेळखाऊ व यातायातीचे काम होते. याचा मी प्रत्यक्ष साक्षीदार असल्यामुळे व त्याचबरोबर सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या संघर्षाच्या वेळी मी स्वतः एक पदाधिकारी या नात्याने सहभागी असल्याने बी.टी.देशमुख यांचा नेतृत्त्व मंडळातील सहाव्या व सातव्या वेतन आयोगातील संघर्षातील सहभाग जवळून पाहिला आहे. त्या आधारावर मी हे नमूद करू इच्छितो की, सहाव्या व सातव्या वेतन आयोग संघर्षाचे लेखन करण्यासाठी आधारभूत साधनसामुग्रीची जुळवाजुळव करण्यासाठी यापूर्वी लागला तेवढा वेळ व करावी लागली तेवढी यातायात आता करावी लागणार नाही. कारण तुलनेने हा ताजा इतिहास आहे हे एक व दुसरे म्हणजे या कामी सर्व मदत करण्याचे आश्वासन मी व माझ्या सहकाऱ्यांनी बी.टी.भाऊंना यापूर्वीच दिलेले आहे. सबब सहाव्या व सातव्या वेतन आयोग संघर्षाच्या लेखनाचे काम त्यांनी हाती घ्यावे अशी विनंती या निमित्ताने मी प्रा.बी.टी.देशमुख यांना करीत आहे. वेतन आयोग संघर्षाच्या तपशीलवार लेखनासोबतच विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवाशर्तींचा भाग असलेल्या विविध प्रश्नांसाठी झालेल्या संघर्षामध्ये संघटनेचे पदाधिकारी व विधानमंडळ सदस्य या नात्याने प्रा.बी.टी.देशमुख यांना या सर्वच संघर्षाचे जवळून अवलोकन करता आले व

त्यातील काही बाबतीत त्यांनी लेखनसुद्धा केलेले आहे.

८. उदाहरण म्हणून द्यायचे झाल्यास सन २००१ च्या नुटा बुलेटीनच्या १६ व्या अंकाचे देता येईल. (*P433-480NB2001*) नुटा बुलेटीनच्या रौप्य महोत्सवा निमित्त संघटनेने त्यावेळी एकूण २६ विशेषांक प्रकाशित केले होते. त्यापैकी १६ वा अंक हा "**रजा प्रवास सवलत विशेषांक**" म्हणून प्रकाशित केलेला आहे. संघटनेने सभागृहावाहेर व शिक्षक प्रतिनिधींनी सभागृहात या प्रश्नावर केलेल्या मेहनतीची तपशीलवार माहिती प्रा.बी.टी.देशमुख यांनी शब्दबद्ध केलेल्या ७० परिच्छेदांच्या लेखामध्ये तपशीलवारपणे नमूद करण्यात आली असून हा लेखच त्या विशेषांकाचा गाभा आहे. तसे पाहिले तर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवाशर्तीचा रजा प्रवास सवलत हा लहानसा भाग होय. सेवाशर्तीशी संबंधित कितीतरी प्रश्न संघटनांच्या प्रयत्नांनी अत्यंत यशस्वीपणे मार्गी लागलेले दिसून येतात. (१) वेतन वितरणाची व्यवस्था (२) सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था - स्वेच्छानिवृत्तीसह (३)परिविक्षाधिन कालावधी व स्थायीकरणाची व्यवस्था (४) सेवामुक्त शिक्षकासाठी न्यायाधिकरणाची व्यवस्था (५) वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची व्यवस्था हे व यासारखे विषय मुख्यत्वे संघटनेच्या श्रमातून मार्गी लागले हे खरे असले तरी त्यांचा बराचसा प्रवास विधानमंडळाच्या परिसरातून सुद्धा झालेला आहे, हे लक्षात घेता "विधानमंडळात आमचे प्रश्न" या सदरातून या विषयांना न्याय देण्याचा प्रश्न प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारात घ्यावा अशी विनंती मी या निमित्ताने करीत आहे.

९. आज प्रसिद्ध होत असलेला हा विशेषांक वेतन आयोगाच्या संघर्षाचाच नाही तर वेतन आयोगाचा इतिहास, उच्च शिक्षणाचा इतिहास, महाविद्यालयाची सुरूवात, विद्यापीठांच्या स्थापनेचा इतिहास, विद्यापीठ अनुदान आयोगापूर्वी असणारी या देशातील उच्च शिक्षणाच्या नियंत्रणाच्या संदर्भातील स्थिती यांचा इतिहास, उच्च शिक्षणाच्या संदर्भात असणारी विधीमान्य परिस्थिती यासंदर्भात अत्यंत मेहनतीने मिळवलेली माहिती आणि संदर्भ या विशेषांकात आपल्याला सापडतात. अस्सल पुरावे आणि प्रत्यक्ष अनुभव याचे एक अनोखे रसायन या विशेषांकाच्या रुपाने आपल्या समोर बी.टी.भाऊंनी ठेवले आहे. संशोधकांसाठी संदर्भग्रंथ, संघटनेसाठी आचार आणि व्यवहार संहिता, कार्यकर्त्यासाठी भूमिका आणि निष्ठेचा अमूल्य ठेवा तर वाचकांसाठी उत्युच्च माहितीचा हा स्त्रोत आहे. हा विशेषांक आपल्या हाती देतांना मला आनंद होणे हे जसे स्वाभाविक आहे तसेच आपल्या हातून पार पडलेले ते एक अभिमानास्पद कार्य आहे अशी संघटनेचा अध्यक्ष या नात्याने व्यक्तिशः माझी व माझ्या सहकाऱ्यांची भावना आहे. आपण निश्चितपणे या विशेषांकाचे स्वागत कराल ही खात्री बाळगून आपल्या प्रतिक्रियेची अपेक्षा करतो! धन्यवाद!!

**डॉ. प्रवीण रघुवंशी**

**२४ नोव्हेंबर २०१९** *अध्यक्ष नुटा*

*****


**ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित, शासन मान्यताप्राप्त, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नित**

***कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूम, दुर्गापूर रोड, चंद्रपूर***

**महाविद्यालयात उपलब्ध अभ्यासक्रम** : वर्ग ११ व १२ वी विज्ञान, कला, वाणिज्य, बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एम.सी.एम., डी.बी.एम, सर्टीफिकेट कोर्स इन लायब्ररी सायन्स (६ महिने कालावधी)

***"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

शुभेच्छूक : डॉ. एन.एच.खत्री, अध्यक्ष प्रा.वसंत आकुलवार, सचिव डॉ. एस.बी.मोहीतकर, प्राचार्य

**व्हीएसपीएम ॲकेडमी ऑफ हायर एज्युकेशन, नागपूर द्वारा संचालित**

***अरविंदबाबु देशमुख महाविद्यालय, भारसिंगी जि. नागपूर***

***"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

शुभेच्छूक : मा.रणजितबाबु देशमुख, अध्यक्ष डॉ. विजय धोटे, प्राचार्य मा.युवराज चालखोर, सचिव

**सर्वसेवा शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर संचालित**

***कला वाणिज्य महिला महाविद्यालय, बल्लारपूर तह. बल्लारपूर जि. चंद्रपूर***

**तथा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यासकेंद्र : कला वाणिज्य महिला महाविद्यालय, बल्लारपूर**

***"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

श्री. श्रीकांतजी वासुदेवराव चहारे, संस्थाध्यक्ष प्रा.डॉ. अनिल दिनकरराव शिंदे, संस्थासचिव तथा प्रभारी प्राचार्य

प्रा.डॉ.मनिष काशिनाथ कायरकर, केंद्रसंयोजक, य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक अभ्यासकेंद्र, कला वाणिज्य महिला महाविद्यालय, बल्लारपूर

**व्हीएसपीएम ॲकेडमी ऑफ हायर एज्युकेशन, नागपूर**

***महात्मा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनी जि.नागपूर***

**महाविद्यालयातील अभ्यासक्रम** : बी.ए. (मराठी माध्यम), बी.कॉम. (मराठी माध्यम), एम.ए. अर्थशास्त्र व एम.ए. समाजशास्त्र

***"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

शुभेच्छूक : मा.रणजितबाबु देशमुख, अध्यक्ष मा.युवराज चालखोर, सचिव डॉ. विनायक एस. इरपाते, प्राचार्य

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

**Sarvodaya Shikshan Mandal's**

***Sardar Patel Mahavidyalaya, Chandrapur***

(Affiliated to Gondwana University, Gadchiroli) Reaccredited with grade "A" by NAAC (CGPA-3.05) (Place in Best 100 Colleges in India Today Ranking - 2019) **Courses undertaken :** 11th & 12th Arts, Commerce, Science, MCVC, Vocational Courses - (Banking & Marketing), B. A., B. Com., B. Sc., B.FD., B. Lib. Sci., B.C.C.A. (Commerce), B.C.A. (Sci.), B.Sc.(I.T.), M.A., M. Com., M. Sc., M. Lib. Sci., M.F.D. Certificate Courses in Library Science PGDCSA, MCA, MCM, M. Phil (Commerce)

Smt. Sudhatai S. Potdukhe, President Mr. Prashant S., Potdukhe, Secretary Dr. R. P. Ingole, Principal

# विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतचा संघर्ष

**प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

नागरिकांचा कोणताही दोष नसतांना किंवा त्यांचे कोणतेही कर्तृत्व किंवा अकर्तृत्व कारणीभूत नसतांना रुपयाची किंमत सतत घसरत जाते. गेले अनेक वर्षे ही क्रिया सुरू आहे. या क्रियेपासून आपला बचाव करण्याचा काही वर्गांनी केलेला प्रयत्न व त्या प्रयत्नाला यश येऊन पार पडलेली प्रक्रिया असे वेतन आयोगाच्या अहवालाचे स्वरूप सांगता येईल. सुरुवातीला नमूद केलेल्या उपरोक्त क्रियेपासून आपला बचाव करण्याचा प्रयत्न हा समाजातील सर्वच वर्गांना करावा लागतो. त्याचे स्वरूप वेगवेगळे असू शकते. असा प्रयत्न व्यक्तिगत स्तरावर फारसा परिणामकारक होत नाही, तर त्या त्या वर्गातील व्यक्तींना असे प्रयत्न संघटितपणे करावे लागतात. अशा प्रयत्नांना येणारे यश त्या त्या समुहांच्या संघटित शक्तीच्या प्रमाणात असते. त्या त्या समुहांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींचासुद्धा या यशापयशामध्ये मोठा महत्त्वाचा वाटा असतो.

### वेतन आयोगाची गरज का भासते?

२. मुळात **वेतन आयोगाची गरज का भासते?** हे प्रथम पाहिले पाहिजे. वेतन आयोगाचा जन्म हा काही गेल्या पाच-पन्नास वर्षातील नाही. वेतन आयोगाची ही व्यवस्था गेल्या शतकात सुद्धा होती असे दिसून येते. ब्रिटिशांच्या काळामध्ये या धर्तीवर रॉयल कमिशन नेमले जात होते. सन १८८६-८७ मध्ये अैचिसन कमिशन नेमलेले होते. त्यानंतर सन १९१२-१५ मध्ये इस्लींग्टन कमिशन नेमले होते. शासकीय कर्मचारी, व नंतर निमशासकीय संस्थामध्ये काम करणारे जे कर्मचारी आहेत यांना जे काही वेतन आपण लागू करतो ते रुपयामध्ये असते. रुपयाचे मूल्य, वेतनधारकांचा काही संबंध नसलेल्या घटकांमुळे घटत जाते. त्यावर उपाय म्हणून अशाप्रकारच्या वेतन आयोगाची नियुक्ती करायची आणि **रुपयांचे घसरलेले मूल्य लक्षात घेऊन वेतनश्रेण्यांच्या पूनर्रचनेची शिफारस करायची अशाप्रकारचा उद्देश यामागे असतो.**

### नियतकालिक पुनर्विलोकन

३. स्वातंत्र्यानंतर दहा वर्षाच्या फरकाने वेतन व्यवस्थेचे नियतकालिक पुनर्विलोकन करण्यासाठी अशाप्रकारचे सात आयोग नेमले गेले. वेतन आयोगाच्या कामाविषयीचे स्वरुप पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाने आपल्या अहवालातील परिच्छेद क्रमांक १.३ मध्ये सांगितले आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की :-

"Pay Commission are a device by which an independent body investigates the demands of Central Government employees and submits its recommendations which are binding on both Government and its employees. Conceptually, they fall short of a forum for collective bargaining, but **they do provide an opportunity for a periodic review** by an outside body in whom both the Government and the employees have confidence."

### सर्वोच्च न्यायालयाने वेतन आयोगाच्या बाबतीत घेतलेली स्थिर भूमिका

४. या वेतन आयोगांनी अतिशय महत्वपूर्ण भूमिका यापूर्वीच्या काळामध्ये बजावलेली दिसून येते. रुपयांचे घसरलेले मूल्य लक्षात घेऊन आपल्या शिफारशी दर १०/१२/१३ वर्षांनी या आयोगांनी केलेल्या आहेत. या वेतन आयोगाच्या शिफारशी तोलामोलाच्या मानल्या जातात व न्यायालय त्यामध्ये शक्यतो हस्तक्षेप करीत नाही. सुप्रीम कोर्टाने यापूर्वी निर्णय दिलेले आहेत की, आम्ही या वेतन आयोगाच्या कामामध्ये ढवळाढवळ करणार नाही. विशेष काही गोष्ट असेल त्या वेळीच लक्ष देऊ. सर्वोच्च न्यायालयाने वेतन आयोगाच्या बाबतीत घेतलेली ही स्थिर भूमिका आहे. एका निर्णयामध्ये (State of U.P. and Others Vs J.P.Chaurasia and Others 1989 (1) SCC 121) सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे असे नमूद केलेले आहे की, :-

"The equation of posts or equation of pay must be determined by expert bodies like Pay Commission. They would be the best judge to evaluate the nature of duties and responsibilities of posts. If there is any such determination by a Commission or Committee, **the Court should normally accept it.** The Court should not try to tinker with such equivalence unless it is shown that it was made with extraneous consideration." काही आगावू हेतू ठेवून केले असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. अन्यथा वेतन आयोगाच्या शिफारशी आम्ही मान्य करु ही भूमिका सर्वोच्च न्यायालयाने या व अशा अनेक प्रकरणांमध्ये घेतलेली आहे.

### ते संपूर्णपणे वेतन आयोगाचे क्षेत्र आहे

५. काही बाबतीत ते संपूर्णपणे वेतन आयोगाचे क्षेत्र आहे अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयाने दुसऱ्या एका प्रकरणात (Prabhat Kiran Maithani and Others Vs. Union of India and Another 199 Supreme Court Cases (L & S) 279) घेतलेली दिसून येते. ती पुढीलप्रमाणे :-

"We are afraid this is a matter which lay entirely within the sphere of the functions of the Pay Commission. **The Court cannot satisfactorily decide such disputed questions** on the slender material on which the learned counsel for the petitioner relies in order to displace what appears to us to be, prima facie, the effect of the Report of the Third Pay Commission of 1973"

### हे मुख्यत्वे कार्यकारी सत्तेचे काम आहे

६. आणखी दुसऱ्या एका प्रकरणात (Secretary, Finance Department and Others Vs. West Bengal Registration Service Association and Others 1993 (Supp. (1) SCC 1.) सर्वोच्च न्यायालयाने हे मुख्यत्वे कार्यकारी सत्तेचे काम आहे असे सांगून पुढीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे :-

"It is well settled that equation of posts and determination of pay scales is the primary function of the executive and not the judiciary and, therefore, **ordinarily courts will not enter upon the task of job evaluation which is generally left to expert bodies like the Pay Commissions,** etc. But that is not to say that the Court has no jurisdiction and the aggrieved employees have no remedy if they are unjustly treated by arbitrary State action or inaction".

***(परिच्छेद ७ ते २३६ : अमुद्रित. प्रस्तावनेचा परिच्छेद ७ पहा.)***

**सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला तर्फे**

***''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा बुलेटीन'च्या विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

शुभेच्छूक : डॉ.आर.डी. सिकची (प्राचार्य) तथा प्राध्यापक वृंद

### १९५६ चा कायदा होण्यापूर्वी व झाल्यानंतरचा कालखंड

२३७. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या संदर्भात त्या त्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू होण्याबाबत या देशाच्या घटनेतील तरतुदीप्रमाणे व १९५६ च्या विद्यापीठ अनुदान आयोग कायद्यातील तरतुदीप्रमाणे एक वेगळी व्यवस्था स्थापित करण्यात आलेली आहे. ही व्यवस्था समजावून घेण्यापूर्वी भारतातील उच्च शिक्षणाच्या विकासाबाबतचा आढावा घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. ढोबळमानाने १९५६ चा कायदा होण्यापूर्वीची स्थिती व १९५६ चा कायदा लागू झाल्यानंतरची स्थिती अशा दोन कालखंडामध्ये त्याची माहिती करून घेता येईल.

### आंग्ल विद्याविभूषित होण्यामुळे महत्त्व

२३८. भारतातील उच्च शिक्षणाच्या विस्ताराचा विचार करता असे दिसून येते की, १८५४ पर्यंत शिक्षण व्यवस्थेच्याबाबतीत कोणतेही धोरण निश्चित करण्यात आलेले नव्हते. ब्रिटिश साम्राज्य व्यवस्थेचा एक भाग असलेली वसाहत म्हणून भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेवर सुद्धा ब्रिटनच्या उच्च शिक्षण पद्धतीचा प्रभाव पडायला सुरुवात झालेली होती. १९व्या शतकात उच्च शिक्षण व्यवस्थेवर जसा प्रभाव पडला तसा तो न्यायव्यवस्थेच्या कामकाजावर सुद्धा पडला असेही दिसून येते. न्यायालयीन कामकाजाची अधिकृत भाषा म्हणून पर्शियन ऐवजी इंग्रजी भाषेचा वापर १८३७ पासून सुरू झाला. राज्यकारभाराची अधिकृत भाषा म्हणून पर्शियन भाषेऐवजी इंग्रजी ही अधिकृत भाषा म्हणून १८४४ पासून राज्यकारभारामध्ये वापरली जाऊ लागली. **आंग्ल विद्याविभूषित तरूणांना वरिष्ठ पदावरील शासकीय सेवा उपलब्ध होण्याचा राजमार्ग त्यामुळे त्याकाळात उपलब्ध झाला.**

### महाविद्यालयांच्या स्थापनेची सुरुवात

२३९. भारतातील लक्षावधीच्या लोकसंख्येशी संपर्क साधण्याचे एक माध्यम म्हणून काही सुशिक्षीतांचा एक वर्ग हाताशी असला पाहिजे या भावनेतून मॅकॉलेच्या काळामध्ये ब्रिटनच्या धर्तीवर भारतामध्ये सुद्धा आंग्ल विद्याविभूषित असे सुशिक्षित लोक राज्यकर्त्यांना वाटेल एवढ्या संख्येत उपलब्ध व्हावेत असे राज्यकर्त्यांना वाटू लागले. मॅकॉलेच्याच भाषेत शब्दशः सांगायचे झाले तर असे नमूद करता येईल की, "a class who would be interpreters between us and the millions whom we govern, a class of persons Indian in blood and colour, but English in tastes, in opinions, in moral and in intellect,"[1] **("Sixty Years of University Grants Commission" - Publication of UGC यापुढे उल्लेख संदर्भ एक म्हणून.)** इकडे भारतातील काही ज्येष्ठ समाजधुरिणांनासुद्धा इंग्रजी पद्धतीच्या शिक्षणावाचून आता तरणोपाय नाही असे ठामपणे वाटायला लागले होते व ही भावना जोर धरत होती. या पार्श्वभूमीवर १८१७ मध्ये राजाराममोहन रॉय यांच्या प्रयत्नांनी कलकत्ता येथे सुरू झालेले हिंदू कॉलेज हे भारतातील पहिले महाविद्यालय म्हणून सांगता येईल. १८१८ मध्ये सेरमपोर येथे स्थापन झालेले मिशन कॉलेज, सिबपूर येथे स्थापन झालेले बिशप कॉलेज ही त्यानंतर स्थापन झालेले काही महाविद्यालये नमूद करता येतील.

### विद्यापीठांच्या स्थापनेची सुरुवात

२४०. १८५५ च्या दरम्यान इंग्रजी भाषेसह इंग्रजी शिक्षण देणाऱ्या २८१ हायस्कूलांची व २८ कॉलेजेसची स्थापना भारतामध्ये झालेली होती आणि त्यामुळेच या सर्वांच्या कामामध्ये एकवाक्यता व एकसूत्रता ठेवण्यासाठी नियामक व्यवस्था स्थापन करण्याची गरज निर्माण झालेली होती. १८५४ च्या दरम्यान प्राथमिक शिक्षणापासून तर विद्यापीठ शिक्षणापर्यंत एक सुनिश्चित व सुनियंत्रित व्यवस्था शासनाच्या नियंत्रणामध्ये स्थापित केली जावी अशा प्रकारची शिफारस वूड या शिक्षण तज्ज्ञांनी साम्राज्य सरकारला केली व त्याबरोबरच भारताचा आकार लक्षात घेता कलकत्ता, मद्रास व मुंबई या तीन ठिकाणी लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर विद्यापीठांची स्थापना करण्यात यावी अशीही शिफारस वूड यांनी केली होती. १८५७ मध्ये भारत शासनाने या तीनही विद्यापीठाच्या स्थापनेविषयीचा कायदा केला व त्यानंतर त्याचाच पुढील भाग म्हणून १८६० मध्ये इंडियन युनिर्व्हसिटीज (डिग्रीज) अॅक्ट हा मान्य करण्यात आला. त्या कायद्यामध्ये विद्यापीठांनी प्रदान करावयाच्या पदव्या व पदविका यांची यादी देण्यात आली होती. सुरुवातीला या कायद्यात मुंबई, कलकत्ता व मद्रास या तीनच विद्यापीठाची नावे असली तरी त्यात पुढे नव्याने निर्माण होणाऱ्या विद्यापीठाची नावे जोडण्याची तरतूद सुद्धा त्याच कायद्यात करण्यात आलेली होती. त्यातूनच पुढे पंजाब विद्यापीठ, अलिगड मुस्लीम विद्यापीठ ही विद्यापीठे स्थापन झालीत. अशा सुशिक्षित तरुणांमुळे राज्यकारभारासाठी सक्षम मनुष्यबळ उपलब्ध होत असल्याने संलग्न महाविद्यालयांना शासनाने आर्थिक सहाय्य केले पाहिजे हा विचार त्याच काळात प्रखरपणे मांडला जायला लागला होता.

### शासनाने अनुदान व विशेष अनुदान देण्याची व्यवस्था

२४१. भारत सरकारने १८८२ मध्ये "इंडियन एज्युकेशन कमिशनची" स्थापना केली. त्या कमिशनने संलग्न महाविद्यालयाच्या कामकाजामध्ये सुधारणा करण्याच्या बाबतीत आपल्या अहवालामध्ये संलग्न महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत पुढीलप्रमाणे शिफारस केली:-"the rate of aid to each college be determined by the strength of the staff, the expenditure on its maintenance, the efficiency of the institution, and the wants of the locality." Special grants were also to be made "whenever necessary, for the supply and renewal of buildings, furniture, libraries and other apparatus of instruction."[2] **(संदर्भ एक पृष्ठ ५)**

### लॉर्ड कर्झनने नेमलेला आयोग

२४२. विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यावरील नियंत्रणासाठीची कोणतीही नियामक व्यवस्था केंद्रस्थानी उपलब्ध नसल्यामुळे २०व्या शतकाच्या सुरुवातीला या क्षेत्रामध्ये मोठी गोंधळाची परिस्थिती होती. त्यामुळेच त्यावेळेचे गर्व्हनर जनरल लॉर्ड कर्झन यांनी या क्षेत्रातील सुधारणांच्याबाबतीत व्यक्तिशः लक्ष देण्याचे ठरविले. १७ जानेवारी १९०२ रोजी त्यांनी एक आदेश काढून **"इंडियन युनिर्व्हसिटीज कमिशन"ची स्थापना केली.** ब्रिटिश साम्राज्याखाली असलेल्या भारतातील विद्यापीठांची स्थिती व भवितव्य याबाबत, तसेच कामाच्या पद्धती याबाबत सुधारणा करण्याच्या प्रयोजनार्थ शिफारशी सादर करण्याचे काम या आयोगाकडे सोपविण्यात आलेले होते. त्या वर्षाच्या शेवटी आयोगाने आपला अहवाल सादर केला आणि लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर भारतात विद्यापीठांची स्थापना केली जावी असे प्रतिपादन केले. या आयोगाने पुढील ५ महत्त्वाच्या शिफारशी आपल्या अहवालामध्ये केल्यात. (१) विद्यापीठांच्या संचालन व्यवस्थेची पुनर्रचना करण्यात यावी. (२) संलग्न महाविद्यालयावर विद्यापीठाच्या मार्फत काटेकोर व व्यवस्थित देखरेख ठेवावी व संलग्नीकरणाच्या अटींची काटेकोर अंमलबजावणी व्हावी (३) विद्यार्थी ज्या स्थितीमध्ये राहतात व काम करतात त्या स्थितीमध्ये सुधारणा व्हावी (४) विद्यापीठांनी आपल्या परिसरामध्ये शिकविण्याचे व संशोधनाचे काम सुरू करावे (५) अभ्यासक्रम व परीक्षापद्धतीमध्ये सुधारणा करावी. अशा पाच महत्त्वाच्या शिफारशी या आयोगाच्या अहवालामध्ये होत्या. परीक्षा पास करणे व त्यातून शासकीय सेवेमध्ये कार्य करण्याची पात्रता प्राप्त करणे हे मुख्य उद्दिष्ट डोळ्यासमोर होते. उत्तम पात्रताधारक सेवकवर्ग शासकीय सेवेसाठी मिळविण्यावर लॉर्ड कर्झनचा भर असल्यामुळे त्यातून संलग्नीकरणाच्या अटी ह्या जास्त कठोर ठेवण्यावर जास्त भर देण्यात आला. लॉर्ड कर्झनच्या या सुधारणेचा परिणाम असा झाला की, भारतातील संलग्न महाविद्यालयांची संख्या ही खाली घसरली.

### परीक्षा संचालन व पदवीप्रदान हेच विद्यापीठाचे मुख्य काम

२४३. एका बाजूला आवश्यक तेवढा सेवकवर्ग शासकीय कार्यालयांसाठी मिळविणे हे साम्राज्य सरकारचे उद्दिष्ट असले तरी पाश्चात्त्य पद्धतीच्या उच्च शिक्षणामुळे होत असलेल्या अनेक फायद्यांचे व लाभांचे आकलन भारतातील राजकीय व सामाजिक नेत्यांना झाल्यामुळे महाविद्यालयांच्या स्थापनेला बराच जोर आला. कलकत्ता, मुंबई, मद्रास या मोठ्या शहरांमध्ये उच्च शिक्षणाबाबतची व्यवस्था मोठ्या प्रमाणात पुढे वाढत गेली आणि त्यामुळे १८५५-५६ च्या दरम्यान भारतात असलेल्या महाविद्यालयांची जी संख्या २१ होती त्यामध्ये वाढ होऊन ती १९२१-१९२२ मध्ये १७२ वर गेली. याच काळात विद्यार्थ्यांची संख्या सुद्धा ४३५५ वरून ५८८३७ एवढी झाली. पुढे ही संख्या सातत्त्याने


**श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट तर्फे**

*''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा बुलेटीन'च्या विशेषांकास आमच्या हार्दिक शुभेच्छा*

**उपलब्ध अभ्यासक्रम :** बी.ए., बी.कॉम., बी.एस.सी., एम.ए. - मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र, इतिहास व राज्यशास्त्र एम.कॉम.,एम.एस.सी. (रसायनशास्त्र)

**वैशिष्ट्ये :** कॉम्प्युटर लॅब, सुसज्ज ग्रंथालय, महिला वसतिगृह, जिम, भव्य क्रीडांगण, नयनरम्य परिसर

**शुभेच्छूक :** मा. हर्षवर्धन प्र. देशमुख, अध्यक्ष (श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) डॉ.ए.एल.कुलट, प्राचार्य

वाढत गेली व भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी म्हणजे १९४७ साली भारतातील विद्यापीठांची संख्या १९ एवढी होती तर संलग्न महाविद्यालयांची संख्या ४९६ होती व त्यामधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २३७५४६ होती. ही वाढ होण्यामध्ये साम्राज्य सरकारपेक्षा खाजगी समाजसुधारकांचा फार मोठा वाटा होता, असे स्पष्टपणे दिसून येते. त्यातही कला महाविद्यालयांची संख्या फार मोठी होती. व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविणारी महाविद्यालये त्यामानाने बरीच कमी होती. या काळाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असे की, बहुतेक उच्च शिक्षण हे संलग्न महाविद्यालयातून दिले जात होते. विद्यापीठाचे मुख्य काम संलग्न महाविद्यालयांचे नियमन करणे, परीक्षा संचालित करणे व पदव्या प्रदान करणे एवढ्यापुरते मर्यादित होते.

### निवासी विद्यापीठांची सुरुवात

**२४४.** विद्यापीठाच्या परिसरामध्ये विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था करावी व तेथेच त्यांनी शिक्षण व संशोधन कार्ये पार पाडावी ही व्यवस्था अस्तित्वात आली नव्हती. संलग्न महाविद्यालयावरील नियामक यंत्रणा हे विद्यापीठाचे स्वरूप सुरू राहत असतांनाच विद्यापीठाच्या परिसरातच विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था तसेच शिक्षण व संशोधनाची परिसरातच व्यवस्था उपलब्ध करून देण्याची सुरुवात १९१६ मध्ये बनारस हिंदू विश्वविद्यालयापासून सुरू झाली. महामना पंडित मदनमोहन मालवीय यांच्या पुढाकाराने या विद्यापीठामध्ये शिक्षणाचे वेगळे उद्दीष्टसुद्धा समोर ठेवण्यात आले. केवळ नोकरी मिळविण्यासाठी उच्च शिक्षण हा हेतू बाजूला ठेवून भारतीय संस्कृती, प्राचीन भारतीय परंपरा व मूल्ये यांचे शिक्षण देण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेण्याची व्यवस्था प्रथम बनारस हिंदू विद्यापीठात अस्तित्वात आली असे म्हणता येईल. भारतात असलेल्या संस्थानिक प्रदेशामध्ये म्हैसूर संस्थानात बनारस विद्यापीठाच्या मागोमागच म्हैसूर विद्यापीठाची स्थापना झाली. हैद्राबादच्या निजामानी १९१८ मध्ये उर्दूतून उच्च शिक्षणाचा हेतू समोर ठेवून हैद्राबादमध्ये उस्मानिया विद्यापीठाची स्थापना केली. पुढच्याच ५-१० वर्षामध्ये १९२० मध्ये अलीगड विद्यापीठ, १९२१ मध्ये लखनौ विद्यापीठ, त्याच वर्षी ढाका विद्यापीठ, १९२२ मध्ये दिल्ली विद्यापीठ, १९२३ मध्ये नागपूर विद्यापीठ, त्याच वर्षी आंध्र विद्यापीठ, १९२७ मध्ये आग्रा विद्यापीठ व १९२९ मध्ये अन्नामलाई विद्यापीठाची स्थापना झाली. त्यापैकी नागपूर, आंध्र, दिल्ली आणि आग्रा या विद्यापीठांचे स्वरूप संलग्न महाविद्यालयांचे नियमन करणारे विद्यापीठ असेच होते. इतर विद्यापीठांमध्ये मात्र परिसरातच विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था, शिक्षण व संशोधन सुविधा अशा स्वरूपाची व्यवस्था अस्तित्वात आली.

### विद्यापीठाची स्वायत्तता व लॉर्ड कर्झन

**२४५.** विद्यापीठाच्या स्वायत्ततेकडे पाहण्याचा लॉर्ड कर्झनचा दृष्टिकोन हा भारताची जी धुरा साम्राज्य सरकारने त्यांच्या खांद्यावर सोपविली होती तिला साजेसा होता. "विद्यापीठाला स्वायत्तता देणे हे शैक्षणिकदृष्ट्या असुज्ञपणाचे (educationally unwised) आणि राजकीयदृष्ट्या धोकादायक (politically dangerous) आहे"[3] **(संदर्भ एक पृष्ठ ८)** असे त्याचे मत होते आणि त्यामुळे त्या कालखंडामध्ये ब्रिटनमध्ये विद्यापीठांना जशी स्वायत्तता उपलब्ध होती तशी स्वायत्तता भारतीय विद्यापीठांना कधीही मिळाली नाही.

### शीर्षस्थ संस्थेची आवश्यकता

**२४६.** भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावर्षी म्हणजे १९४७ साली ३५ कोटी लोकसंख्या असलेल्या या देशामध्ये विद्यापीठातून व महाविद्यालयातून विद्यार्थ्यांची संख्या २ लाख ५० हजाराच्या जवळपास होती व त्यापैकी ८० टक्के पेक्षा जास्त विद्यार्थी हे आर्ट्स आणि सायन्स कॉलेजमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण घेत होते. स्वाभाविकपणे अल्पशी विद्यार्थी संख्या ही व्यावसायिक महाविद्यालयातून शिक्षण घेत होती. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरसुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगासारखी एखादी शीर्षस्थ संस्था अस्तित्वात असावी असा विचारप्रवाह प्रचलित होता. अगदी सुरुवातीपासून विचार केला तर असे म्हणता येईल की कलकत्ता, मद्रास आणि मुंबई ही जी तीन पहिली विद्यापीठे भारतात स्थापन झालीत, ती मुख्यत्वे परीक्षा घेणारी व पदव्या देणारी विद्यापीठे होती आणि त्यांचे मुख्य उत्पन्न हे विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी वर आधारलेले होते. अगदी सुरुवातीच्या काळात शासनाच्या एखाद्या खात्यासारखे त्यांचे काम होते असे म्हटले तर वावगे होणार नाही. विद्यापीठांची संख्या जसजशी वाढत गेली तसतसे त्यांचे काम व त्यांचा दर्जा याबाबत समन्वय साधण्यासाठीच्या शीर्षस्थ यंत्रणेची आवश्यकता भासू लागली. १९२४ साली याबाबतचा पहिला प्रयत्न झाला. सिमला येथे भारत सरकार व भारतातल्या १४ विद्यापीठांच्या प्रतिनिधींची बैठक झाली आणि त्यामध्ये All India University Organisation स्थापना करण्याचा विचार झाला. या सिमला परिषदेच्या निर्णयातून Inter University Board व त्यातून पुढे Association of Indian Universities (AIU) यांचे अस्तित्व आले. दर्जामध्ये समन्वय साधणे, परस्परांच्या पदव्यांना मान्यता देण्याची आंतरविद्यापीठ प्रक्रिया सुलभ करणे आणि विद्यापीठांची स्वायत्तता नियंत्रित ठेवण्याची जबाबदारी पार पाडणे ही मुख्ये कामे या संघटनेने आपल्या स्तरावर पार पाडली असे दिसून येते.

### तात्पुरत्या विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना

**२४७.** केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाने ४ जून १९४५ रोजी एक शासन निर्णय निर्गमित करून विद्यापीठ अनुदान समिती (University Grants Committee) ची स्थापना केली. पुढे स्थापन झालेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाची सुरुवात येथूनच झाली असे म्हणता येईल. या समितीमध्ये काम करणारे सर्व लोक हे अर्धवेळ काम करणारे होते ही एक गोष्ट व दुसरे म्हणजे त्या समितीला अधिकारसुद्धा मर्यादित होते. त्यामुळे ती समिती काही फार प्रभावीपणे कार्य करू शकली नाही. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली सन १९४८ मध्ये नेमण्यात आलेल्या "शिक्षण आयोगाने" अतिशय महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. त्यामध्ये शिक्षण हा विषय समवर्ती सूचीमध्ये ठेवण्यात यावा अशी एक महत्त्वाची शिफारस होती. केंद्र आणि राज्यसरकार मध्ये समन्वय साधणे जसे आवश्यक आहे तसेच निरनिराळ्या विद्यापीठांमध्ये सुद्धा असा समन्वय असणे आवश्यक आहे अशी या आयोगाने एक महत्त्वपूर्ण शिफारस केली. केंद्रस्थानी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करण्यात यावी अशी आणखी एक महत्त्वपूर्ण शिफारस या आयोगाच्या अहवालामध्ये होती. या आयोगामध्ये ५ सदस्य असावेत आणि त्यातील किमान ३ हे पूर्णवेळ काम करणारे असावेत, अशीही शिफारशी राधाकृष्णन आयोगाने केली. केंद्र शासनाने एक शासन निर्णय निर्गमित करून ताबडतोबीने "हंगामी विद्यापीठ अनुदान आयोग"ची (Interim University Grants Commission) स्थापना केली. या आयोगाची मुख्य कामे काय असतील हेही शासन निर्णयात नमूद केले होते. (१) केंद्रीय विद्यापीठ व इतर विद्यापीठांना अनुदान प्रदान करणे तसेच (२) इतर विद्यापीठांना व उच्च शिक्षणासाठी काम करणाऱ्या संस्थांना अनुदान देण्याबाबत शासनास सल्ला देणे ही आयोगाकडे सोपविण्यात आलेली मुख्य कामे होती.

### तात्पुरत्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे कामकाज सुरू झाले

**२४८.** देशाचे तत्कालीन शिक्षणमंत्री श्री. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी या "हंगामी विद्यापीठ अनुदान आयोगा"चे कामकाज सुरू करून दिले. डिसेंबर १९५३ मध्ये त्या आयोगाचे प्रत्यक्ष काम सुरू झाले. विख्यात शास्त्रज्ञ डॉ. शांतीस्वरूप भटनागर हे या आयोगाचे पहिले अध्यक्ष होते. नव्याने नेमण्यात आलेल्या या आयोगाची पहिली बैठक १८ डिसेंबर १९५३ रोजी पार पडली. शिक्षणमंत्री श्री. मौलाना अब्दुल कलाम आझाद यांनी या प्रसंगी केलेल्या भाषणामध्ये असे आश्वासन दिले की, आयोगाने केलेल्या शिफारशी आम्ही बंधनकारक मानू आणि आयोगाचा जो काही सल्ला असेल त्याप्रमाणे भारत सरकार निर्णय घेईल.

### उच्च शिक्षणाबाबत केंद्र व राज्य सरकारमध्ये अधिकार विभागणी

**२४९.** उच्च शिक्षणाच्या संदर्भात भारतीय घटनेमध्ये काय तरतूदी आहेत. याविषयीचा विचारसुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. भारताच्या घटनाकारांनी राज्यकारभाराच्या सर्व विषयांच्या तपशीलवार तीन याद्या तयार केल्या असून त्या तीनही याद्या भारतीय घटनेच्या सातव्या परिशिष्टामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. यातील **पहिली यादी म्हणजे केंद्रसूची.** त्यामध्ये एकूण ९७


# अकोला जिल्हा 'नुटा' शाखेतर्फे

**'नुटा बुलेटीनच्या ''वेतन आयोग संघर्ष'' या विशेषांकास आमच्या हार्दिक शुभेच्छा**

**सचिव** — प्रा.डॉ.आर.आर. रणपिसे

सर्व सभासद

**अध्यक्ष** — प्रा.डॉ.ए.एम.राऊत

विषय समाविष्ट आहेत. **दुसरी यादी म्हणजे राज्यसूची.** त्यामध्ये एकूण ६६ विषय समाविष्ट आहेत. **तिसरी यादी म्हणजे समवर्तीसूची,** त्यामध्ये एकूण ४७ विषय आहेत. केंद्रसूची मध्ये समाविष्ट असलेल्या विषयांच्या बाबतीत कायदा करण्याचे व राज्यकारभार करण्याचे अधिकार हे पूर्णपणे केंद्रशासनाकडे सोपविण्यात आलेले आहेत. तसेच राज्यसूचीतील विषयांच्या बाबतीत हे अधिकार पूर्णपणे राज्यसरकारकडे सोपविण्यात आलेले आहेत. समवर्तीसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या विषयांच्या बाबतीत हे अधिकार केंद्रशासनाला तसेच राज्यशासनाला वापरता येतील मात्र केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांच्या धोरणामध्ये परस्पर विरोध असेल तर केंद्रशासनाचे धोरण टिकेल व त्या प्रमाणात राज्यशासनाचे धोरण हे रद्द होईल.

### दर्जा निर्धारण व समन्वय हा केंद्र शासनाचा अधिकार

**२५०.** उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्थांमधून राखावयाचा दर्जा निश्चित करणे व त्यांच्यामध्ये समन्वय साधणे ("Co-ordination and determination of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions.") हा अधिकार सातव्या परिशिष्टाच्या पहिल्या सूचीमध्ये म्हणजे केंद्रसूचीमध्ये ६६व्या क्रमांकावर नमूद करण्यात आलेला आहे. या अधिकारांचा वापर करून केंद्र शासनाने वेगवेगळे कायदे केले व त्यातून UGC, AICTE, Medical Council of India, Bar Council of India, CCIM या संस्थांची निर्मिती केली.

या शीर्षस्थ संस्थांच्यामार्फत विविध क्षेत्रातील उच्च शिक्षणाचा दर्जा सुनिश्चित करणे व कार्यरत संस्थांमध्ये समन्वय साधण्याचे काम केंद्रशासन व या संस्था करीत असतात. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकाने नेमणुकीसाठी कोणती पात्रता धारण केली पाहिजे? व त्यांना कोणत्या वेतनश्रेण्या असल्या पाहिजेत? हे ठरविण्याचा अधिकार केंद्र शासनाला व विद्यापीठ अनुदान आयोगाला या अधिकार वाटणीतूनच मिळालेला आहे. भारताच्या घटनेच्या सातव्या परिशिष्टातील पहिल्या सूचीमध्ये ६६व्या क्रमांकावर समाविष्ट असलेल्या उपरोक्त विषयामुळे व विद्यापीठ अनुदान आयोग कायदा १९५६ या कायद्यातील तरतुदींमुळे मिळालेला हा अधिकार आहे.

### राज्यांचा अधिकार राज्यसूचीतून समवर्ती सूचीमध्ये समाविष्ट

**२५१.** "शिक्षण, तांत्रिक शिक्षण, वैद्यक शिक्षण व विद्यापीठे यासह" ("Education, including technical education, medical education and universities,") हा विषय मुळात घटनाकारांनी पूर्णपणे राज्यशासनाकडे सोपविलेला विषय होता व तो विषय दुसऱ्या सूचीमध्ये म्हणजे राज्यसूचीमध्ये ११व्या क्रमांकावर समाविष्ट होता. ही स्थिती ३ जानेवारी १९७७ पर्यंत कायम होती. घटनादुरुस्ती करून ३ जानेवारी १९७७ पासून हा विषय राज्यसूचीतून काढून तिसऱ्या सूचीमध्ये म्हणजे समवर्तीसूचीमध्ये २५व्या क्रमांकावर टाकण्यात आलेला आहे. त्यामुळे आता या विषयाबाबत एकछत्रीत्वाचा राज्यशासनाचा अधिकार गेला असून केंद्रसरकार हस्तक्षेप करीत नाही तोपर्यंत हा कारभार राज्यशासनाला पाहता येईल. केंद्र शासनाच्या विरोधात समवर्ती सूचीतील एखाद्या विषयाच्या बाबतीत राज्यशासनाची एखादी कृती असेल किंवा कायदा असेल तर त्या प्रमाणात राज्यशासनाचे निर्णय हे रद्दबादल ठरतील. अशी ही घटनात्मक व्यवस्था आज अस्तित्वात आहे.

### विद्यापीठ अनुदान आयोग विधेयक

**२५२.** भारताची घटना अंमलात आल्यानंतर "Co-ordination and determination of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions." याबाबतीत पूर्णपणे केंद्रशासनाकडे अधिकार असले तरी त्याबाबतीत कोणताही कायदा अस्तित्वात नसल्यामुळे उच्च शिक्षणाच्या दर्जाच्या बाबतीत केंद्र सरकारला कायदा करून अधिकार आपल्याकडे असावेत असे वाटत होते व त्यातूनच विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याचा जन्म झाला असे म्हणता येईल. "The UGC Bill" हे देशाच्या संसदेमध्ये केंद्रसरकारच्या वतीने ३० सप्टेंबर १९५४ रोजी सादर करण्यात आले. हे बिल सादर करीत असतांना सुरुवातीलाच स्पष्टपणे पुढील शब्दांमध्ये ते सादर करण्याचा हेतू नमूद करण्यात आला आहे:-

"to make provision for the coordination and determination of standards in universities and for that purpose, to establish a University Grants Commission as a statutory body."

### घटनेने दिलेले अधिकार व कायद्याची गरज

**२५३.** तत्पूर्वी २४ सप्टेंबर १९५४ रोजी हे बिल संसदेत सादर करतांना जे उद्देश व कारणांचे निवेदन देशाचे शिक्षण मंत्री श्री. मौलाना आझाद यांनी २४ सप्टेंबर १९५४ रोजी संसदेला सादर केले. त्यामध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे :-

"The Constitution of India vests Parliament with **exclusive authority in regard to coordination and determination of the standard in institution for higher education** or research and scientific and technical institutions. It is obvious that neither coordination nor determination of standards is possible unless the central government has some voice in the determination of standards of teaching and examination in universities, both old and new."

विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा सुनिश्चित करणे व त्या संस्थामध्ये समन्वय ठेवणे हा विषय घटनेने केंद्रशासनाकडे सोपविला असला तरी ते कार्य पार पाडण्यासाठी तपशीलवार तरतुदी असलेला कायदा अस्तित्वात असणे आवश्यक आहे. अशी ही मांडणी आहे.

### संयुक्त समितीचा अहवाल

**२५४.** पुढे हे विधेयक संसदेच्या उभय सभागृहाच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. समितीने त्याबाबतचा अहवाल २६ जुलै १९५५ रोजी अंतिम केला. या अहवालामध्ये समितीने स्पष्टपणे असे नमूद केले होते की, "युनिर्व्हसिटी एज्युकेशन हा राज्यसूचीतील विषय असल्यामुळे विद्यापीठीय व संलग्न महाविद्यालयांबाबतची आर्थिक जबाबदारी राज्यशासनाने पार पाडावी व केंद्रशासनाने याबाबत कोणताही भार आपल्याकडे ओढून घेऊ नये." या समितीने जेव्हा ही शिफारस केली त्या वेळेला हा विषय पूर्णपणे राज्यसरकारच्या अखत्यारीत म्हणजे राज्यसूचीत होता हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे की, आज तो विषय राज्यसूचीमध्ये नाही व समवर्ती सूचीमध्ये आलेला आहे.

### जादा भारापैकी ८० टक्के व २० टक्के भार विभागणी

**२५५.** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षणाच्या बाबतीत दर्जा निर्धारण करणे व त्या संस्थांमध्ये समन्वय ठेवणे हा विषय केंद्रशासनाकडे असल्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पातळीवर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेण्यांबाबत सातत्याने विचार होत राहिला व त्याबाबत शिफारशी १९५५ पासून होत आहेत. हुमायून कबीर यांच्या कमिटीने या विषयाला सर्वात जास्त प्राधान्य दिले पाहिजे अशी शिफारस करून त्याबाबतीत अनेक उपाययोजना सुचविल्या होत्या. कायद्याने विद्यापीठ अनुदान आयोग स्थापन होण्यापूर्वी केंद्रसरकारच्या शासन निर्णयाने हंगामी विद्यापीठ अनुदान आयोग (Interim UGC) अस्तित्वात होते ही गोष्ट यापूर्वी नमूद केलेली आहे. त्या अनुदान आयोगाने वेतनाच्या वाढीव रकमेपैकी ५० टक्के रक्कम ही आयोगाने द्यावी अशी शिफारस केली. केंद्र शासनाच्या शिक्षण खात्याने त्या वेळेला ही शिफारस फेटाळून लावली होती हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाचा कायदा झाल्यानंतर या स्थितीमध्ये फार मोठा बदल झाला.

विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या सुधारित वेतनश्रेण्या हा महत्त्वाचा विषय असल्याचे नमूद करून त्याबाबत शिफारशी करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने डॉ. ए. एल. मुदलीअर, जॉन मथाई आणि एन. के. सिद्धांत या

**VSPM Academy of Higher Education, Nagpur's**
**JAWAHARLAL NEHRU ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**
**WADI, NAGPUR**
*"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा*
Hon. Ranjitbabu Deshmukh, President Hon. Yuvraj Chalkhor, Secretary Dr.Jeevan Dontulwar, Principal

तिघांची एक कमिटी नेमली होती व याबाबत व्यावहारिक उपाययोजना सुचविणे असे काम त्या कमिटीला देण्यात आलेले होते. त्या कमिटीच्या शिफारशीनंतर वेतन सुधारणेच्या संदर्भात करावयाच्या जादा खर्चाचा ८० टक्के भार हा विद्यापीठ अनुदान आयोगाने/केंद्राने सहन करावा व २० टक्के भार त्या त्या राज्यसरकारांनी सहन करावा ही शिफारस मान्य झाली व तेव्हापासून तर सहाव्या वेतन आयोगापर्यंत तीच स्थिती प्रत्यक्ष अंमलात आहे. **(संदर्भ एक पृष्ठ ७०)**

## वेतनश्रेण्यांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता

**२५६.** सी. डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीने या शिक्षकांची गुणवत्ता व कार्यक्षमता वाढावी यासाठी शिक्षकांची पात्रता व वेतनश्रेण्या या दोनही बाबी महत्त्वपूर्ण मानल्या जाव्यात असे सूचित केले होते. त्या काळात देशामध्ये एकूणच पदव्युत्तर शिक्षणाची सोय अत्यंत मर्यादित असल्यामुळे पात्रतेच्या अटींमध्ये खूप वाढ करण्याचा प्रयत्न पूर्णपणे अयशस्वी झाला. याचे मूळ कारण म्हणजे किमान पात्रता असलेले लोकच शिक्षक म्हणून उपलब्ध होत नसत, त्यामुळे कमाल पात्रताप्राप्तीची अपेक्षा करणे ही गोष्ट एका दृष्टीने कल्पनाविलास ठरली आणि त्यामुळेच पुरेशा संख्येत विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक म्हणून उमेदवार उपलब्ध व्हावयाचे असतील तर त्यांच्या वेतनमानामध्ये सुद्धा उत्तम सुधारणा केली पाहिजे व त्यांना इतरही सुविधा प्रदान केल्या पाहिजेत या विचाराने जोर धरला. **विद्यापीठ अनुदान आयोग विधेयकामध्ये /कायद्यामध्ये असलेल्या तरतुदींचा वापर करून वेतनश्रेण्यांमध्ये उत्तम सुधारणा करण्याचा कायदेशीर मार्ग विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून उपलब्ध झालेला होता.**

## १ एप्रिल १९६६ पूर्वीची वेतनसंरचना

**२५७.** खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रकाशित केलेल्या "विद्यापीठ अनुदान आयोगाची साठ वर्षे" या पुस्तकातून उपरोक्त शिवाय आणखीही माहिती अभ्यासूंना उपलब्ध होऊ शकेल. या पुस्तकाच्या पृष्ठ ७१ वरील पुढील उल्लेख या संदर्भात लक्षात घेण्यासारखा आहे:-

"The Commission found that to enhance the salary scales of college teachers, it was necessary to frame regulations under Section 2(f) and 26 (d) of the UGC Act in order to treat the affiliated colleges as being included in the universities for purposes of grants. It prepared a list of 718 colleges who would be eligible for it."

या वेळेपावेतो शिक्षकांना अतिशय कमी प्रतीच्या वेतनश्रेण्या दिल्या जात असत. वाढत जाणारी महागाई व रुपयांचे मूल्य सतत घसरत असल्यामुळे या शिक्षकांना त्यांचे जीवनमान किमान पातळीवर टिकविणे सुद्धा कठीण होत आहे अशी स्थिती निर्माण झालेली असतांना आयोगाने वेतनश्रेण्यांची पुनर्रचना केली. महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षकांसाठी त्या वेतनश्रेण्या पुढीलप्रमाणे ठरविण्यात आलेल्या होत्या:-

| | |
|---|---|
| (१) प्राचार्य - | रु. ६००-४०-८०० |
| (२) विभाग प्रमुख - | रु. ४००-२५-७०० |
| (३) अधिव्याख्याता - | रु. २००-१५-३२०-२०-५०० |
| (४) ट्युटर/डेमॉनस्ट्रेटर - | रु. १५०-२०० |

१ एप्रिल १९६६ पूर्वी लागू केलेल्या उपरोक्त वेतन संरचनेच्या बाबतीत एक गोष्ट स्पष्टपणे नमूद केली पाहिजे ती अशी की त्यावेळेचे राज्यकर्ते व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पातळीवर काम करणाऱ्या शिक्षण तज्ज्ञांनी आपणहून विचारपूर्वक हा निर्णय घेतला होता. तेवढ्याच काटेकोरपणे त्याची अंमलबजावणी सुद्धा केली होती. या वेतनश्रेण्या लागू झाल्या तेव्हा अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ किंवा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ ह्या संघटना अस्तित्वात सुद्धा आलेल्या नव्हत्या. ८० टक्के अर्थभार केंद्र सरकार सोसणार आहे हे लक्षात घेवून कोणताही खळखळाट न करता त्यावेळच्या राज्यशासनाने या वेतनश्रेण्या या राज्यात जशाच्या तशा लागू केल्या.

## शिक्षण हा विषय राज्यसूचीतून काढून समवर्ती सूचीमध्ये टाकला

**२५८.** विद्यापीठ अनुदान आयोगाकडे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षणाबाबतची एवढी मोठी जबाबदारी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्याप्रमाणे सोपविण्यात आल्यानंतर शिक्षण हा विषय राज्यसूचीतून काढून तो समवर्तीसूचीमध्ये टाकला जावा अशा प्रकारचा विचार जोर धरू लागला. केंद्राच्या शिक्षण खात्याने श्री. पी. एन. सप्रू यांच्या अध्यक्षतेखालील संसदेच्या काही सदस्यांची एक समिती या विषयाचा अभ्यास व शिफारसी करण्यासाठी नेमली. "A Committee of Members of Parliament on Higher Education 1963" या नावाने ही समिती ओळखली जाते. शिक्षण हा विषय समवर्तीसूचीमध्ये समाविष्ट करण्याला अनेक राज्यांनी विरोध केल्यामुळे पुढे या बाबीला ताबडतोबीने यश मिळू शकले नाही हे खरे आहे. **पण त्याचबरोबर हेही खरे आहे की, १९७७ मध्ये घटनादुरुस्तीच्या मार्गाने "शिक्षण" हा विषय राज्यसूचीतून काढून समवर्ती सूचीमध्ये समाविष्ट करण्यात आला.**

## दुसऱ्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनरचनेची अंमलबजावणी

**२५९.** दरम्यानच्या काळामध्ये किमान गुणवत्तेचे शिक्षकसुद्धा सहजपणे उपलब्ध होत नाहीत ही एक गोष्ट, सतत वाढत जाणारी महागाई ही दुसरी गोष्ट आणि रुपयांची सतत घसरणारी किंमत ही तिसरी गोष्ट व केंद्र शासनामध्ये १ एप्रिल १९६६ पासून लागू झालेल्या दुसऱ्या वेतन आयोगाच्या तरतुदी ही चौथी गोष्ट. या बाबी लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने दुसऱ्या वेतन आयोगाशी समकक्ष अशा विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी सुधारित वेतनश्रेण्यांच्या नवीन वेतन संरचनेची शिफारस केली. केंद्र सरकारने ही शिफारस मान्य केली व १ एप्रिल १९६६ पासून ती लागूही करण्यात आली. १ एप्रिल १९६६ पासून लागू करण्यात आलेल्या या वेतनश्रेण्यांची रचना पुढीलप्रमाणे होती :-

### पदव्युत्तर महाविद्यालये

| | |
|---|---|
| (१) प्राचार्य - | रु. ८००-५०-१२५० |
| (२) रीडर/वरिष्ठ अधिव्याख्याता - | रु. ७००-४०-११२० |
| (३) लेक्चरर (वरिष्ठ श्रेणी)- | रु. ४००-३०-६४०-४०-८०० |
| (४) अधिव्याख्याता (निम्न श्रेणी) - | रु. ३००-२५-६०० |
| (५) ट्युटर/डेमॉनस्ट्रेटर - | रु. २५०-१५-४०० |

### पदवी महाविद्यालये

| | |
|---|---|
| (१) प्राचार्य - | रु. ७००-४०-११०० |
| (२) अधिव्याख्याता (वरिष्ठ श्रेणी)- | रु.४००-३०-६४०-८०० |
| (३) अधिव्याख्याता (कनिष्ठ श्रेणी) - | रु. ३००-६०० |
| (४) ट्युटर/डेमॉनस्ट्रेटर - | रु. २५०-१५-४०० |

## ८० टक्के व २० टक्के

**२६०.** केंद्रशासनाने ही शिफारस मान्य केली आणि ही शिफारस अंमलात आणण्यासाठी राज्यशासनाला विशेष आर्थिक सहाय्य देण्याचाही निर्णय घेतला. ह्या वेतनश्रेण्या लागू करण्यामुळे जो जादाचा आर्थिक भार येईल त्या आर्थिक भाराच्या ८० टक्के रक्कम केंद्रशासनाकडून पुढील ५ वर्षांपर्यंत राज्यशासनाला दिली जाईल. अतिरिक्त भाराचा २० टक्के भाग हा राज्यशासनाने सोसला पाहिजे तो विद्यापीठावर टाकता कामा नये अशीही एक अट त्यामध्ये नमूद होती. **(संदर्भ एक पृष्ठ ८८-९९)**

## पदवीदान समारंभावर बहिष्कार घालण्याचा 'नुटा'चा कार्यक्रम

**२६१.** सन १९६८-६९ या वर्षी मी 'नुटा'चा उपाध्यक्ष होतो. तत्पूर्वी २-३ वर्षे संघटनेत सक्रिय कार्यकर्ता म्हणून कार्यरत होतो. त्या वर्षादोन वर्षामध्ये

*गंगाई बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था द्वारा संचालित*

**महाजन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वडगांव, आर्णी रोड, यवतमाळ**

*''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा*

सदाशिवराव महाजन, संस्थापक सचिव

दुसऱ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्यापासून फक्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनाच खड्यासारखे बाजूला टाकण्यात आले होते. यामुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांमधे तीव्र असंतोष होता. उच्च शिक्षणाचा स्तर कायम ठेवणे, दर्जा टिकवून ठेवणे तसेच सर्व राज्यात व सर्व विद्यापीठात त्या पातळीवर समन्वय राखण्याचे काम देशाच्या घटनेप्रमाणे केंद्रशासनाकडे सोपविण्यात आले होते. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचा कायदा झाला व आयोगाची स्थापना केंद्र शासनाने केली या गोष्टीला १०-१२ वर्षाचा काळ उलटून गेला होता. केंद्र शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी वेतनश्रेण्या केवळ जाहीर केल्या नव्हत्या तर त्यामुळे येणाऱ्या जादा भारापैकी ८० टक्के भार उचलण्याचा केंद्राचा शासननिर्णय निर्गमित झाला होता. एक रुपयाची देखील आर्थिक मदत कोठूनही मिळत नसतांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना वेतन आयोग शासनाने लागू केला होता. मात्र विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना वाळीत टाकले होते, याची खूपच मोठी चिड प्राध्यापकांमध्ये त्यावेळी होती. त्यावेळी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची स्थापना झालेली नव्हती. खुद्द 'नुटा'ची स्थापना होऊन ४-५ वर्षाचा काळसुद्धा झालेला नव्हता. असंतोष तर अत्यंत तीव्र होता. **परिणामतः नुटाच्या कार्यकारी मंडळाने २० जानेवारी १९६८ रोजी होणाऱ्या नागपूर विद्यापीठाच्या पदवीदान समारंभावर बहिष्कार घालण्याचा कार्यक्रम जाहीर केला.**

## दीक्षान्त समारंभाला विरोध वाढत गेला

**२६२.** विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा असा हा समारंभ असतो व त्यामुळे सर्व शिक्षक सुद्धा त्यामध्ये मनापासून व उत्साहाने सहभागी होत असतात. खरे म्हणजे मुळात संघटनेने घेतलेल्या बहिष्काराच्या निर्णयामध्ये आपण त्या समारंभात सहभागी व्हायचे नाही एवढेच अभिप्रेत होते. पण आता शिक्षकांच्या संघटनेनेच या समारंभावर बहिष्कार घातल्यामुळे नागपूरातील वातावरण सपाट्याने बदलत गेले. गुरुवर्य डॉ. भाऊसाहेब कोलते हे त्यावेळी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू होते. (१) विद्यापीठाचे कुलगुरू या नात्याने डॉ. भाऊसाहेबांच्या थेट व सच्च्या वागण्याचे चटके बसलेल्या सत्ताधारी पक्षातील काही लोकांनी त्यांची फजिती करण्याची नामी संधी म्हणून या प्रसंगाकडे पाहिले. (२) भाऊसाहेबांनी नागपूर विद्यापीठामध्ये मराठी भाषेला प्रतिष्ठित करण्याचा एक मोठा प्रयत्न त्यावेळी सुरू केला होता. सर्व पदव्यांची इंग्रजी नावे मराठीत केली, पदवी-पत्राचा मजकूर मराठीत तयार केला, पदवीदान समारंभात कुलगुरूसमोर अधिष्ठात्यांनी आपापल्या विद्या शाखेतील पदवीधारक सादर करतांना उच्चारावयाची भाषणे, हे सर्व मराठीत तयार करून घेतले. (३) दीक्षांत समारंभाचे इंग्रजी स्वरूप बदलून त्याला भारतीय स्वरूप देण्यासाठी जे जुने झगे, टोप्यांची शिफ्तरे वगैरे सर्व काढून टाकून त्याऐवजी निरनिराळ्या पदव्यांसाठी निरनिराळ्या रंगांची, घडीच्या उपरण्याप्रमाणे शोभणारी उत्तरीये तयार करण्यात आली होती. (४) हा समारंभ भारतीय पद्धतीने मराठीतून होणार, याची वर्णने वर्तमानपत्रांनी द्यावयाला सुरुवात केली होती. पदव्यांची नावे व पदवीपत्रेही मराठीतून दिली जाणार, या बातम्यांनी मराठी-अमराठी वादाची फोडणी सुद्धा या प्रकरणात दाखल झाली. (५) भाऊसाहेब कोलते यांना त्यावेळी केंद्र शासनाचा पद्म पुरस्कार मिळण्याची शक्यता असल्याच्या बातम्या त्यापूर्वी महिना दोन महिने अगोदर वृत्तपत्रात आल्या होत्या, येत होत्या, त्यामुळे काहींच्या पोटात दुखू लागले होते. असे खुद्द भाऊसाहेब कोलते यांनीच कालांतराने सांगितले. (पृष्ठ ५८९ 'अजूनि चालतोची वाट')

## विद्यार्थी संघटनांनी आंदोलने घोषित केली

**२६३.** शिक्षकांप्रमाणेच विद्यार्थ्यांच्या अनेक मागण्या अनेक दिवसांपासून शासनाकडे व विद्यापीठाकडे पडून होत्या. त्याकडे लक्ष देण्यासाठी कोणाजवळही वेळ नव्हता/नसतो. त्यातल्या कोणत्या मागण्या योग्य व कोणत्या अयोग्य आहेत हे पाहण्यासाठी सुद्धा शासनात कोणीही तयार असत नाही. साठलेला सारा असंतोष अशा वेळी उफाळून वर येतो. ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन या संघटनेने आपल्या काही मागण्यासाठी पदवीदान समारंभाच्या दिवशी निदर्शने करण्याचा निर्णय घोषित केला. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेनेसुद्धा आपल्या मागण्यासाठी महाराज बागेच्या प्रवेशद्वाराजवळ त्या दिवशी निदर्शने करण्याची घोषणा केली.

## दीक्षान्त समारंभाच्या मुख्य पाहुण्यांनी उपस्थित राहाण्यास नकार कळविला

**२६४.** या साऱ्या गदारोळामध्ये "पदवीदान समारंभ आणि विद्यापीठ यांची प्रतिष्ठा कमी होईल असे कुणीही काहीही करू नये" असे एक पत्रक विद्यापीठांच्या काही हितचिंतक ज्येष्ठ नागरिकांनी काढले. त्याचा काही चांगला परिणाम होणे बाजूला राहिले पण या पदवीदान समारंभासाठी मुख्य पाहूणे म्हणून येण्याचे ज्यांनी मान्य केले होते ते **केंद्र शासनातील शिक्षणमंत्री श्री. त्रिगुण सेन यांनी आपल्याला "दिक्षांत समारंभासाठी येता येणार नाही" असे कळविले.** वेळेवर कसे तरी 'दादापूता' केल्यावर न्या. भवानीशंकर नियोगी यांनी प्रमुख पाहूणे म्हणून येण्याचे मान्य केले. या सर्व बातम्या रोज वृत्तपत्रातून येत होत्या. पदवीदान समारंभ उधळला जाणार हे जवळजवळ स्पष्ट दिसू लागले होते.

## आंदोलन मागे न घेण्याचा 'नुटा'चा निर्णय

**२६५. संघटनेमध्ये डॉ. भाऊसाहेब कोलते यांच्या विषयी व्यक्तीशः आदर असणाऱ्या शिक्षकांची संख्या मोठी होती, ही गोष्ट खरी असली तरी आता काहीही झाले तरी बहिष्कार मागे घेऊ नये याबाबत जवळ जवळ एकवाक्यता होती.** दुर्दैवाने पदवीदान समारंभ उधळल्या गेला तर त्या उधळणूकीशी संघटनेचा दुरान्वयानेसुद्धा सबंध नाही हे स्पष्ट व्हावे म्हणून त्यावेळच्या संघटनेतील शिर्षस्थ नेत्यांनी एक महत्वपूर्ण अशी योजना आखली. **ती योजना अशी होती की तिकडे पदवीदान समारंभ सुरू होण्यापूर्वी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची एक सभा बोलवावी व तो समारंभ संपेपर्यंत ती सभा सुरूच ठेवावी.** त्यावेळी संघटनेच्या सभा विद्यापीठ ग्रंथालयातील रुम नं. १४ किंवा १७ मध्ये होत असत. पूर्वनियोजनाप्रमाणे त्याठिकाणी ती सभा सुरू झाली व पदवीदान समारंभ आटोपेपर्यंत सुरूच राहिली.

## मोठ्या गोंधळात दीक्षान्तसमारंभ पार पडला

**२६६.** दिनांक २० जानेवारी १९६८ रोजी तिकडे पदवीदान समारंभात काय झाले याची थोडक्यात माहिती करून घेऊ. कुलगुरू, मुख्य पाहूणे, कार्यकारी परिषदेचे सभासद, विद्या शाखांचे अधिष्ठाते व कुलसचिव यांची मिरवणूक येऊन व्यासपीठावर स्थानापन्न झाली आणि पदवीदान समारंभाला सुरुवात झाली. सरस्वती-स्तवन संपून पीएच.डी. प्राप्त विद्यार्थ्यांना त्यांच्या पदव्या देण्यात आल्या न आल्या तोच मंडपात मागच्या बाजूला बसलेल्या काही विद्यार्थ्यांनी गडबड करायला सुरुवात केली. त्यातील काही विद्यार्थी आपले उत्तरीय डोक्याभोवती फिरवीत "हुड और गाउन की फी लौटा दो" अशा घोषणा देत होते. त्याच वेळी मागे बसलेल्या काही विद्यार्थ्यांनी "हिंदी मे बोलो" अशी घोषणा देत गोंधळ घालण्याला सुरुवात केली. खुर्च्यांची फेकाफेक झाली. त्यासरशी मंडपातील पाहुणे व पदव्या घेण्यासाठी आलेले विद्यार्थी घाबरून उभे राहून मागे पाहू लागले. समारंभ उधळला जात आहे हे लक्षात येताच सर्व शाखातील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पदव्या एकाच वेळी दिल्याचे मा. कुलगुरूंनी घोषित केले व मुख्य पाहुणे न्यायमूर्ती नियोगी यांना आपले दीक्षान्त भाषण करण्याची विनंती केली. त्यांनीही एकंदर रागरंग ओळखून सर्व पदवीधारकांना आशीर्वाद दिला व दोन-तीन मिनिटांत आपले भाषण संपवले. त्याच वेळी, काही विद्यार्थ्यांनी मंडपात गोंधळ चालू केल्याचे कळल्यावरून, बंदोबस्तासाठी असलेले त्यावेळचे पोलीस-कमिश्नर श्री. गोवर्धन व त्यांचे काही सहकारी पोलीस-अधिकारी आत आले व त्यांच्याशी या विद्यार्थ्यांची बाचाबाची सुरू झाली. **गोंधळ लक्षात घेऊन, समारंभ संपल्याचे मा. कुलगुरूंनी घोषित केले. अशा रितीने हा दीक्षान्त समारंभ मोठ्या गोंधळात संपला.**

## लहानशा आंदोलनातून समोर आलेले निष्कर्ष

**२६७.** नागपूर विद्यापीठामध्ये पदवीदान समारंभाच्या प्रसंगी उपरोक्त जो प्रकार घडला, **त्यामुळे शासनाकडील नकारघंटेचे वाजणे बंद पडले. ताबडतोब**

राधाकीसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला तर्फे
''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा बुलेटीन'च्या विशेषांकास हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छूक : डॉ.विजय नानोटी (प्राचार्य) व प्राध्यापक वृंद

**पावले उचलली नाहीत तर ही साथ राज्यभरातील सर्व विद्यापीठात पसरल्याशिवाय राहाणार नाही याची अत्यंत अस्वस्थ करणारी जाणीव राज्यकर्त्यांना झाली व लवकरच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याची घोषणा शासनातर्फे करण्यात आली.** याचे फार मोठे श्रेय तत्कालीन मा. शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव उर्फ बाळासाहेब चौधरी यांनासुद्धा द्यावे लागेल. यानंतर नागपूर येथे निघालेल्या प्राध्यापकांच्या मोर्चाला सामोरे जावून त्यांनी नव्या वेतनश्रेण्या मान्य करीत असल्याची घोषणा केली. 'नुटा'च्या स्थापनेनंतर अशा प्रकारच्या आंदोलनाला संघटना प्रथमच सामोरे गेली होती. या सर्व प्रसंगातून संघटना तावून सुलाखून बाहेर पडली. या प्रकारातून काही बाबी ठळकपणे समोर आल्यात. :-

(१) आपले म्हणणे कितीही योग्य असले तरी, आपले युक्तिवाद कितीही तर्कशुध्द असले तरी, आंदोलनाची शक्ती जोपर्यंत त्या युक्तिवादामागे उभी होत नाही तोपर्यंत राज्यकर्त्यांना त्याबाबत विचार करायलासुद्धा वेळ नसतो. निर्णय घेणे तर दूरच राहते.

(२) व्यावसायिक संघटनेने एकदा विचारपूर्वक लहानमोठ्या आंदोलनाचा निर्णय घेतल्यानंतर ठामपणे आपल्या भूमिकेवर कायम राहिले पाहिजे.

(३) भीती, राग, लोभ, ममत्व किंवा वैरत्व (कोणाचेही व कोणतेही) यांची बाधा आपल्या आंदोलनाला होणार नाही व त्यापायी आंदोलन या बाजूला किंवा त्या बाजूला भरकटत जाणार नाही याची सातत्त्याने काळजी घेतली पाहिजे.

### 'नुटा'चे धोरण उजळून निघाले

**२६८.** संघटनेतील शीर्षस्थ नेत्यांनी **"होय! बहिष्कार आंदोलन हे संघटनेचे आहे. पण समारंभ उधळण्याच्या प्रकाराशी संघटनेचा काहीही संबंध नाही,"** हे ठसविण्यासाठी जी योजना आखली होती, ती कमालीची यशस्वी झाली. कुणीही दुरान्वयाने सुद्धा त्याबाबत संघटनेला दुषण दिले नाही. इतरांचे सोडा, खुद्द डॉ. भाऊसाहेब कोलते यांनी याबाबतीत पुढे २०-२५ वर्षांनी जे "प्रमाणपत्र" नमूद केले, ते मला संघटनेच्या दृष्टीने खूपच मोलाचे वाटते. सन १९९४ मध्ये प्रकाशित झालेल्या **"अजुनि चालतोचि वाट"** या आपल्या आत्मचरित्रात सुरुवातीला पृष्ठ ५८७ वर भाऊसाहेबांनी या प्रसंगाबाबत "त्याच-वेळी 'नुटा' (नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन) ने विद्यापीठ अनुदान आयोगाने शिक्षकांसाठी सुचविलेली वेतनश्रेणी विद्यापीठात अंमलात आणली नाही म्हणून शिक्षकांनी पदवीदान समारंभावर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले होते." असे नमूद केले असून पृष्ठ ५८८ वर खुद्द पदवीदान समारंभाच्या दिवशीचा वृत्तांत सांगतांना हे "प्रमाणपत्र" पुढील शब्दात प्रदान केलेले आहे. :-

"२० जानेवारी १९६८. दीक्षान्त-समारंभाचा दिवस उगवला. सकाळच्या वर्तमानपत्रातील प्राध्यापकांचा बहिष्कार, विद्यार्थ्यांची निदर्शने इत्यादिकांच्या बातम्यांवरून समारंभ निर्विघ्नपणे कसा पार पडेल या विषयी शंकेची पाल माझ्या मनात चुकचुकली. दुपारी समारंभासाठी मी विद्यापीठाकडे जायला निघालो. **बहिष्कार घालणाऱ्या 'नुटा'च्या प्राध्यापकांची सभा विद्यापीठ ग्रंथालयात चालू असल्याचे कळले. तेव्हा पदवीदान-समारंभात त्यांचा प्रत्यक्ष उपद्रव होणार नाही या कल्पनेने हायसे वाटले."**

### वरिष्ठ श्रेणीच्या व्यवस्थेची सुरुवात

**२६९.** विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रस्तावित केलेली व केंद्रशासनाने मान्य केलेली वेतनश्रेण्यांची ही संरचना १ एप्रिल १९६६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात आली. या योजनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, यापूर्वी बढतीची कोणतीही सुविधा महाविद्यालयीन शिक्षकांना उपलब्ध नव्हती. या योजनेने ती उपलब्ध करून दिली. उपलब्ध करून देण्यात आलेली बढतीची योजना फारशी समाधानकारक नव्हती, हे खरे असले तरी अशी व्यवस्था स्थापित करण्याचा हा पहिला प्रयत्न होता हे लक्षात ठेवले पाहिजे. अधिव्याख्यात्यांची **मूळ वेतनश्रेणी** या योजनेमध्ये रु. ३००-६०० अशी होती व अधिव्याख्यात्यांची **वरिष्ठ वेतनश्रेणी** रु.४००-८०० अशी होती. एखाद्या महाविद्यालयात अधिव्याख्यात्यांच्या एकूण जेवढ्या जागा असतील त्यापैकी २५ टक्के जागा ह्या अधिव्याख्यात्यांच्या वरिष्ठ श्रेणीसाठी ठेवण्यात याव्यात अशी व्यवस्था या योजनेमध्ये अंतर्भूत होती. अधिव्याख्यात्यांची वरिष्ठ श्रेणीमध्ये बढती ही पूर्णपणे सेवाज्येष्ठतेच्या आधारावर देण्यात यावी असेही या योजनेमध्ये विहित करण्यात आलेले होते. संबंध देशभर सेवाज्येष्ठतेचे निकष यापूर्वी काटेकोरपणे ठरविण्यात आलेले नसल्यामुळे सेवाज्येष्ठता कशी ठरवावी याबाबत साऱ्या देशभर मोठ्या प्रमाणात वाद झालेत व शेकडो प्रकरणे न्यायालयात दाखल झालीत आणि त्यामुळे १० वर्षानंतरच्या पुढच्या वेतनसंरचनेत ही पद्धती टाकाऊ म्हणून बाजूला सारावी लागली.

### वरिष्ठ अधिव्याख्यात्यांची २५ टक्के पदे

**२७०.** काही ठरावीक वर्षाचा पदवी वर्गांना शिकविण्याचा व त्याशिवाय एक वर्षाचा पदव्युत्तर वर्गांना शिकविण्याचा अनुभव असेल तर अशा शिक्षकाला रु. ७००-११२० या **वरिष्ठ अधिव्याख्यात्यांच्या वेतनश्रेणीमध्ये बढती देण्यात यावी** अशीही एक व्यवस्था या वेतनपूनर्रचनेमध्ये होती. त्यामध्ये अशी पदे एकूण संख्येच्या २५ टक्के असतील अशी तरतूद होती. त्याचा एक परिणाम असा झाली की, ज्या महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणांची व्यवस्था उपलब्ध नव्हती अशा महाविद्यालयांतील शिक्षक तासिका तत्त्वावर पदव्युत्तर महाविद्यालयांमध्ये शिकविण्यास जाऊन पदव्युत्तर वर्गांना शिकविण्याचा एक वर्षाचा अनुभव घेत व मग त्यांना ही वेतनश्रेणी मिळू शकत असे. यातून सुद्धा देशभरामध्ये वाद निर्माण झालेत. किती तासिका पदव्युत्तर वर्गाच्या घेतल्या म्हणजे एक वर्षाचा अनुभव प्राप्त होतो? हा त्या वादाचा मुख्य विषय होता. या व्यवस्थेतील अनेक गोष्टी कृत्रिम असल्यामुळे बढतीच्या वेतनश्रेण्यांच्या पुनर्रचनेची केलेली ही पद्धतसुद्धा टाकाऊ म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाला पुढच्या वेतन पुनर्रचनेत रद्द करावी लागली असे दिसून येते.

### १९६६ पूर्वी व १९६६ नंतरची व्यवस्था

**२७१.** विद्यापीठ अनुदान आयोगाने १ एप्रिल १९६६ पासून दुसऱ्या वेतन आयोगाशी समकक्ष अशा वेतनश्रेण्यांच्या पुनर्रचनेविषयी थोडक्यात सांगायचे तर असे म्हणता येईल की, एखाद्या महाविद्यालयामध्ये एकूण १०० शिक्षकीय पदे असतील तर त्यापैकी ५० पदे अधिव्याख्यात्यांच्या मूळ श्रेणीमध्ये (रु. ३००-६००) राहतील. २५ पदे ही अधिव्याख्याता वरिष्ठ श्रेणीमध्ये (रु. ४००-८००) व २५ पदे ही वरिष्ठ अधिव्याख्याता/रिडर श्रेणीमध्ये (७००-११२०) राहतील. अशी ही व्यवस्था होती. १ एप्रिल १९६६ च्या पूर्वी अस्तित्वात असलेली विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनसंरचनेची माहितीसुद्धा यापूर्वीच्या परिच्छेदातून दिलेली आहे. ही माहिती काळजीपूर्वक लक्षात घेतली तर असे दिसून येईल की, १ एप्रिल १९६६ च्या पूर्वीची व्यवस्था ही कोणताही खळखळाट न करता, कोणतेही आंदोलन न करता लागू करण्यात आलेली होती. याचे मुख्य कारण म्हणजे किमान पात्रता धारण करणारे शिक्षक त्या काळामध्ये उपलब्ध होत नसत व त्यामुळे आकर्षक वेतन व्यवस्था समोर ठेवल्याशिवाय असे शिक्षक उपलब्ध होणार नाहीत, याविषयीची जाणीव त्या वेळेच्या राज्यकर्त्यांच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मनामध्ये तीव्रतेने वास्तव्य करीत होती असे सांगता येईल.

### संघटित होण्याच्या आवश्यकतेचे घडलेले दर्शन

**२७२.** १ एप्रिल १९६६ पासून लागू झालेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पुनर्रचित वेतन योजनेविषयी असे नमूद करता येईल की, वर सांगितलेल्या कारणामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्तरावरून व केंद्रशासनाच्या स्तरावरून ही योजना लगोलग बाहेर पडली असली तरी अनेक राज्यांमध्ये राज्यसरकारांनी खळखळाट केल्यामुळे त्या त्या राज्यातील शिक्षक संघटित झाल्याशिवाय आपल्याला पर्याय नाही अशी भावना शिक्षकांच्यामध्ये तीव्रतेने निर्माण होऊ लागली होती. खुद्द महाराष्ट्रामध्येसुद्धा पदवीदान समारंभावर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन करावेच लागले होते. विशेषतः वरिष्ठ श्रेणी प्रदान करण्याच्या बाबीवर व ७००-११२० या वेतनश्रेणीमध्ये बढती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या अत्यंत दोषपूर्ण अटींमुळे शिक्षकांना संघटित होण्याची आवश्यकता तीव्रतेने भासू लागली होती.

### संघटित होण्यासाठीची तात्कालिक कारणे

**२७३.** सन १९६० ते १९७० या काळात देशभर विद्यापीठीय व

Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Sanstha's
**Saraswati Bhavan Convent & High School** (State & CBSE) Class - Nursery to X, **Saraswati Junior College,**
XI & XII (General Science & Bio-focal-Electronic & Computer Science), XI & XII (Arts, Marathi Commerce & English Commerce),
**Ramkrishna Wagh Arts & Commerce Senior College,** B.A., B.Com (Comp. Appli.), B.B.A.
**Saraswati Convent, Patansaongi** (Class Nursery to XII)
**Koradi Road, Patel Petrol Pump, Nagpur** "वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा
Shri. Madhukar A. Wakade, President Dr. M.R. Wagh, Secretary

महाविद्यालयीन शिक्षक संघटित झाले नाहीत तर त्यांचे काही खरे नाही अशी भावना तीव्रतेने निर्माण झालेली होती व होत होती. याची मुख्ये कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील. (१) एकतर अनेक राज्यांमध्ये १९६६ पूर्वीची वेतन व्यवस्थासुद्धा अंमलात आणल्या गेली नव्हती. (२) आता १ एप्रिल १९६६ पासून विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रस्तावित केलेली व केंद्रशासनाने मान्य केलेली व्यवस्था अंमलात आणण्यामध्ये अनेक राज्यांनी प्रतिकूल भूमिका घेतली होती. (३) तिसरे व आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे इतर सर्व नोकऱ्यांमध्ये बढतीची काहीना काही व्यवस्था उपलब्ध असते पण शिक्षकांना मात्र शिक्षक म्हणूनच सेवेला सुरुवात करावी लागत असे व त्याच पदावरून त्याच्या सेवेचा शेवट होत असे. १९६६ पूर्वी अशी कोणतीही व्यवस्था उपलब्ध नव्हती. १९६६ नंतर अशी व्यवस्था अस्तित्वात आली पण ती अत्यंत दोषपूर्ण होती.

### अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाची स्थापना

**२७४.** विद्यापीठ स्तरावरील भारतातील सर्वात पहिली संघटना म्हणजे पश्चिम बंगालमधील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघटना होय. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या कितीतरी अगोदरपासून ती संघटना कार्यरत होती. १९२६ साली ती संघटना स्थापन झाली. जगप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ आचार्य प्रफुल्लचंद्र रे (P.C.Ray) हे त्या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष. दुसऱ्या वर्षीचे (१९२७) संघटनेचे अध्यक्ष म्हणजे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन (जे नंतर भारताचे उपराष्ट्रपती व राष्ट्रपती होते.) १९२८ मध्ये प्राचार्य गिरिशचंद्र बोस, १९३१ मध्ये नोबल पारितोषक विजेते प्रा. सी. व्ही. रमण, १९३५ मध्ये प्रा.एच.के.सेन, १९४९ मध्ये प्रा. एस. पी. मुखर्जी व १९८१ मध्ये प्रा. इरफान हबीब अशी काही या संघटनेच्या नामांकीत अध्यक्षांची नावे नमूद करण्यासारखी आहेत.

१९६२ साली पश्चिम बंगाल व उत्तरप्रदेश या राज्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या प्राध्यापक संघटनांच्या नेत्यांनी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या (AIFUCTO) स्थापनेमध्ये पुढाकार घेतला. दिनांक २४ एप्रिल १९६२ रोजी वाराणशी येथे उदय प्रताप कॉलेजमध्ये अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाची स्थापना झाली. कलकत्त्याचे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. मनिंद्र मोहन चक्रवर्ती हे संघटनेचे पहिले अध्यक्ष व जोनपूरचे प्राचार्य हृदय नारायण सिंग हे पहिले सरचिटणीस होते. या संघटनेचा रौप्यमहोत्सव १९८६ मध्ये व सुवर्ण महोत्सव २०१२ मध्ये संपन्न झाला.

### महाराष्ट्रातील संघटनात्मक बांधणी

**२७५.** नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाची (NUTA) स्थापना १७ मार्च १९६३ रोजी झाली. मुंबई विद्यापीठ शिक्षक संघटनेची (BUCTU) स्थापना ऑक्टोबर १९६६ मध्ये झाली. या दोन संघटनांनी आपले सुवर्णमहोत्सव नुकतेच संपन्न केलेले आहेत. १९७३ मध्ये मराठवाडा विद्यापीठ शिक्षक संघटना (MUCTA) व जानेवारी १९७४ मध्ये पुणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघटना (PUCTO) स्थापन झाली. ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७५ मध्ये शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाची (SUTA) स्थापना झाली. त्या त्या शहरापुरते काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या संघटना महाराष्ट्रातील काही शहरांमध्ये अस्तित्वात होत्या.

### महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची स्थापना

**२७६.** १९६० ते १९७५ या काळात विद्यापीठनिहाय शिक्षक संघटनांची स्थिती वरीलप्रमाणे होती, या सर्व संघटनांना एका सूत्रामध्ये बांधून महाराष्ट्र स्तरावर संघटनेचे छत्र अस्तित्वात येणे आवश्यक होते. नुटाचे अध्यक्ष प्रा. बी. टी. देशमुख यांनी ऑक्टोबर १९७४ मध्ये नागपूर येथे बोलाविलेल्या महाराष्ट्रातील प्राध्यापक नेत्यांच्या बैठकीमध्ये याबाबतचा विचार मान्य करण्यात आला व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची (MFUCTO) प्रत्यक्ष स्थापना २ एप्रिल १९७५ रोजी मुंबई येथे बोलाविलेल्या बैठकीमध्ये झाली. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ प्राध्यापक नेते श्री. सी. आर. सदाशिवन यांनी लिहिलेल्या "Formation of the MFUCTO" या लेखामधील पुढील मजकूर पहा :-

"In October 1974, Prof.B.T.Deshmukh had called a meeting of teachers from different units which was held at the residence of Prof. Phansalkar. From the BUCTU, Prof. Theckedath and the Late Prof. Sudhir Yardi attended the meeting. It was this meeting which led the foundation for unity of all teachers in the State because in that meeting it was decided to have some kind of coordination among the university and College teachers..... On 2nd April 1975, the Maharashtra State Federation of University & College Teachers Organizations (MFUCTO) was formed. Later on the word 'State' was dropped and it became MFUCTO." **(पृष्ठ १०६ संदर्भ दोन)**

### नुटाची महत्वपूर्ण भूमिका

**२७७.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे संस्थापक सरकार्यवाह व अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष, देशातील शिक्षक चळवळीचे ज्येष्ठ नेते डॉ. किशोर ठेकेदत्त हे, नुटाचा जो रौप्यमहोत्सवी समारंभ नागपूर येथे दिक्षांत सभागृहामध्ये दिनांक १६ मार्च २०१४ रोजी पार पडला, त्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी केलेल्या भाषणामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेच्या कामात नुटाने बजाविलेल्या भूमिकेचा मोठा गौरवपूर्ण व यथोचित उल्लेख केला. तो पुढील शब्दात :-

"The NUTA represents the struggles and aspirations of the college and university teachers of the Nagpur University and the Gadge Maharaj University. But I should say that NUTA happens to have a greater importance for the entire state of Maharashtra. **The NUTA is one of the founding associations of the statewide movement of teachers in Maharashtra. I would say that the MFUCTO, of which Professor B.T.Desmukh and I have been founder members, was itself started on the initiative of the NUTA.** I remember with pride the journey that my late friend Prof Sudhir Yardi and I undertook from Mumbai to Nagpur in October 1974 to attend a meeting at the invitation of Prof. Arvind Barhate and Prof. B.T.Deshmukh. At that meeting, which was attended by about fifteen teacher leaders, mainly from Kolhapur, Pune and Mumbai, the important decision was taken that our respective organizations should work together. Thereby a conceptual foundation was laid for the creation of a statewide association of teachers. **So I can say with authority that the NUTA can take credit for the conception of the MFUCTO."** *(P140NB2014)*

### दोन शिक्षणमंत्र्यांचे दोन दृष्टिकोन

**२७८.** शिक्षणमंत्री बदलले की, मग शिक्षण व शिक्षक यांच्याकडे पाहण्याचा शासनाचा दृष्टिकोन कसा बदलतो याचे सुंदर उदाहरण म्हणून दुसऱ्या व तिसऱ्या केंद्रीय वेतन आयोगाशी समकक्ष विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांची महाराष्ट्रात अंमलबजावणी करतांना शिक्षणमंत्री असलेल्या त्यावेळेच्या दोन शिक्षणमंत्र्यांचे देता येईल. श्री. मधुकरराव उर्फ बाळासाहेब चौधरी व श्री. अनंत नामजोशी अशी त्या दोन शिक्षणमंत्र्यांची नावे सांगता येतील. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रात अंमलात आणतांना या दोन शिक्षणमंत्र्यांची वृत्ती कशी होती याचे मी काही वेगळे वर्णन करण्यापेक्षा संघटनेचे दिवंगत ज्येष्ठ नेते श्री. संभाजीराव जाधव यांनी **"महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एम्फक्टो) प्रारंभ व घडामोडी"** या आपल्या लेखामध्ये जे वर्णन केलेले आहे, ते जसेच्या तसे उधृत करणे मला जास्त श्रेयस्कर वाटते. ते पुढीलप्रमाणे :-

"मुंबई विद्यापीठ शिक्षक संघ (त्यावेळी 'बुट्ट' आता 'बुक्टू') आणि नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ ('नुटा') ह्या दोन संघटना सन १९७५ च्या बरीच वर्षे

Saraswati Bahuudheshiya Shikshan Sanstha, Saoner Dist. Nagpur's
Saraswati Mahila Mahavidyalaya, Naik Layout, Saoner Dist. Nagpur
Courses : B.A., B.Com., B.Sc.
*''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा*
Dr. Maroti R. Wagh, President    Lata M. Wagh, Secretary

अगोदरपासून कार्यरत होत्या. दि. १ एप्रिल १९६६ पासून लागू झालेल्या विद्यापीठ अनुदान मंडळाच्या वेतनश्रेणी महाराष्ट्रातील प्राध्यापकांना द्याव्यात, म्हणून ह्या प्राध्यापक संघटनांनी विशेष प्रयत्न केले होते. **केवळ त्यांच्या प्रयत्नांमुळे त्यावेळचे शिक्षणमंत्री नामदार मधुकरराव चौधरी यांनी नागपूर येथे प्राध्यापकांच्या मोर्चास तो सुरू होणाऱ्या ठिकाणी स्वतः जाऊन ह्या नव्या वेतनश्रेण्या मान्य केल्या होत्या हे विशेष होय!** तथापि, पुढे विद्यापीठ अनुदान मंडळाच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनांतर्गत दि. १ जानेवारी, १९७३ पासून लागू होणाऱ्या नव्या वेतनश्रेणी प्राध्यापकांकरिता त्यावेळचे केंद्र शासनामधील शिक्षणमंत्री नामदार प्रा. एस. नुरुल हसन यांनी लोकसभेत दि. २९ मार्च १९७४ रोजी जाहीर केल्या; पुढे त्याप्रमाणे आदेश दि. २ नोव्हें. ७४, १६ जाने. ७५ व २०-२-७५ रोजी निघाले; आणि **त्यावेळचे महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री नामदार नामजोशी यांनी मात्र औरंगाबाद येथे जानेवारी १९७५ मध्ये प्राध्यापकांना जाहीरपणे सांगितले, "युजीसी वेतनश्रेणी तुम्ही विसरा; त्या तुम्हाला मिळणार नाहीत."** त्याची प्राध्यापक वर्गात तीव्र प्रतिक्रिया उमटली; सर्वत्र जिल्हास्तरावर भराभर प्राध्यापक एकत्र आले;" **(संदर्भ दोन पृष्ठ ११०)**

### सेन कमिटीचा अहवाल

**२७९.** घटनेतील व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी तिसऱ्या केंद्रीय वेतन आयोगाशी समतूल्य वेतनश्रेण्यांची शिफारस करणे हे विद्यापीठ अनुदान आयोगाचे काम होते. विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबतीत शिफारशी करण्यासाठी कलकत्ता विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. एस. एन. सेन यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नेमणूक केली होती. विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेली ही कमिटी "Committee on Governance of Universities and Colleges" या नावाने ओळखली जाते. अनेकदा या कमिटीचा उल्लेख **"सेन कमिटी"** असाही केला जातो. या कमिटीने १९७३ मध्ये आपला अहवाल सादर केला. हा अहवाल "Report of the Committee on Governance of Universities and Colleges" अशा मथळ्याचा असून त्याच्या भाग दोन मध्ये शिक्षक (Teachers) या विषयीच्या शिफारशी समाविष्ट आहेत.

### समान पात्रता व समान वेतनाची शिफारस

**२८०.** सेन समितीच्या अहवालाच्या भाग दोनच्या सुरुवातीलाच पहिल्याच परिच्छेदात अधिव्याख्यात्यांची नेमणूक होत असतांना विद्यापीठे व महाविद्यालये यातून काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेण्यांमध्ये असलेली तफावत ही कमी केली जावी या शिक्षण आयोगाच्या शिफारशीचा पुढील शब्दांमध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे :-

"The Committee also noted that the Education Commission (1964-66) had expressed the view that the disparity in the salary scales of University and college teachers should be reduced. The scales recommended by the University Grants Commission earlier were a step in this direction."

याच अहवालाच्या परिच्छेद 4 (a) मध्ये समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केली होती :-

**"(a) Equal pay for equal qualifications :** With regard to colleges, the committee is strongly of the view that people having similar qualifications, whether working in a university or a college, should have similar scales of pay. It is very necessary to attract well qualified teachers to the colleges also, which provide higher education to about 85% of the students."

### धावत्या वेतनश्रेणीचा उगम

**२८१.** १-४-१९६६ पासून लागू झालेल्या दुसऱ्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्यांच्या वेळी विद्यापीठ अनुदान आयोगाने ५० टक्के शिक्षकांना मूळ वेतनश्रेणी (रु. ३००-६००) २५ टक्के शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी (रु. ४००-८००) व २५ टक्के शिक्षकांना वरिष्ठ अधिव्याख्याता वेतनश्रेणी (रु. ७००-११२०) अशी व्यवस्था अस्तित्वात आणली होती. बढतीची ही व्यवस्था अत्यंत दोषपूर्ण होती. त्यामुळे या क्षेत्रात तीव्र असंतोष निर्माण झाला. शेकडो प्रकरणे न्यायालयात गेली. हा अनुभव लक्षात घेता आता सेन समितीने केलेल्या शिफारशीतून पुढे रु. ७००-१६०० ही एकच धावती वेतनश्रेणी (Running Scale) अस्तित्वात आली. सेन कमिटीची दुसरी महत्त्वाची शिफारस म्हणजे पात्रतेच्या अटींबाबतची. अधिव्याख्याता पदावर भरती होत असतांना चांगल्या गुणांनी एम.ए, एम.एस्सी, एम.कॉम ही पदवी तर आवश्यक असेलच पण त्याबरोबरच संशोधन करण्यामध्ये उमेदवाराने किमान प्राविण्य मिळविलेले असावे त्यासाठी एम.फील किंवा एम.लीट यासारखी पदवी धारण केली असली पाहिजे अशा प्रकारची एक महत्त्वाची शिफारस या समितीच्या अहवालामध्ये होती. विद्यापीठ अनुदान आयोगाने व विद्यापीठांनी एकमेकांस सहकार्य करून एम.फील, एम.लीट हे अभ्यासक्रम व अशा पदव्या स्थापित करण्यासाठी विशेष कार्यक्रम हाती घ्यावेत अशीही शिफारस या अहवालाच्या परिच्छेद 3 (b) मध्ये होती.

### केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी सुधारित वेतनश्रेण्या जाहीर केल्या

**२८२.** केंद्रशासनातील त्यावेळचे शिक्षणमंत्री मा. प्रा. नुरुल हसन यांनी लोकसभेमध्ये दिनांक २९ मार्च १९७४ रोजी एक निवेदन करून विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या करीता तिसऱ्या वेतन आयोगाशी समकक्ष अशा वेतनश्रेण्यांची योजना एका निवेदनाद्वारे जाहीर केली. या निवेदनाचा मथळा व पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे होता. :-

"Statement made by Prof. S. Nurul Hasan, Minister of Education, Social Welfare and Culture on March 29, 1974 in the Lok Sabha regarding revision of pay scales of University and College Teachers,

Sir,

I beg to inform the House that, on the recommendation of the University Grants Commission, it has been decided to approve the revision of the pay scales of University and College teachers. The approved revised scales are as follows:

**Universities**

| | |
|---|---|
| Lecturer | Rs. 700-40-1100-50-1600 |
| Reader | Rs. 1200-50-1300-60-1900 |
| Professor | Rs. 1500-60-180-100-2000-125-2-2500 |
| Professor of Eminence | Rs. 3000 (fixed) |

**Affiliated College**

(Post graduate and Undergraduate)

| | |
|---|---|
| Demonstrator/Tutor (Existing incumbents) | Rs. 500-20-70-25-900 |
| Lecturer | Rs.700-40-1100-50-1300 Assessment 50-1600 |
| Principal | (i) Rs. 1200-50-1300-60-1900<br>(ii) Rs. 1500-60-1800-100-2000- 125/2-2500" |

### जादा भाराचा ८० टक्के भाग केंद्रशासन अदा करणार

**२८३.** निरनिराळ्या राज्यांनी या वेतनश्रेण्या त्या त्या राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना १ जानेवारी १९७३ पासून लागू केल्या तर त्यामुळे येणाऱ्या जादा खर्चापैकी ८० टक्के भार केंद्रशासनातर्फे उचलला जाईल व असे अर्थसहाय्य ५ वर्षांपर्यंत चालू ठेवण्यात येईल. ही माहिती नमूद असलेला,

*राष्ट्र विकास शिक्षण संस्था, खापा द्वारा संचालित,*

**डॉ.हरिभाऊ आदमने कला-वाणिज्य महाविद्यालय, सावनेर**

***"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

डॉ. विरेंद्र केशवराव जुमडे, प्राचार्य

केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी २९ मार्च १९७४ रोजी लोकसभेत केलेल्या निवेदनाचा, शेवटचा परिच्छेद शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"In the case of the State Universities and colleges, Government of India will give special assistance to the State Government for adopting the revised scales with effect from January 1, 1973, the date from which the recommendations of the Third Central Pay Commission are being implemented. **The assistance from the centre will be given to the State Governments for a period of five years in respect of 80% of the additional cost for posts in existence on January 1, 1973,** on the State Government's assurance that, at the end of the five years period they will take over the entire responsibility for maintaining the revised scales without further central assistance."

### केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचे सर्व राज्याच्या शिक्षणमंत्र्यांना पत्र

**२८४.** २९ मार्च १९७४ रोजी लोकसभेत निवेदन केल्यानंतर केंद्रीय शिक्षणमंत्री प्रा. नुरुल हसन यांनी दुसऱ्याच दिवशी म्हणजे दिनांक ३० मार्च १९७४ रोजी सर्व राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांना एक पत्र लिहून लोकसभेमध्ये त्यांनी केलेल्या निवेदनाच्या प्रती सर्व शिक्षणमंत्र्यांना पाठविल्या. तिसऱ्या वेतन आयोगाने केलेल्या शिफारशी व शिक्षक संघटनाकडून वेळोवेळी आलेल्या निवेदनाच्या संदर्भात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या सुधारित वेतनश्रेण्यांचा प्रश्न मुळात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पातळीवर व त्यानंतर केंद्रशासनाच्या पातळीवर विचाराधीन होता. त्याबाबतीत केंद्रशासनाने आता निर्णय घेतलेला आहे असे त्यांनी कळविले होते. त्यांच्या या पत्रातील पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :-

"As you are no doubt aware, the question of necessary revision in the pay scale of University and College teachers had remained under examination, initially by the University Grants Commission and subsequently by the Government of India in the context Inter alia, of the claims put forward from time to time by the teachers' organisations and the recommendations of the Third Central Pay Commission on Class I services. The Central Governments' decisions on pay scales of the employees having been taken, **Government have decided to accept the University Grants Commission's recommendations in regard the University and College teachers as well.** The revised scales will take effect from January 1, 1973. **I enclose a copy of the statement I had occasion to make yesterday in the Lok Sabha."**

### राज्याच्या शिक्षणमंत्र्यांना केंद्राची विनंती

**२८५.** आपल्या या ३० मार्च १९७४ च्या पत्रामध्ये केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांना विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या पुनर्रचित वेतन संरचनेची आपण वेळेवर परिणामकारक अंमलबजावणी कराल व त्याद्वारे उच्च शिक्षणाचा तुमच्या राज्यात विकास होईल व त्यातून शिक्षक, विद्यार्थी व समाजाला निश्चितपणे फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यांच्या पत्रातील हा लहानसा शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणे :-

"The scheme under your able stewardship, I am confident, will receive timely and effective implementation. Both teachers and Students, as well as the community should benefit from the better development of higher education in the State. I Shall hardly add, look forward with you to the progress."

### केंद्रीय शिक्षण खात्याचे राज्याच्या शिक्षण सचिवांना पत्र

**२८६.** केंद्राच्या शिक्षण खात्याचे संचालक श्री. आर. एस. चित्कारा यांनी सर्व राज्यांच्या शिक्षण सचिवांना २ नोव्हेंबर १९७४ रोजी एक पत्र (No.F.1-40/74-U.1) पाठवून आम्ही ८० टक्के अर्थसहाय्य देण्यास तयार आहोत असे कळविले. त्यानंतर पुन्हा १६ जानेवारी १९७५ रोजी आणखी एक पत्र (No.F.1-2/75-U.1) त्यांनी पाठविले. त्या पत्रामध्ये वेतन पुनर्रचनेचे सारे तपशील नमूद केले होते. सोबत सारी सहपत्रे व परिशिष्ट्ये जोडली होती व या योजनेची राज्यांनी अंमलबजावणी करावी अशी विनंती राज्याच्या शिक्षण सचिवांना केली होती. या पत्राच्या सोबत त्यांनी जे चार क्रमांकाचे परिशिष्ट जोडले होते, त्या परिशिष्टामध्ये सुधारित वेतनश्रेण्या अंमलात आणण्याच्या सर्व अटी नमूद करण्यात आलेल्या होत्या. विद्यापीठ अनुदान आयोग ठरवून देईल त्या पात्रतेच्या अटींचे पालन यापुढे अधिव्याख्यात्यांची भरती करतांना करावे लागेल अशी अट त्यामध्ये नमूद होती. या परिशिष्टातील ५ वा व ६ वा परिच्छेद पुढीलप्रमाणेः-

"(v) **For future recruitment to the posts of Lecturers in Universities as well as in colleges,** the minimum qualifications shall be as may be determined by the University Grants Commission from time to time.

(vi) The existing Lecturers in colleges who did not posses at the time of their initial recruitment minimum qualifications as prescribed by the University concerned should be required to attain these qualifications within five years from the date of placement in the revised scale. If they are unable to do so during the period, they shall not be allowed to earn any future increment till they have satisfied this condition."

### भावी भरती व शैक्षणिक पात्रता

**२८७.** केंद्रशासनाच्या शिक्षण विभागाच्या संचालकांनी २० फेब्रुवारी १९७५ रोजी सर्व राज्यांच्या शिक्षण सचिवांना पुन्हा एक पत्र (No. F.1-1/75-U.1) पाठविले. यापूर्वी २ नोव्हेंबर १९७४ च्या पत्रान्वये आम्ही तुम्हाला "For future recruitment to the posts of Lecturers in Universities as well as in colleges, the minimum qualifications shall be as may be determined by the University Grants Commission." असे कळविले होते, याची आठवण करून देण्यात आली होती. २० फेब्रुवारी १९७५ च्या या पत्रान्वये पुढे असेही कळविण्यात आले होते की, नव्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने यापुढे अधिव्याख्यातापदासाठी भरती होत असतांना उमेदवाराची पात्रता निश्चित केली असून ती पुढीलप्रमाणे राहीलः-

"(a) A constitently good academic record with 1st or high 2nd class (B+) at the Master's degree in relevant subject or an equivalent degree of a foreign university; and

(b) an M.Phil. degree or a recognised degree beyond the Master's level or published work indicating the capacity of a candidate for independent research work."

ही नवी पात्रता पुढे भरती होणाऱ्या उमेदवारासाठी असेल हे या २० फेब्रुवारी १९७५ च्या पत्रात स्पष्ट शब्दात कळविले असल्यामुळे ते पत्र **सहपत्र एक** म्हणून सोबत दिलेले आहे.

### सन १९७५ महासंघाच्या स्थापनेचे व अत्यंत कटकटीचे वर्ष

**२८८.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या संघटनात्मक जीवनामध्ये सन १९७५ हे वर्ष महासंघाच्या स्थापनेचे वर्ष असून हे पहिले वर्ष एकंदर महासंघाच्या वाटचालीमध्ये सर्वात विकट, कटाकटीचे व अत्यंत दगदगीचे वर्ष होते असे दिसून येते. सन १९७५ च्या पहिल्या सहा महिन्यातील घडामोडींचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की, विविध विद्यापीठीय संघटनांना एकत्र करून

*High School Society, Saoner*

**Bhalerao Science College, Saoner**

**Bhalerao High School & Junior College, Saoner**

**Vidya Niketan English Primary School Borgaon mines Saoner**

**"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा**

Adv. Jayant Khedkar, Chairman Dilip Buit, Secretary

महासंघाची स्थापना करण्याचा धोरणात्मक निर्णय हा ऑक्टोबर १९७४ मध्ये नागपूर येथील बैठकीत घेण्यात आला असला तरी महासंघाची प्रत्यक्ष स्थापना मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट मधील मुख्यालयाच्या दीक्षान्त सभागृहामध्ये दिनांक २ एप्रिल १९७५ रोजी झाली. संघटनेची प्रत्यक्ष स्थापना होण्यापूर्वीच्या व झाल्यानंतरच्या घटनाक्रमाचा आढावा पुढील परिच्छेदातून घेतला आहे.

### केंद्रशासनाच्या स्तरावरील सर्व कार्यवाही पार पडली होती

**२८९.** महासंघाची स्थापना होण्यापूर्वीच तिसऱ्या वेतन आयोगाच्या समकक्ष वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्रशासनाच्या पातळीवरील सर्व कार्यवाही पूर्णपणे पार पडलेली होती व केंद्रस्तरावरून एकामागून एक तीन परिपत्रके - दिनांक ३० मार्च १९७४ रोजीचे, त्यानंतर दिनांक २ नोव्हेंबर १९७४ रोजीचे व त्यानंतर तिसरे परिपत्रक २० फेब्रुवारी १९७५ रोजीचे - राज्यशासनाकडे केंद्रशासनाकडून पाठविण्यात आलेली होती. जादा खर्चाचा ८० टक्के भार केंद्रशासन सहन करायला तयार आहे असेही कळविण्यात आलेले होते व त्याचबरोबर अधिव्याख्याता म्हणून नवीन भरती करतांना उमेदवाराची पात्रता काय असावी? हेही कळविण्यात आलेले होते.

### ना. नामजोशींच्या घोषणेचे परिणाम

**२९०.** सन १९७५ च्या जानेवारी महिन्यात त्यावेळेचे शिक्षणमंत्री श्री. अनंतराव नामजोशी यांनी औरंगाबाद येथे केलेल्या 'त्या' कुप्रसिद्ध निवेदनामुळे महाराष्ट्रातील प्राध्यापकांमध्ये फार मोठा असंतोष व अस्वस्थता निर्माण झाली. **"विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या तुम्ही आता विसरून जा! त्या तुम्हाला मिळणार नाहीत."** या त्यांच्या कुत्सित निवेदनामुळे सबंध उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये संतापाची तीव्र लाट उसळली. असंतोष किंवा संताप नुसता असून चालत नाही तर तो संघटित व्हावा लागतो. बांधून काढावा लागतो. मुंबई विद्यापीठाच्या क्षेत्रात 'बुक्टु'च्या नेत्यांनी खुपच तडाख्याने ठिकठिकाणी सभा घेऊन त्या क्षेत्रामध्ये शिक्षकांच्या या भावनेची बांधणी केली. एवढ्यावरच न थांबता डॉ. एल. बी. केणी, प्रा. किशोर ठेकेदत्त, प्रा. व्ही. बी. कामत या नेत्यांनी महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये दौरे करून आंदोलनाशिवाय पर्याय नाही याची जाणीव महाराष्ट्रातील प्राध्यापकांना करून दिली.

### नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रातील स्थिती

**२९१.** नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये तर परिस्थिती आणखी स्फोटक होती. जुन्या मध्यप्रदेशातील **अकरा अधिक चार** च्या आकृतिबंधाकडून महाराष्ट्रातील नव्या **दहा अधिक दोन अधिक तीनच्या** आकृतिबंधाकडे वाटचाल करतांना "गॅप ईअर व हाफ ईअर" च्या समस्येमुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली. परिणामी अनेक महिन्यांचे पगार न होण्याच्या समस्येने नागपूर विद्यापीठातील उच्च शिक्षणक्षेत्र त्रस्त झाले होते. अगोदरच वेतन विलंबाच्या समस्येने आग लागलेली होती, त्यात नामदार अनंतराव नामजोशी यांच्या कुप्रसिद्ध घोषणेमुळे आगीत पेट्रोल ओतल्या सारखा प्रकार झाला. नुटाच्या आम्ही पदाधिकाऱ्यांनी त्या काळात ज्या जिल्हानिहाय सभा घेतल्या त्या सभेत हा पेटता असंतोष स्पष्टपणे दिसून येत होता. आम्ही काही सांगायच्या अगोदर शिक्षक स्वतःहून **"आता बिलकूल मागे हटू नका. काय करायचा तो संघर्ष**

---

*सहपत्र : एक (परिच्छेद २८७ पहा)*

No. F.1-1/75-U.1

**GOVERNMENT OF INDIA**

Ministry of Education and Social Welfare

(Department of Education)

**New Delhi, the 20th February, 1975**

To,

The Secretary to the Government,

Government of Maharashtra,

Education Department,

Bombay.

**Subject :-** Revision of salary scales of University and college teachers.

Sir,

I continuation of this Ministry's letter No. 1-40/74/U.1 dated 2-11-1974 on the subject noted above, I am directed to state that while communicating the decision of the Government of India regarding revision of pay scales of pay of University and college teachers, the State Government was inter-alia informed that the revision of pay scales as suggested and payment of central assistance will be subject to the conditions stipulated in Appendix IV of the above letter. Condition (V) on the Appendix reads as follows :-

**"For future recruitment to the posts of Lecturers in Universities as well as in colleges,** the minimum qualifications shall be as may be determined by the University Grants Commission."

2. **The University Grants Commission has now decided that the following qualifications may be prescribed for recruitment to the posts of Lecturers** in the faculties of Arts and Social Sciences, including Commerce and Science in Universities and Colleges:-

**University Lectures**

(a) A Doctor's degree or published work of an equally high standard; and

(b) consistently good academic record with 1st or high 2nd class (B) Master's degree in a relevant subject or an equivalent degree of a foreign university.

Having regard to the need for developing interdisciplinary programmes, the degrees in (a) and (b) above may be in relevant subjects.

Provided that if the Selection Committee is of the view that the research work of a candidate as evident either from his thesis or from his published work is of very high standard it may relax any of the qualifications prescribed in (b) above.

Provided further that if a candidate possessing a Doctor's degree of equivalent published work is not available or is not considered suitable, a person possessing a consistently good academic record, **(due weightage being given to M.Phil. or equivalent degree or research work of quality)** may be appointed on the condition that the he will have to obtain a Doctor's degree or give evidence of published work of equivalent high standard within five years of his appointment, failing which he will not be able to earn future increment until he fulfils these requirements.

**Explanation**

Constitently good academic record mean overall record of all assessments throughout the academic career leading to the Master's degree, which should at least be B+ or high second class.

**College Lecturers**

(a) A constitently good academic record with 1st or high 2nd class (B+) at the Master's degree in relevant subject or an equivalent degree of a foreign university; and

(b) an M.Phil. degree or a recognised degree beyond the Master's level or published work indicating the capacity of a candidate for independent research work.

Provided that if a candidate possessing the qualification as at (b) above is not available or not considered suitable, the college, on the recommendation of the Selection Committee, may appoint a person possessing a constitently good academic record on the condition that he will have to obtain an M.Phil. degree or a recognised degree beyond Master's level within five years of his appointment, failing which he will not be able to earn future increments till he obtains that degree or gives evidence of equivalent published work of high standard.

**Explanation**

Constitently good record would mean over all record of all assessments throughout the academic career leading to the Master's degree, which should at least be B+ or high second class.

3. The Government of India have accepted the above recommendation of the University Grants Commission. It is, therefore, requested that the above minimum qualifications may be enforced while making future recruitments to the post of Lecturers in Universities and Colleges.

4. A further communication will follow in respect of minimum qualification for Lecturers in faculties other than those mentioned above.

5. The receipt of this letter may kindly be acknowledged and action taken by the State Government intimated to this Ministry.

Yours faithfully,

(R.S.Chitkara), Director.

*****

**करूनच टाकू**'' अशी प्रतिक्रिया देत होते.

### शिवाजी विद्यापीठाच्या क्षेत्रातील स्थिती

**२९२.** 'बुक्टु' व 'नुटा'च्या क्षेत्रातील माहिती वर दिलेली आहे. इतरही विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये विद्यापीठ स्तरावरील संघटनांची स्थापना झालेली नव्हती किंवा स्थापना होत होती असे दिसून येते. जिल्ह्या जिल्ह्याच्या पातळीवर बैठका होऊन सबंध महाराष्ट्रभर परीक्षा बहिष्काराचे वातावरण तयार झाले. शिवाजी विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये संभाजीराव जाधव यांनी पुढाकार घेऊन मुंबईच्या प्राध्यापक नेत्यांची जिल्हावार व्याख्याने त्या भागात आयोजित केली. सांगली येथील प्राध्यापकांच्या मेळाव्यास डॉ. एल. बी. केणी, सोलापूरच्या मेळाव्यास प्रा. किशोर ठेकेदत्त व कोल्हापूरच्या मेळाव्यास मुंबईचे प्रा. देवधर यांनी संबोधित केले.

### 'पुक्टो'च्या व 'मुक्टा'च्या क्षेत्रातील तयारी

**२९३.** दिनांक ११ व १२ जानेवारी १९७५ रोजी नगर येथे पुणे विद्यापीठ क्षेत्रातील शिक्षकांचा मेळावा संपन्न झाला व अस्थायी समिती विसर्जित करून पुक्टोची रितसर स्थापना करण्यात आली. प्रा. नलीनी तारळेकर या अध्यक्ष म्हणून व सचिव म्हणून प्रा. ना. द. शिरोळकर यांनी सूत्रे हाती घेतली व सर्व जिल्ह्यांचे दौरे करून आंदोलनाची तयारी बांधली. मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद येथे झालेल्या शिक्षकांच्या बैठकीत 'मुक्टा'ची स्थापना १९७३ मध्ये करण्यात आलेली होती पण संघटनेच्या कामाने पाहिजे तसा वेग घेतलेला नव्हता तशाही परिस्थितीत आलेल्या या संकटाला तोंड देण्यासाठी १९७५ च्या सुरुवातीस संघटनेच्या नेत्यांनी, विशेषतः प्रा. सुरेश पुरी, प्रा. विजय प्राथीकर व डॉ. शिवशंकर मिश्रा यांनी, चांगलीच मेहनत घेतली असे दिसून येते.

### शासन बदलेले, शिक्षणमंत्री बदलले

**२९४.** या कालखंडामध्ये आणखी महत्त्वाचा घटनाक्रम म्हणजे सरकारमध्ये झालेला बदल हा सांगता येईल. सत्ताधारी पक्षाच्या अंतर्गत केंद्र व राज्य स्तरावरील राजकीय घडामोडीमध्ये मा. श्री.वसंतराव नाईक यांचे जागी मा. श्री. शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री म्हणून आलेत. श्री. अनंतराव नामजोशी यांच्या जागी शिक्षणमंत्री म्हणून श्रीमती प्रभाताई राव ह्या आलेल्या होत्या. लष्करी सेवेतून परत आलेले श्री. के. के. मोघे हे विभागाचे सेक्रेटरी झालेले होते.

### सर्वांनी एकत्रच चर्चेला जाण्याचा निर्णय

**२९५.** सन १९७५ च्या सुरुवातीला सबंध महाराष्ट्रभर परीक्षा बहिष्काराचे हे जे वातावरण निर्माण झाले त्यामुळे या शिक्षकांशी चर्चा केली पाहिजे अशी आवश्यकता शासनातील नेत्यांना वाटू लागली व तशी निमंत्रणेसुद्धा रवाना झाली. वेगवेगळ्या विद्यापीठातील व वेगवेगळ्या जिल्ह्यातील संघटनांना चर्चेसाठी वेगवेगळी वेळ शासनातर्फे देण्यात आलेली होती. शिक्षकांच्या बहूसंघटना अस्तित्वात असणे हे राज्यकर्त्यांना नेहमीच सोईचे असते. तसे नसेल तर अशा संघटना उभ्या करण्याचे प्रयत्न शासनाकडून होतात. इथे राज्यभरासाठी एक संघटना अस्तित्वातच नसल्याने शासनाची सोयच झालेली होती. विविध नेत्यांशी वेगवेगळी चर्चा करण्याच्या घटनाक्रमाचे मर्म ओळखून 'बुक्टु'च्या नेत्यांनी त्यावर उत्तम तोडगा काढला. डॉ. एल.बी.केणी व डॉ. किशोर ठेकेदत्त यांनी ह्या सर्व प्राध्यापक संघटनांना पत्रे पाठवून मरिन लाईन्स स्टेशनजवळ असलेल्या 'किमत राय बिल्डिंग'मध्ये एका वेळी एकत्रित येण्याचे आवाहन केले. ह्याप्रमाणे सर्व प्राध्यापक संघटनांचे पदाधिकारी तेथे एकत्रित आले. **डॉ.केणी व डॉ.ठेकेदत्त यांनी सर्व परिस्थिती समजून सांगितली आणि सर्व संघटनांनी शासनाबरोबरच्या चर्चेसाठी एकत्र जाण्याचा ठराव तेथे मंजूर झाला आणि त्याप्रमाणे शिक्षणमंत्र्यांना कळविण्यात आले.**

### वेगवेगळ्या चर्चेचा घटनाक्रम 'बुक्टु'च्या नेत्यांनी हाणून पाडला

**२९६.** मा. शिक्षणमंत्र्यांना उपरोक्त निर्णय कळविण्याच्या या कृतिमुळे 'एमफक्टो' प्राध्यापक महासंघ प्रथम अनौपचारिकपणे व जाहीर न करताच अस्तित्वात आला. डॉ.केणी व डॉ.ठेकेदत्त व प्रा.व्ही.बी.कामत या तीन ज्येष्ठ नेत्यांनी, असे प्राध्यापकांनी एकत्रित येण्याचे प्रयत्न केले नसते, तर त्यानंतर व आजही त्यांच्यामधील ऐक्य कदाचित दिसले नसते. अनेक प्राध्यापक संघटना महाराष्ट्र पातळीवर दिसल्या असत्या. त्यावेळचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री. रजनी पटेल यांनी पुढे लगेच आलेल्या राजकीय आणिबाणीत (जून १९७५ मध्ये) आजच्या 'एमफक्टो' प्राध्यापक महासंघास पर्यायी प्राध्यापक संघटना निर्माण करण्यासाठी मुंबई येथे चर्चगेटजवळील पाटकर हॉलमध्ये प्राध्यापकांची बैठक बोलाविली होती. पण जेमतेम १५-२० प्राध्यापकच त्यास उपस्थित राहिल्यामुळे रजनी पटेलांचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला. वेगवेगळ्या संघटनांना वेगवेगळे बोलावून त्यांच्याशी वेगवेगळी चर्चा करण्याच्या शासनाच्या या पवित्र्याने शिक्षकांमध्ये त्यावेळी फार मोठी अस्वस्थता निर्माण झाली होती, याचा मी प्रत्यक्षदर्शी आहे. 'बुक्टु'च्या उपरोक्त नेत्यांनी केलेल्या प्रयत्नामुळे पुढे घडणाऱ्या संभाव्य घातपातातून महाराष्ट्रातील प्राध्यापक सुखरुपपणे बचावले असे म्हणता येईल.

### मागणीपत्र शासनाकडे पाठविले

**२९७.** बहिष्कार आंदोलनामुळे अनेक विद्यापीठात परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या. त्यामुळे प्राध्यापकांशी चर्चा केली पाहिजे अशा प्रकारची जी भावना तीव्रतेने शासनस्तरावर दिसून आली, तिला सामोरे जाण्यासाठी चर्चा करतांना प्राध्यापकांच्यावतीने बाजू मांडण्यासाठी डॉ.एल. बी. केणी व प्रा. किशोर ठेकेदत्त यांच्या नेतृत्त्वामध्ये एक प्रतिनिधी मंडळ तयार करण्यात आले. आम्ही प्रतिनिधी मंडळाच्या सर्व सदस्यांनी 'बुक्टु'च्या किमतराय बिल्डिंगच्या कार्यालयामध्ये बसून मागणीपत्रक तयार केले व ते शासनाकडे पाठविण्यात आले. त्यातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे होत्या :-

(१) तिसऱ्या वेतन आयोगाशी समकक्ष, विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या व केंद्र शासनाने मान्य केलेल्या, वेतनश्रेण्या महाराष्ट्रात जशाच्या तशा अंमलात आणल्या जाव्यात.

(२) सातत्त्याने वेतन उशिराने होण्याच्या प्रश्नावर उपाययोजना म्हणून सर्व शिक्षकांचे वेतन माध्यमिक शिक्षकांप्रमाणे कोषागारामार्फत केले जावे.

(३) सन १९७३ चा अध्यादेश क्रमांक ३३ प्रख्यापित करून प्राध्यापकांच्या स्थायीकरणावर शासनाने आणलेली बंदी ताबडतोब उठविण्यात यावी व दोन वर्षांची सेवा झालेल्या सर्व शिक्षकांना सेवेत कायम करण्यात यावे.

(४) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी सेवाशाश्वती लाभाच्या तरतुदी ह्या ताबडतोबीने केल्या जाव्यात.

(५) नवीन आकृतिबंधामुळे ७ फेब्रुवारी १९७५ रोजी स्पष्ट रिक्त पदावर काम करीत असलेल्या शिक्षकांच्या संख्येमध्ये कपात होता कामा नये व त्यांच्या वेतनश्रेण्या सुद्धा संरक्षित केल्या जाव्यात.

(६) विद्यापीठ अनुदान आयोगाने डेमॉन्स्ट्रेटर व ट्युटरची पदे ही बरखास्त केलेली असून पात्र असलेल्या अशा सर्व शिक्षकांना अधिव्याख्याता म्हणून बढती दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाने याबाबतची कार्यवाही तत्परतेने पूर्ण करावी.

### शासनाचे विधानसभेत निवेदन

**२९८.** मार्च १९७५ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या मा.शिक्षणमंत्री श्रीमती प्रभाताई राव यांनी प्राध्यापकांच्या प्रतिनिधी मंडळाशी निदान चार-पाच वेळा तरी चर्चा केली. शासनाच्या बाजूने सचिव श्री. के. के. मोघे हे त्यांच्या मदतीला होते. प्रत्येक प्रश्न त्यांनी बारकाईने समजून घेतला व समजून घेतल्यानंतर जवळ जवळ सर्वच मागण्यांच्या बाबतीत त्या होकारार्थी आहे असे वातावरण निदान चर्चेच्या वेळी तयार झालेले होते. पण प्रत्यक्ष शासनाच्या भूमिका नमूद असलेला मसुदा तयार करण्यात यावा अशी मागणी ज्या वेळेला आमच्या प्रतिनिधी मंडळाने केली त्या वेळेला त्यांनी आपण ४ एप्रिल १९७५ ला खुद्द सभागृहामध्ये याबाबतचे निवेदन करणार आहोत त्यामुळे वेगळा काही दस्तऐवज करण्याची आवश्यकता नाही असे प्रतिपादन केले व ठरल्याप्रमाणे त्यांनी दिनांक ४ एप्रिल १९७५ रोजी सभागृहामध्ये याबाबतचे तपशीलवार निवेदन केले. **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या जशाच्या तशा मान्य करण्याची मागणी त्यांनी १०० टक्के मान्य केलेली होती.** इतर मागण्यांच्या बाबतीत त्यांनी काय भूमिका घेतली होती हे या ठिकाणी नमूद करण्याची आवश्यकता नाही. कारण ही लेखमाला मुख्यत्वे वेतन आयोगाबाबतची आहे. असे असले तरी महाराष्ट्रातील प्राध्यापकांच्या अनेक प्रश्नाबाबत विधानमंडळाच्या इतिहासामध्ये प्राध्यापकांशी चर्चा करून पहिल्यांदाच अशा प्रकारचे निवेदन विधानसभेत करण्यात आल्यामुळे

*लोकसेवा मंडळ, नरवेल द्वारा संचालित*

**सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ**

**दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय, मलकापूर जि. बुलढाणा**

***''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

डॉ. रमाकांत कोलते, अध्यक्ष श्री. प्रशांत खर्चे, सचिव

हे निवेदन सोबत **सहपत्र : दोन** म्हणून प्रसृत करीत आहोत.

### मा. शिक्षणमंत्र्यांचे प्रयत्न व संघटनेची अडचण

**२९९.** मार्च (१९७५) महिन्यामध्ये होत असलेल्या चर्चेच्या वेळी शिक्षणमंत्री या नात्याने तीन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या श्रीमती प्रभाताई राव यांना पार पाडावयाच्या होत्या. (१) पहिली जबाबदारी म्हणजे आंदोलनकर्त्या प्राध्यापकांच्या प्रतिनिधी मंडळाशी चर्चा करून त्यांच्या मागण्या काय आहेत? ते नीट समजून घेणे, त्यातल्या कोणत्या महत्त्वाच्या, कोणत्या कमी महत्त्वाच्या, कोणत्या तातडीच्या व कोणत्या यथावकाश करण्याच्या याविषयीचा निर्णय घेणे (२) एकदा असे निर्णय घेतल्यानंतर मंत्रिमंडळाची त्या निर्णयांना मान्यता मिळवून घेणे (३) एकदा मंत्रिमंडळामध्ये निर्णय झाल्यानंतर प्रथम विधानमंडळात निवेदन करणे किंवा संघटनेशी मतैक्यपत्र नोंदविणे. या त्या तीन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या नमूद करता येतील. विधानमंडळाचे अधिवेशन सुरू असतांना बाहेर कोणत्याही घोषणा करणे किंवा एखाद्या संघटनेला काही सांगणे हे संसदीय रितीरिवाजानुसार अनुचित समजले जाते हे खरे असले तरी **एखादा घटनाक्रम घडवून आणणे व घडलेल्या घटनाक्रमाची माहिती सांगणे या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत.** ३० वर्षांच्या सांसदीय कामकाजाच्या अनुभवानंतर मी ठामपणे असे म्हणू शकतो की, एखाद्या संघटनेशी शासनाच्या प्रतिनिधींनी चर्चा करून, मतैक्याची लेखी नोंद करून, आंदोलन मागे घेतल्याचे नोंदवद्ध करणे यात सांसदीय रितीरिवाजाचा कोणताही भंग होत नाही. अधिवेशन चालू असतांना अशा घटनाक्रमाची माहिती नंतर सभागृहालाच दिली पाहिजे हा संसदीय संकेत आहे. लिखित मतैक्यपत्र तयार व्हावे असा आमच्या प्रतिनिधी मंडळाने आग्रह धरला पण त्यात आम्हाला यश आले नाही. आमच्या प्रतिनिधी मंडळाची सर्वात मोठी अडचण अशी होती की, लिखित काहीतरी हाती आल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे आम्हाला शक्य नव्हते व त्यामुळेच आंदोलन मागे घेण्याचा निर्णयसुद्धा सभागृहात निवेदन झाल्यानंतरच झाला.

### शिक्षणमंत्र्यांच्या निवेदनाची प्रत मिळाल्यावर आंदोलन मागे घेण्यात आले

**३००.** उपरोक्त परिस्थितीमध्ये ४ एप्रिल १९७५ रोजी निवेदन सभागृहात झाल्यावर व त्याच्या प्रती विधानमंडळ सचिवालयामार्फत किंवा शिक्षणखात्यामार्फत प्राप्त झाल्यानंतर संघटनेने आपला निर्णय करावा असे प्रतिनिधी मंडळाने ठरविले होते. खुद्द मा. शिक्षणमंत्र्यांना सुद्धा याची कल्पना होती. त्यामुळे निवेदनानंतर शिक्षणमंत्र्यांनी एका अनुपूरक प्रश्नाला उत्तर देतांना **"हे स्टेटमेंट केल्यानंतर प्राध्यापकांचे काय इंम्प्रेशन राहील हे मी आपणाला आताच सांगू शकणार नाही"** असे सभागृहात सांगितले व आणखी असेही सांगितले की, "जो पर्यंत स्टेटमेंट हाऊसच्या फ्लोअरवर येत नाही तो पर्यंत बाहेर यासंबंधी काय निर्णय घेतलेला आहे. यासंबंधी मला या ठिकाणी काही सांगता येणार नाही. **त्यांना आजही चर्चा करण्यासाठी बोलाविण्यास मी सांगितले आहे. चर्चा झाल्यानंतर काय तो निर्णय घेण्यात येईल."** ***(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : खंड***

*सहपत्र : दोन (परिच्छेद २९८ पहा)*

*महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन, खंड ४३,*
*क्रमांक २८, पृष्ठ ३६-३८*

## प्राध्यापकांनी परीक्षांवर टाकलेला बहिष्कार व त्यांच्या मागण्या यासंबंधी शिक्षण मंत्र्यांचे नियम ४६ अन्वये निवेदन

***बुधवार, दिनांक ४ एप्रिल १९७५***

**श्रीमती प्रभा राव (शिक्षण मंत्री) :** महोदय, मी नियम ४६ अन्वये खालील निवेदन करते :-

ह्या निवेदनाच्या प्रारंभी महाराष्ट्राच्या जनतेने शिक्षणाच्या प्रसारासाठी जो सर्वांगीण त्याग केला आहे, त्याचा उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजते. याच संदर्भात हेही उल्लेखनीय आहे की, शिक्षणाची गती वाढावी म्हणून केवळ शासनावरच पूर्णपणे अवलंबून न राहता राज्यातील शिक्षणप्रेमी कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त संस्था उभारल्या. त्या उभारण्यात पालक, संस्था चालक व शिक्षक या सर्वांच्या त्यागाचा वाटा आहे. याच रचनात्मक परंपरेस अनुसरून महाराष्ट्राचे शैक्षणिक भवितव्य घडेल ही शासनाची अपेक्षा आहे.

विद्यापीठ अनुदान मंडळाने शिक्षणाचा दर्जा उंचावणे किंवा योग्य मोबदला देऊन उत्तम गुणवत्तेचे शिक्षक आकर्षित करणे इत्यादी नमूद केलेले धोरण महाराष्ट्राकरिता नवीन नाही. **त्याप्रमाणे मंत्री मंडळानेही ही उद्दीष्टे समोर ठेऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.**

हे निर्णय मी, दिनांक २४ मार्च १९७५ रोजी केलेल्या निवेदनाच्या संदर्भात आहेत.

**(१) नवीन वेतनश्रेणी :-** विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी **जशाच्या तशा शासनाने स्वीकारलेल्या आहेत.** या वेतनश्रेणी वि. अ. आ. ने किंवा विद्यापीठांनी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना देण्यात येतील व ज्या शिक्षकांना दोन्ही अर्हता नाहीत त्यांना त्या अर्हता प्राप्त करीपर्यंत आजची वेतनश्रेणी लागू राहील व त्यांनी अर्हता ५ वर्षात प्राप्त करावी अन्यथा त्यांची पुढील वार्षिक वेतनवाढ रोखली जाईल.

**(२) शासकीय कोषागारांमार्फत पगार वाटप :-** काही प्राध्यापकांचा पगार मिळण्याबाबत तक्रारी शासनाकडे आल्या आहेत. यासंबंधी प्राध्यापकांची मागणी अशी आहे की, त्यांना शासकीय कोषागारांमार्फत पगार मिळावा. नियमाप्रमाणे देय असलेला पगार सेवकांना मिळाला पाहिजे असे शासनास वाटते. **चालकांद्वारा शिक्षकांना चेकने वेतन मिळावे हे शासनाने तत्त्वतः मान्य केले आहे.** ही बाब चालकांद्वारा प्रत्यक्षात कशी कार्यान्वित करावी याबद्दल शासन प्रयत्नशील राहील.

**(३) स्थायीकरणाचा कायदा :-** कायम करण्याबाबत लावलेला गतीरोध शासनाने, दिनांक १२ फेब्रुवारी १९७५ रोजी **अधिसूचना काढून रद्द केला आहे.** त्या आधी जे शिक्षक कायम होण्यास पात्र होते, त्यांनाही त्या त्या तारखेपासून **कायम करण्याकरिता योग्य त्या शासकीय सूचना** सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत. इतके करूनही जर काही ठिकाणी कायद्याच्या आधारावर अडचण येण्याची शक्यता असेल तर ती दूर करण्याच्या उद्देशाने संबंधित कायद्यात योग्य तो फेरबदल करण्याची कार्यवाही शासनाने हाती घेतलेली आहे.

या गतिरोधाचा फायदा घेऊन मध्यंतरीच्या ३१ मे १९७३ ते १२ फेब्रुवारी १९७५ या काळात सुडबुद्धीने वा किरकोळ कारणांवरून जर कोणाला नोकरीतून कमी करण्यात आले असेल तर विद्यापीठाच्या अधिपत्याखाली संबंधितांची एक समिति याबाबत गुणवत्तेनुसार प्रत्येक तक्रारीचे निवारण करेल.

**(४) सेवाविषयक तरतुदी व सेवाशाश्वती :-** सेवाविषयक तरतुदी व सेवेच्या शाश्वतीबद्दल विद्यापीठ कायद्यामध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. कलम ४२ मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार विद्यापीठांनी करावयाचे नियम लवकरात लवकर तयार करण्यात यावेत म्हणून योग्य त्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**प्रोबेशन मर्यादा जास्तीत जास्त दोन वर्षांची** असावी अशी तरतूद काही विद्यापीठांच्या सेवा नियमांमध्ये आहे व ज्यांच्या सेवा नियमांमध्ये अशी तरतूद नाही, त्या विद्यापीठांना तशी तरतूद करण्याबद्दल सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच कायम केलेल्या व्यक्तीस जर नोकरीतून काढण्यात आले, वा हुद्दा कमी करण्यात आला, तर त्याला त्याविरुद्ध दाद मागता यावी यासाठी त्रिपक्षीय लवादाची तरतूद कायद्यात केली आहे. त्या लवादावर संस्था, संबंधित नोकर व विद्यापीठाचे प्रतिनिधी राहतील.

**(५) नोकर कपात :-** नवीन आकृतीबंधामुळे प्राध्यापकांच्या ७ फेब्रुवारी १९७५ रोजी स्पष्ट रिक्त पदावर असलेल्या संखेत कपात होणार नाही व त्यांची आजची वेतनश्रेणीही तीच राहील असे शासनातर्फे स्पष्टपणे अगोदरच जाहीर झाले आहे. **यामुळे ही मागणी पूर्ण मान्य झालेली आहे.**

(६) जे प्रयोग निदेशक-पाठ निदेशक अधिव्याख्यातासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा विद्यापीठाने ठरविलेली अर्हता धारण करीत असतील **त्यांची पदे उन्नत करून त्यांना अधिव्याख्यातासाठी स्वीकारलेली वेतनश्रेणी देण्यात येईल व ज्यांना ती अर्हता नसेल पण विद्यापीठांना प्रयोग निदेशक-पाठ निदेशक यांच्यासाठी विहीत केलेली अर्हता असेल त्यांना ५०० ते ९०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात येईल.** त्यांना वरील दोन्हीही अर्हता नसतील त्यांना सध्या आहे त्या वेतनश्रेणीतच काम करावे लागेल.

(७) वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्या शासनाने मान्य करून त्यांच्याविषयी सक्रीय सहानुभूति व्यक्त केली आहे. **विशेषतः विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी जशाच्या तशा स्वीकारल्यामुळे परीक्षांवर बहिष्कार टाकण्याचे कारणच उरले नाही.** अशा परिस्थितीत विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक विद्यापीठांशी सहकार्य करून सर्व परीक्षा यशस्वीरितीने पार पाडण्यास मदत करतील असा मला विश्वास वाटतो. परीक्षा वेळेवर न झाल्यामुळे विद्यार्थी व पालक यांच्या मनातील अस्थिरता सर्व विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांनी दूर करावी असे मी त्यांना कळकळीचे आवाहन करते.

*****

*४३, क्रमांक २८, पृष्ठ ३८)* ठरल्याप्रमाणे सभागृहात निवेदन आले. त्यानंतर प्रतिनिधी मंडळाने शिक्षणमंत्र्यांशी चर्चा केली व बैठक घेऊन आंदोलनाचा निर्णय मागे घेतला.

## मान्य मागण्या नोंदबद्ध करण्याचे तीन प्रमुख मार्ग

**३०१.** मार्च १९७५ मध्ये मा. शिक्षणमंत्र्यांशी चर्चा सुरू असतांना शासनाने मान्य केलेल्या बाबी नोंदबद्ध कशारीतीने केल्या जाव्यात याबाबतसुद्धा आम्हा प्रतिनिंधीच्या मध्ये चर्चा होत होती. त्या संदर्भात प्रमुख तीन मार्ग उपलब्ध असतात असे दिसून येते. **एक म्हणजे** एका बाजूला संघटना व दुसऱ्या बाजूला शासन यांच्या प्रतिनिधींनी 'मतैक्यपत्र' किंवा 'समझोता पत्र' स्वाक्षरीत करणे. **दुसरा मार्ग म्हणजे** विधानमंडळाचे अधिवेशन चालू असेल तर मान्य मागण्यांबावत शासनाने सभागृहात निवेदन करणे व **तिसरा मार्ग म्हणजे** कोणत्याही कारणाने प्रकरण जर न्यायालयासमोर प्रलंबित असेल तर शासनाच्या वतीने न्यायालयासमोर निवेदन सादर होणे.

## सभागृहात निवेदन करण्याच्या मार्गाची निवड करण्यात आली

**३०२.** आजपर्यंतच्या संघटनात्मक जीवनामध्ये या तीनही मार्गांचा वेगवेगळ्या वेळी स्वतंत्रपणे वापर करण्यात आल्याचे अनेक प्रसंग मी पाहिले आहेत. मार्च-एप्रिल १९७५ मध्ये यापैकी पहिल्या मार्गाचा वापर करणे शक्य नव्हते, याचे प्रमुख कारण असे की, विधानमंडळाचे अधिवेशन चालू आहे व आपल्याला तेथेच निवेदन करावे लागेल असा सल्ला मा. शिक्षणमंत्र्यांना देण्यात आला होता व त्याच मार्गाचा वापर करण्यावर शिक्षणमंत्री ठाम होत्या. आमच्या बाजूने अडचण अशी होती की, राज्यस्तरावर संघटना अस्तित्वातच नव्हती व प्राध्यापकांच्या काही प्रतिनिधींशी चर्चा झाली व मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले असा आग्रह फार ताणून धरण्याची स्थिती नव्हती. "**सभागृहाच्या बाहेर संघटनेला देण्यात आलेले लेखी आश्वासन**" व "**सभागृहात देण्यात आलेले आश्वासन**" यांच्या दर्जामध्ये फार काही फरक नसतो हे अनेक वर्षांच्या अनुभवाने आम्हाला आता कळून चुकले आहे. त्यावेळेला मात्र विधानसभेत निवेदन होत आहे ही चांगलीच गोष्ट आहे असे आमच्यापैकी अनेकांना वाटत होते.

## जागरूक लोकमत हेच खरे पाठबळ

**३०३.** सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांचे पालन केलेच पाहिजे असे कोणतेही घटनात्मक किंवा कायदेशीर बंधन हे शासनावर असत नाही. अशा आश्वासनांची अंमलबजावणी झाली किंवा नाही हे पाहण्यासाठी प्रत्येक सभागृहाची एक आश्वासन समिती असते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेच्या आश्वासन समितीचा मी अनेक वर्षे सदस्य होतो व अनेक वर्षे समिती प्रमुखही होतो. त्यामुळे अंमलबजावणी न करण्यात आलेल्या आश्वासनांबाबत कारवाई करण्याची शिफारस आपल्या अहवालातून करणे व तसा अहवाल सभागृहाला सादर करणे हा एक महत्त्वाचा अधिकार या समितीला असतो. देण्यात आलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करण्यासाठी कागदपत्रांची मागणी करणे, विभागांच्या सचिवाला साक्षीसाठी बोलाविणे इत्यादी मार्गांच्या द्वारे आश्वासनांची अंमलबजावणी या समितीला करवून घेता येते, हे खरे असले तरी त्या नंतरसुद्धा अनेक आश्वासने अंमलबजावणी शिवाय पडून असतात, ही वस्तुस्थिती आहे. सभागृहाबाहेर दिलेल्या आश्वासनांबावत असे नमूद करता येईल की, त्या आश्वासनांच्या बावतीत शासनाला केव्हाही पलटी मारता येते किंवा कोणतीही कृती न करता ती आश्वासने तशीच पडून राहू दिली जातात. दोनही प्रकारच्या आश्वासनांच्या बावतीत असेही नमूद करता येईल की, त्यातील बहुसंख्य आश्वासनांची अंमलबजावणी होते हे खरे असले तरी अंमलबजावणी न झालेली व पडून राहिलेली सुद्धा अनेक आश्वासने या दोनही प्रकारामध्ये उपलब्ध असतात. **जागरूक लोकमताचे पाठबळ असेल तरच अशा आश्वासनांची अंमलबजावणी करवून घेता येते.**

## न्यायालयामध्ये करण्यात आलेले निवेदन

**३०४.** शासनाच्या वतीने न्यायालयामध्ये एखादे आश्वासन देण्यात आलेले असेल तर त्याचा दर्जा अतिशय वरच्या श्रेणीचा असतो. मात्र यासाठी संबंधित बाब ही न्यायालयासमोर प्रलंबित असणे आवश्यक असते. तसे ते नसेल तर या मार्गाचा वापर करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या एखाद्या बाबीमध्ये शासनाच्या वतीने न्यायालयासमोर एखादे निवेदन करण्यात आले असेल व त्यात एखादे आश्वासन देण्यात आले असेल तर घटनात्मक तरतुदीमुळे व कायदेशीर तरतुदीमुळे शासनाला त्याची अंमलबजावणी करावीच लागते. तसे न केल्यास न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल संबंधितांना शिक्षा ठोठावली जाऊ शकते. मार्च-एप्रिल १९७५ मध्ये सदरहू प्रकरणात या मार्गाचा वापर करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नव्हता. कारण या संबंधातील कोणतीही बाब न्यायालयात प्रलंबित नव्हती.

## पात्रतेच्या अटी व अफवांचा बाजार

**३०५.** मा. शिक्षणमंत्र्यांचे सभागृहात निवेदन झाल्यानंतर व केंद्रशासनाची भूमिका त्याबाबतीत स्पष्ट असली तरीही १९७५ मध्ये सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रात मात्र एम. फील ही पात्रता केवळ नवीन भरती साठीच नव्हे तर सेवेत असलेल्या सर्व शिक्षकांसाठी लागू केली जाईल अशा प्रकारची अफवा मोठ्या प्रमाणावर पसरली होती. "**नवी एम. फील ची पात्रता ही नवीन भरतीसाठी लागू असेल व विद्यापीठाची त्या त्या वेळी असलेली पात्रता धारण करणाऱ्या सर्व शिक्षकांना नवीन वेतनश्रेणी दिली जाईल**" असे केंद्रशासनाचे धोरण असले तरीही या अफवा जोरात पसरलेल्या होत्या व पसरविल्या जात होत्या. या अफवांचे उगमस्थान काही सनदी अधिकाऱ्यांच्या उद्‌गारात होते अशी आमची त्यावेळेला धारणा होती व पुढे जो शासननिर्णय निघाला त्यामुळे ती धारणा पक्की झाली. स्वाभाविकपणे मार्च १९७५ मध्ये शिक्षणमंत्र्यांशी झालेल्या चर्चेच्या वेळी पात्रतेच्या अटी हा चर्चेतील प्रमुख मुद्दा होता. आता खुद्द शिक्षणमंत्र्यांनीच सभागृहात केलेल्या निवेदनामध्ये "विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी **जशाच्या तशा शासनाने स्वीकारलेल्या आहेत.**" असे वाक्य आल्यामुळे या अफवांचे मोठ्या प्रमाणात निराकरण झालेले होते.

## कुलगुरुंच्या पातळीवरून अफवांचे खंडन

**३०६.** ४ एप्रिल १९७५ रोजी शिक्षणमंत्र्यांचे विधानसभेत निवेदन झाल्यानंतर आंदोलन आता पुढे सुरू ठेवणे उचित नाही अशी भावना आम्हा शिक्षक प्रतिनिधींच्यामध्ये असली तरीही आंदोलन सुरू करण्याचा मूळ निर्णय राज्यपातळीवर घेण्यात आलेला निर्णय नव्हता, तर तो काही ठिकाणी विद्यापीठ स्तरावरील संघटनांच्या पातळीवर झालेला होता. तर काही ठिकाणी तो जिल्हा पातळीवर झालेला होता. आता त्या त्या पातळीवर आंदोलन मागे घेण्याबाबतची औपचारिकता पूर्ण होणे आवश्यक होते. त्याप्रमाणे पुढच्या दोन-चार दिवसात नागपूर येथे 'नुटा'च्या कार्यकारी मंडळाची बैठक झाली. परीक्षा बहिष्कार आंदोलन हे आता मागे घेऊन सर्व शिक्षकांनी परीक्षेच्या कामात सहकार्य करावे अशी भावना विद्यापीठाचे कुलगुरू व कुलसचिव यांच्या मनामध्ये असणे हे स्वाभाविक होते. नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू मा. डॉ. डी. वाय. गोहोकार यांनी आम्हा पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी बोलाविले. या चर्चेच्या वेळी **आम्ही जेव्हा त्यांना पात्रतेच्या अटींबाबत सनदी अधिकाऱ्यांनी घोळ घालून ठेवलेला आहे असे सांगितले** तेव्हा डॉ. गोहोकार सरळच असे म्हणाले की, "अहो बी. टी. ! मागे कोणी काय घोळ घातला, ते आता बाजूला ठेवा. खुद्द शिक्षणमंत्र्यांनी आता विधानसभेत निवेदन केले असून शिक्षण सचिवांनी आम्हा सर्व कुलगुरूंना पत्र लिहून "I would like to clarify that according to the Government's decision the revised U.G.C. pay scales will be applicable to all the University and College teachers who, at present, possess qualifications prescribed by the respective Universities." असे स्पष्ट कळविले आहे. इतकेच नव्हे तर शिक्षण सचिवांनी मला व्यक्तिशः फोनवरून संपर्क करून तुम्हा मंडळींना बोलावून ही माहिती सांगण्याची विनंती केलेली आहे."

## शिक्षण सचिवांचे पत्र व कुलगुरुंचे वृत्तपत्रीय निवेदन

**३०७.** मा. कुलगुरू डॉ. डी. वाय. गोहोकार एवढं सांगूनच थांबले नाहीत तर त्यांनी ७ एप्रिल १९७५ रोजी नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूंना राज्याच्या शिक्षण सचिवांनी व्यक्तिशः पाठविलेल्या पत्राची प्रतच आमच्या सुपूर्त केली. ते

वाणिज्य महाविद्यालय यवतमाळ ट्रस्ट, यवतमाळ र.नं. ई-३२ द्वारा संचालित

**बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ**

*''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा*

श्री. विनायक दाते, अध्यक्ष    समस्त विश्वस्त मंडळ    श्री. सतीश फाटक, उपाध्यक्ष

पत्र **सहपत्र : तीन** म्हणून सोबत दिलेले आहे. त्याच दिवशी डॉ. गोहोकार यांनी विद्यापीठाच्या वतीने वृत्तपत्रामध्ये एक निवेदन प्रसिद्धीसाठी दिले व विद्यापीठाच्या त्या त्या वेळी असलेल्या पात्रता ज्या शिक्षकांना आहेत त्या सर्व सेवारत शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन वेतनश्रेण्या लागू राहतील व आयोगाने ठरवून दिलेल्या पात्रतेच्या नवीन अटी (एम. फील/एम. लीट वगैरे) नवीन शिक्षक भरतीसाठी लागू राहतील असे जाहीर केले.

### अफवा खंडनार्थ १६ मे १९७५ ला शासनाने परिपत्रक काढले

**३०८.** एम्. फील पदवी प्राप्त असणे ही नव्या भरतीसाठी ठरविण्यात आलेली पात्रता सेवेत असलेल्या लोकांवर लादण्याचा प्रयत्न काही सनदी अधिकारी सर्व शक्तीनिशी करीत आहेत, करणार आहेत ही अफवा इतक्या जोरात पसरली होती की, खुद्द शासनातील राजकीय नेते व काही जबाबदार अधिकारी त्यामुळे अचंबित झाले होते. मा.शिक्षण मंत्र्यांनी विधानमंडळात निवेदन करून किंवा शिक्षण सचिवांनी सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंना पत्र पाठवून याबाबतचे वातावरण निवळले नाही, असे वाटल्यामुळे शासनाने १६ मे १९७५ रोजी एक तपशीलवार परिपत्रक काढले व त्याच्या परिच्छेद तीन मध्ये पात्रतेच्या नव्या अटी नवीन भरतीसाठी लागू असतील असा पुन्हा खुलासा केला. या परिपत्रकाच्या प्रती महाराष्ट्रातील आम्हा संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या. दिनांक ३ जुलै १९७५ च्या एका पत्रान्वये नुटाचा अध्यक्ष म्हणून त्या परिपत्रकाची प्रत माझ्याकडे पाठविणारे ते शासन पत्र **सहपत्र : चार** म्हणून सोबत दिले आहे.

### 'उलटा' शासननिर्णय निघाला

**३०९.** पुढे जून १९७५ मध्ये देशामध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली, याचा फायदा घेउन शासनाने "राईट अबाऊट टर्न" ची भूमिका घेतली. विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी लागू करण्यासाठीचा शासन निर्णय (क्रमांक USG-1174/104287) हा दिनांक ४ आक्टोबर १९७५ रोजी निर्गमित करण्यात आला. **"These qualifications are applicable to both existing teachers and the teachers who may be recruited hereafter."** अशा प्रकारची उलटी शब्द रचना या शासननिर्णयामध्ये टाकण्यात आली. शब्द फिरविण्याच्या शासनाच्या या भूमिकेमुळे उच्च शिक्षण क्षेत्राला कमालीचा धक्का बसला, कुलगुरू हादरून गेले. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने याचा धिक्कार केला.

*सहपत्र : तीन (परिच्छेद ३०७ पहा)*

Seal

**GOVT. OF MAHARASHTRA**

**IMMEDIATE**

**K. K. MOGHE, Secretary**
**Education Department, Sachivalaya,**
**Bombay-32.**

**D.O. No. USG 1175-U**
**Dated : 7th April, 1975.**

**Subject :-** Revision of Salary Scales of College/ University Teachers.

**Dear Shri Gohokar,**

In the context of Minister (Education)'s statement in the Legislature about acceptance of U.G.C. scales for College/University teachers, I enclose, herewith, a complete set of Government of India's letters dated 2-11-1974, 16-1-75 and 20-2-75, on the above subject, for your information and guidance. **I would like to clarify that according to the Government's decision the revised U.G.C. pay scales will be applicable to all the University and College teachers who, at present, possess qualifications prescribed by the respective Universities.** They will not be applicable to those who do not possess even these qualifications and they will continue to be in the existing pay scales. Further details regarding Government's decision will follow.

Yours Sincerely,
Sd/- K. K. Moghe,
(K. K. Moghe)

Dr. D. Y. Gohokar,
Vice-Chancellor,
Nagpur University, Nagpur.

### एम्. फील ची नवी अट सर्व जुन्या शिक्षकांना लागू केली

**३१०.** शासनाने राजकीय आणिबाणीचा उघडपणे दुरुपयोग केला होता. ४ ऑक्टोबर १९७५ च्या **ह्या शासन आदेशात एम.फिल.पदवी सर्वच प्राध्यापकांना नवीन वेतनश्रेणी (रु. ७००-१६००) देताना आवश्यक केली होती, त्यावेळी केरळ सोडल्यास देशातील इतर कोणत्याही राज्यात ही पदवी दिली जात नव्हती.** हे शासनाचे कृत्य पूर्णतः बेकायदेशीर होते. कोणत्याही नोकरीत पात्रता ही प्रथम नेमणुकीच्या वेळची असणे आवश्यक असते. (म्हणून तर आय.ए.एस. अधिकाऱ्यांना वेतनश्रेणी सुधारतांना आपल्या पात्रतेत भर घालावी लागत नाही), शिवाय, युजीसीने नवीन अर्हता, नवीन भरती होणाऱ्या प्राध्यापकांसाठी लावली होती आणि त्यांनी ती अर्हता पुढील पाच वर्षात प्राप्त करावयाची होती. पण ही अर्हता सर्वच नव्या व जुन्या प्राध्यापकांना आवश्यक आहे, असे ह्या शासन निर्णयात नमूद केले होते.

### अनेक निषेधार्ह बाबींचा समावेश

**३११.** ४ ऑक्टोबर १९७५ चा जो शासननिर्णय राज्यशासनाने काढला त्यामुळे पात्रतेच्या अटींमध्ये बेकायदेशीरपणे बदल करण्यात आला होताच त्याशिवाय इतर अनेक निषेधार्ह बाबी या निर्णयामध्ये नमूद करण्यात आल्या होत्या. (१) प्राध्यापकांचे आठवड्याचे काम २० घड्याळी तास म्हणजे जवळ जवळ २५ तासिका असे दाखविण्यात आले होते. मुळात हे काम १५ तासिका व ३ ट्युटोरियल असे होते. (२) शिक्षकांना मिळणारी उन्हाळ्याची व दिवाळीची सुटी लक्षात घेता प्राध्यापकांनी परीक्षेचे सर्व काम कोणताही मोबदला न घेता करावे अशी जगावेगळी व भारतात कुठेही नसलेली अट या शासननिर्णयात टाकण्यात आलेली होती. (३) ७००-१६०० वेतनश्रेणीमध्ये १३०० च्या टप्प्यावर प्राध्यापकांच्या कामाचे मुल्यमापन केले जाईल व तो त्या कसोटीवर टिकला तर त्याला १३०० च्या पुढील वार्षिक वेतनवाढी अनुज्ञेय होतील. (४) आणखी एक अत्यंत अनिष्ट विचार या शासननिर्णयामध्ये होता, तो असा की, सर्वदूर एकसूत्रता आणण्याच्या प्रयोजनासाठी शासन विद्यापीठाच्या कुलगुरुंना व कुलसचिवांना आदेश देतील व त्याप्रमाणे आपल्या नियमात विद्यापीठांना ते आदेश समाविष्ट करावे लागतील अशी ही विचित्र अट होती.

### महासंघाने शासननिर्णयाचा धिक्कार केला

**३१२.** ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासन निर्णयाचा धिक्कार करणारी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची सभा ऑक्टोबर १९७५ च्या शेवटच्या आठवड्यात "किंम्मतराय बिल्डिंग" या महर्षी कर्वे मार्गावरील मुंबई विद्यापीठाच्या इमारतीमधील मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या (BUCTU) कार्यालयामध्ये झाली होती. मी स्वतः महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेच्या कार्यकारी मंडळाचा सदस्य या नात्याने या बैठकीला हजर होतो. मला आजही स्पष्टपणे आठवते, इमारतीच्या तळाशी पोलिसांचा गराडा पडला होता. पोलीस वाहनांचा मोठा ताफा हजर होता. **शासनाचा धिक्कार करणारा ठराव महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला.**

*(सहपत्र चार : परिच्छेद ३०८ पहा)*

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
No. USG 1175/U,
**Education Department,**
**Sachivalaya Annexe, Bombay-32**
**Dated : 3 July 1975**

To,
Prof. B. T. Deshmukh,
President NUTA,
Vidarbha Housing Board,
Colony, near Maltekadi,
Amravati.

**Subject :-** University and College Teachers Recruitment Restriction on the ....

Sir,

I am directed to forward a copy of Government Circular, Education Department, No. USG 1175/U, **dated 16-5-1975** on the subject mentioned above for information and guidance.

Your faithfully,
(B. V. Tembe)
Under Secretary to Government,
Education Department.

*****

### संघटनेचे अध्यक्ष व सचिव यांना स्थानबद्धतेत ठेवण्यात आले

३१३. धिक्काराच्या एका जाहीर सभेनंतर **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष डॉ. एल. बी. केणी व सरचिटणिस प्रा. किशोर ठेकेदत्त यांना १ नोव्हेंबर १९७५ रोजी 'मिसा'खाली अटक करून १५ महिने स्थानबद्धतेत ठेवण्यात आले.** या उभय नेत्यांना १ नोव्हेंबर १९७५ रोजी अटक करण्यात आली त्यावेळच्या प्रसंगाचे तपशीलवार वर्णन महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष प्रा. सदाशिवन यांच्या "Formation of the MFUCTO" या लेखामध्ये आलेले आहे. ते पुढीलप्रमाणे :-

"On 1st November 1975, Prof. Theckedath proceeded to the then BUCTU Office (Kimatrai Building, near Marine lines Station, Mumbai) where he had called Prof. Ishwar Singh (Kirti College) to meet him to discuss in detail the conditions contained in the GR. At the entrance on the ground floor of the said building two policemen stopped Prof.Theckedath from entering the premises and told him that he would not be allowed to go upstairs to the BUCTU Office and that he will have to go with them to the Police Headquarters near Crawford Market. Prof. Theckedath was only able to send a message to his family through Shri Chakradeo, librarian in one of the colleges who was present in the office and who came down to meet Prof. Theckedath. Prof. Theckedath was then taken to the police headquarters. For three hours he was made to wait there and was questioned on various aspects of the teachers' movement and his political connections, if any. Dr. Kenny was also brought there and they were informed that they had to be taken to Pune. Prof. Theckedath was allowed to go home and take his things. At home, while Prof.Theckedath had some food, Prof. Mrs. Shobha Theckedath gave some sweets to the policemen who were simply doing their duty at the command of their higher-ups. Prof. Theckedath was taken to Pune in a van and by about 3'Oclock reached the place." **(संदर्भ दोन पृष्ठ १०७)** डॉ.किशोर ठेकेदत्त यांना आपल्या धाकट्या मुलाच्या पहिल्या वाढदिवसाच्या दिवशी व भर दिवाळीमध्ये अटक करण्यात आली होती.

### कार्यवाहक अध्यक्ष व सरचिटणीस

३१४. प्रा. डॉ. लिलाधर केणी व प्रा. किशोर ठेकेदत्त या दोघांना स्थानबद्धतेत ठेवल्यानंतर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने तावडतोब बैठक घेऊन प्रा. व्ही. बी. कामत यांनी कार्यवाहक अध्यक्ष व ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी व इंग्रजीचे विख्यात प्राध्यापक श्री. एकनाथ मांजरेकर यांनी कार्यवाहक सरचिटणीस म्हणून कार्य करावे असे ठरविले. प्रा. व्ही. बी. कामत व प्रा. मांजरेकर यांनी तावडतोब आपल्या कामाची सुत्रे हाती घेतली व कामाला सुरुवात केली. कार्यकारी मंडळाच्या आम्हा सदस्यांना प्रा.कामत यांनी असे सांगितले की, कार्यवाहक अध्यक्ष व कार्यवाहक सरचिटणीस यांनाही उद्या अटक करण्यात आली तर पुढे कोणी कोणी एका नंतर एकाने अध्यक्ष व सरचिटणीस व्हायचे याची यादी मी एका कागदावर लिहून ठेवलेली आहे व तो कागद मी माझ्या पत्नीजवळ देऊन ठेवलेला आहे. त्यावेळी त्या त्या दोघांनी ती जबाबदारी पार पाडावी. अनेक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना स्थानबद्धतेत ठेवतांना त्या संघटनेचे दप्तर सुद्धा जप्त करण्यात येत होते व संघटनेचा निधी सुद्धा जप्त करण्यात येत होता. हे लक्षात घेऊन संघटनेच्या जवळ उपलब्ध असलेला कामकाजाचा अल्पसा निधी संघटनेचे कोषाध्यक्ष श्री. राजर्षी (पुढे मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव) यांनी वाई (जि. सातारा) येथील आपल्या मातोश्रीकडे ठेवला होता. तोंडी निरोप किंवा तोंडी सूचना किंवा फोनवरून सूचना मिळताच महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारिणीचे सदस्य वेगवेगळ्या ठिकाणी बैठकीसाठी जमा होत असत. मरीन लाईनला असलेल्या किमतराय बिल्डिंगमधील कार्यालयामध्ये सभा न घेता वेगवेगळ्या ठिकाणी या बैठका होत होत्या. माझ्या आठवणी प्रमाणे बहुतेक बैठका ह्या शिवाजी पार्कला प्रा.कामत यांच्या निवासस्थानी होत असत. तेथे आंदोलनाचे ठराव होत असत आणि मग त्याची अंमलबजावणी आपआपल्या विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये केली जात असे. आणीबाणीच्या त्या तडाख्यामध्ये अनेक संघटना शांत असतांना कार्य व कार्यालय त्यांनी बंद केलेले असतांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ मात्र आणीबाणीच्या परिस्थितीतही शासन निर्णयाला विरोध करण्याचे काम करीत आहे याचे अनेकांना आश्चर्य वाटत होते.

### कार्यवाहक व्यवस्था

३१५. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आपल्या दोन ज्येष्ठ नेत्यांना अटक झाल्यानंतर पुढची जी कार्यवाहक व्यवस्था केली त्याचे यथार्थ वर्णन प्रा. सदाशिवन यांच्या लेखामध्ये आलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"The MFUCTO had to signify to the Government at the Centre and the State that by arresting two of our leaders the movement will not come to an end nor will the teachers be cowed down into submission to the power that be. This was clearly evidenced when within minutes of the arrest, the MFUCTO elected Prof. V B. Kamath and Prof. E. N. Manjrekar as Officiating President and General Secretary in place of Prof. Dr. Kenny and Prof.Theckedath till the time two leaders were released." **(संदर्भ दोन पृष्ठ १०७)**

### "आमच्या नेत्यांना स्थानबद्धतेतून मुक्त करा"

३१६. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या ठरावानुसार १९७५ च्या नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यामध्ये महाराष्ट्रातून सर्व प्राध्यापकांनी आपल्या पोशाखावर एक बॅज लावून काम करावे असे ठरले. त्या बॅजवर **"आमच्या नेत्यांना स्थानबद्धतेतून मुक्त करा"** असा मजकूर लिहिलेला होता. नोव्हेंबर १९७५ मध्ये १७ तारखेला महाराष्ट्राच्या शिक्षणमंत्री श्रीमती प्रभाताई राव यांना एक निवेदन देऊन महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा **शासनाने निर्गमित केलेल्या शासननिर्णयाला तीव्र विरोध असल्याचे नमूद केले.** आमच्या नेत्यांना ताबडतोब मुक्त करण्यात यावे अशा प्रकारची पत्रे भारताच्या मा. राष्ट्रपतींना २२ नोव्हेंबर १९७५ या तारखेला महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी पाठवावी **असाही एक आंदोलनाचा कार्यक्रम महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने राबविण्यात आला.**

### एक दिवसाचे उपोषण

३१७. इतरही विद्यापीठांमध्ये काही प्राध्यापकांना स्थानबद्धतेत ठेवण्यात आलेले होते. स्थानबद्धतेत ठेवण्यात आलेल्या प्राध्यापकांना सेवामुक्त करू नये म्हणून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघातर्फे सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंना पत्रे देण्यात आली. अनेक ठिकाणी विद्यापीठाच्या वेगवेगळ्या प्राधिकरणामध्ये शिक्षक प्रतिनिधींनी तसे ठराव मांडले व ते मंजुरही झाले. **दिनांक ९ फेब्रुवारी १९७६ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी मुंबई येथे एक दिवसाच्या उपोषणाचा कार्यक्रम डॉ. केणी व प्रा. ठेकेदत्त यांची सुटका व्हावी यासाठी आयोजित केला होता.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने असा कार्यक्रम आयोजित केलेला आहे याची माहिती झाल्यामुळे त्याच वेळी येरवडा तुरुंगातील अटक झालेल्या व स्थानबद्धतेत असलेल्या वीस शिक्षकांनीही त्याच दिवशी उपोषण केले.

### परीक्षेच्या कामाचा मेहनताना अदा न करण्याबाबत

३१८.१ हा जो ४ ऑक्टोबर १९७५ चा नवीन शासननिर्णय महाराष्ट्र शासनाने काढला, त्यामध्ये शिक्षकांना परीक्षेच्या कामाचा मेहनताना द्यायचा नाही असाही एक निर्णय होता. यासंदर्भातच विद्यापीठाच्या परीक्षेवर पुन्हा बहिष्कार घालण्याचा निर्णय २५ फेब्रुवारी १९७६ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाला घ्यावा लागला. 'बुक्टु'ने त्याची प्रभावी अंमलबजावणी ताबडतोब सुरू केल्याने त्याचा ज्यांना बसायचा त्यांना चांगलाच चटका बसला.

३१८.२ दिवाळीच्या सुटीमध्ये तुम्हाला काय काम असते? परीक्षेचे काम

शिवशक्ती शिक्षण संस्था, कोठा, ता. कळंब, जि. यवतमाळ द्वारा संचालित

*शिवशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय, बाभूळगांव* *('नॅक'द्वारा मूल्यांकित B++ CGPA 2.85)*

*शिवशक्ती कनिष्ठ महाविद्यालय, बाभूळगांव*

*''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा*

प्रा. बाळासाहेब धांदे, व्यवस्थापक, शिवशक्ती शिक्षण संस्था, कोठा

विना मेहनताना करण्याला काय हरकत आहे? असे क्षुद्र युक्तिवाद काही सनदी अधिकाऱ्यांकडून अनौपचारिकपणे ऐकविले जात होते. प्रश्न मोबदल्याचा नव्हता तर तो देण्यात येत असलेल्या अपमानास्पद वागणुकीचा होता. शिवाय नाही म्हटले तरी मानमरातबाचे प्रश्नसुद्धा महत्त्वाचे होतेच. प्रत्येक व्यवसायाला स्वतःची एक प्रतिष्ठा असते व ती त्या त्या व्यावसायिकांनी आपल्या वर्तनाने जोपासावयाची असते. विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकरणांने उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनाचे काम अल्पशा मानधनासह आपल्यावर सोपविले आहे याबद्दल गौरव वाटण्याचा तो काळ होता. आणिबाणीच्या स्थितीचा फायदा घेऊन असा गौरव वाटण्याऐवजी सक्तीचे काम म्हणून प्रत्येक शिक्षकाच्या बोकांडी बसण्याचा सरकारी हुकूम म्हणजे कालचक्र एकदम उलटे फिरविण्याचा प्रकार होता.

**३१८.३** (a) शंभर वर्षाहून जास्त काळ मुंबई विद्यापीठामध्ये व ५० वर्षाहून जास्त काळ नागपूर विद्यापीठामध्ये सुरू असलेली ही परंपरा विद्यापीठांशी किंवा शिक्षकांशी चर्चा न करता एकाएकी मोडीत काढण्याचा शासनाचा हा निर्णय खेदजनक होता. (b) शिवाय विद्यार्थ्यांकडून तुम्ही परीक्षेच्या कामासाठी फी गोळा केलेली आहे. ती झाकून ठेवायची व परीक्षेच्या कामासाठी ती न वापरता "अन्यत्र" त्याचा वापर करण्याचा हा डाव आहे असे संघटनेचे म्हणणे होते. (c) वेगवेगळे विषय व त्यातील विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन एकदा लष्करी सेवेसारखी ही सेवा सक्तीची केली की सक्ती करणाऱ्या शक्तीला समन्यायी वाटपाचे धोरण ठरविण्याच्या या किचकट स्वरूपाच्या कामाला तोंड देण्याची कोणतीही व्यवस्था व कोणताही विचार कोणीही न करता "लागली लहर व केला कहर" या पद्धतीने केवळ आणिबाणीचा लाभ घेण्याच्या हेतूने ही व्यवस्था अस्तित्वात आली होती. (d) भारतामध्ये असा चमत्कार कोणत्याही राज्यामध्ये घडविण्यात आलेला नव्हता. (e) विद्यापीठ अनुदान आयोगाने अशी कोणतीही योजना सुचविली नव्हती. (f) आयोगाने सुचविलेल्या वेतन पुनर्रचनेची अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेत परीक्षा मूल्यांकनाच्या व्यवस्थेची रचना बदलवून टाकण्याची एक अनायसे आलेली सुवर्ण संधी म्हणून या संधीचा वापर करणे लहरीपणाचे होय असे संघटनेचे याबाबतचे मुख्य म्हणणे होते.

*सहपत्र : पाच (परिच्छेद ३१८.५ पहा)*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**

Special Civil Application No. 3036 of 1975 : Dist : Bombay

**Maharashtra Federation of University & College Teachers Organisations,**
Bombay and 7 others......Petitioners
**VERSUS**
**State of Maharashtra** & 7 Ors...... Respondents.

**STATEMENT**

It is submitted that the Writ Petition is fixed for final hearing on 1-3-1976 before this Hon'ble High Court.

Without prejudice to the rights and contentions of the parties and till this High Court takes a decision in the matter, ensuing examinations for March, April, May 1976 are to take place and **the examination remuneration of the Universities teachers has to be considered.**

The State wishes to inform this Hon'ble Court that during the pendency of this Writ Petition and till this Hon'ble Court takes a final decision, **the State of Maharashtra will have no objection to the University of Bombay, Nagpur, Poona, Marathwada, Shivaji and S.N.D.T. (Women) paying the examination remuneration to the teachers of the repective Universities for the ensuing examinations to be held in March, April, May 1976 only,** subject to final adjustment. The Government of Maharashtra will accordingly request the said Universities to make this payment of examination remuneration, to the respective teachers subject to final adjustment.

The State of Maharashtra wishes to place this statement on the record of this Hon'ble Court to keep the Hon'ble Court apprised of the action taken during the pendency of this Writ Petition.

Sd/-
Counsel for the State of
Maharashtra.

**Bombay. : 6.2.1976**

*****

**३१८.४** परीक्षेच्या कामाबद्दल मेहनताना (Remuneration) देण्याचा विषय अशारितीने वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्यांची सुधारणा करण्याच्या केंद्र शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी करतांना काढलेल्या शासननिर्णयात राज्यशासनाने घुसाडण्याला संघटनेचा विरोध असण्याची काही घटनात्मक व कायदेशीर कारणेसुद्धा होती. देशभर उच्च शिक्षणक्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्थांचा दर्जा कायम राखण्याचे व त्यांच्यामध्ये समन्वय राखण्याचे काम देशाच्या घटनेने केंद्र शासनाकडे व फक्त केंद्र शासनाकडे सोपविलेले होते. "Co-ordination and determination of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions." (Entry 66 in the Union List i.e. List I of Seventh Schedule of the Constitution of India.) उपरोक्त विषय भारतीय घटनेच्या सातव्या परिशिष्टामध्ये पहिल्या म्हणजे केंद्र सूचीमध्ये ६६ व्या क्रमांकावर समाविष्ट होता. या अधिकाराचा वापर करून त्यासाठी केंद्र शासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाचा कायदा १९५६ मध्ये प्रख्यापित केला होता. या कायद्यातील तरतुदींचा वापर करून विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन **केंद्र शासनाने संबंध देशभरातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या करिता वेतन सुधारणेची योजना निश्चित केली होती व ती दिनांक ३० मार्च १९७४ च्या पत्राद्वारे राज्यांना कळविली होती. या योजनेमध्ये परीक्षेचे काम विनामोबदला करून घेण्याची व्यवस्था कोठेही व दुरान्वयानेसुद्धा समाविष्ट नव्हती.** उच्च शिक्षणक्षेत्रात सबंध देशभर समन्वय व समानता ठेवण्याची घटनेने सोपविलेली जबाबदारी पार पाडतांना केंद्र शासनाने सुचविलेल्या उपरोक्त योजनेमध्ये "विना मेहनताना परीक्षा काम" ही उपव्यवस्था घुसाडण्याचा एकट्या महाराष्ट्र राज्याने केलेला प्रयत्न घटनेतील तरतुदींचा भंग करणारा आहे अशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची मांडणी होती. राज्यशासनाचे हे कृत्य घटनाबाह्य तर आहेच पण कायद्याने विद्यापीठांना परीक्षा संचालनाच्या बाबतीत जी स्वायत्तता दिलेली आहे त्या स्वायत्ततेवर कुठाराघात करणारे व म्हणून बेकायदेशीरपणाचे आहे असेही संघटनेचे म्हणणे होते.

**३१८.५** ज्येष्ठ अधिवक्ते श्री. के. टी. सुळे यांनी अतिशय प्रभावीपणे संघटनेचे उपरोक्त मुद्दे खूपच कष्टपूर्वक मा.खंडपीठासमोर मांडले होते. शिवाय आणीबाणीच्या या संकटकाळातसुद्धा अत्यंत धैर्याने पुन्हा परीक्षा बहिष्काराचा निर्णय जाहीर करून अयोग्य गोष्टीला, आपल्या अध्यक्ष व सचिवांना शासनाने स्थानबद्धतेत ठेवल्यानंतरसुद्धा, ही संघटना प्रभावीपणे विरोध करीत आहे याचे कौतुकमिश्रीत आश्चर्य मा. न्यायमूर्तींना वाटत होते. अशा वातावरणात ॲड. सुळे यांच्या युक्तिवादामुळे मा. खंडपीठातील उभय न्यायमूर्ती प्रभावित झाल्याचे न्यायालयात उपस्थित असलेल्या आम्हा प्रतिनिधींना स्पष्टपणे दिसत होते. मा. न्यायमूर्तींच्या काही उद्गारावरून याबाबतचा अंतरिम आदेश (Interim Order) आपल्या विरोधात जात आहे असे लक्षात आल्याबरोबर सरकारी वकिलांनी मला आपण वेळ द्यावा याबाबतीत मी शासनाकडून सूचना घेतो, असे प्रतिपादन केले. पुढच्या तारखेला म्हणजे ६ फेब्रुवारी १९७६ रोजी मा. खंडपीठासमोर सपशेल माघार घेणारे शपथपत्र सरकारी वकिलांनी दाखल केले. असे शपथपत्र दाखल करतांना मुजोरी मात्र कायम ठेवली. **"मार्च-एप्रिल-मे १९७६ च्या परीक्षेत महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांनी पूर्वीप्रमाणे परीक्षेचा मेहनताना देण्यास शासनाची कोणतीही हरकत असणार नाही."** ही सपशेल माघार होती. पण त्याचबरोबर "आमची मूळ भूमिका मांडतांना आमचे हक्क व आमचे युक्तिवाद यांना यामुळे कोणतीही बाधा येणार नाही" ही त्यातील मूजोरी होती.

**३१८.६** आणीबाणीच्या त्या दहशतीच्या वातावरणामध्ये सुद्धा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ न्यायालयाबाहेर व खुद्द न्यायालयासमोर किती चिवटपणे संघर्ष करीत होता हे समजण्यासाठी सरकारी वकिलांनी दिनांक ६ फेब्रुवारी १९७६ रोजी मा. खंडपीठासमोर शपथपत्रासह सादर केलेले **शासनाचे निवेदन** मुळातूनच वाचले पाहिजे. म्हणून मी ते **सहपत्र : पाच** म्हणून सोबत दिलेले आहे. येथे परीक्षेबाबतचे हे अपकृत्त्य शासनाने या निवेदनाद्वारे एका परीक्षेपुरते मागे घेतले होते. पुढे संघटनेशी वाटाघाटी करून उभयपक्षी एक मतैक्यपत्र याच खंडपीठापुढे सादर करून शासनाला ते अपकृत्त्य कायमस्वरूपी मागे घ्यावे लागले, पण तो नंतरचा घटनाक्रम आहे. त्याचे वर्णन पुढे येईलच. **आजच्या पुरते बोलायचे झाल्यास एका परीक्षेपुरते का होईना शासनाने अपकृत्त्य मागे घेतल्यामुळे महासंघाने परीक्षा बहिष्कारसुद्धा मागे घेतला.**

### एकाही शिक्षकाची सेवामुक्ती झाली नाही

**३१९.** दहा अधिक दोन अधिक तीनच्या आकृतिबंधामुळे जवळ जवळ **बारा ते तेरा हजार शिक्षकांना सेवामुक्त व्हावे लागत असतांना अशा शिक्षकांना सेवामुक्त करण्यात येऊ नये** यासाठी लहान मोठ्या आंदोलनाचा सपाटा त्या आणीबाणीच्या काळातही महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने सुरू ठेवला होता. त्यामुळेच १२ जून १९७६, २१ जून १९७६ व १० सप्टेंबर १९७६ या तीन दिवशी शिक्षणमंत्री श्रीमती प्रभाताई राव यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी

मंडळाशी चर्चा केली. या सर्व चर्चेचा परिणाम म्हणून आणिबाणीच्या त्या अतिशय कठीण काळात एकाही प्राध्यापकांची सेवामुक्ती झाली नाही ही एक विशेष घटना होय.

### विकृत शासननिर्णयावर मा. उच्च न्यायालयाचा स्थगनादेश

**३२०.** दिलेली आश्वासने पूर्णपणे पायदळी तुडविणाऱ्या व अतिशय विकृत मनोवृत्तीने काढण्यात आलेल्या ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासन आदेशातील अनेक असमर्थनीय, अशैक्षणिक व अन्याय्य बाबी पूर्ण रद्द व्हाव्यात म्हणून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने एक रिट पिटीशन १० ऑक्टोबर १९७५ रोजी मुंबई उच्च न्यायालयामध्ये सादर केली होती. **१५ नोव्हेंबर १९७५ रोजी उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑक्टोबर १९७५ रोजीच्या शासन आदेशाच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली.** त्यावेळी कामगारांच्या वतीने उच्च न्यायालयामध्ये काम करणारे ज्येष्ठ विधिज्ञ के. टी. सुळे, ॲड. के. के. संघवी व ॲड. मदन फडनीस या त्रिमूर्तींनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची बाजू अत्यंत समर्थपणे न्यायालयामध्ये मांडली. या शासननिर्णयामुळे मिळणाऱ्या वेतनश्रेणीचा कोणत्याही शिक्षकाने स्वीकार करू नये असा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ठराव केला होता हे खरे असले तरी अनायसे जे मिळत आहे ते घेऊन टाका असे म्हणणारे काही लोक निश्चितपणे सापडले असते, पण आता न्यायालयाने स्थगिती दिल्यामुळे ४ **ऑक्टोबरच्या शासन निर्णयाची अंमलजावणी ही पूर्णपणे थंड्या बस्त्यात पडलेली होती.**

### ॲड. के. टी. सुळे व ॲड. मदन फडणीस

**३२१.** देशात अशा रितीने आणिबाणीची स्थिती असतांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा न्यायालयीन संघर्ष फार मोठ्या प्रमाणात फलदायी ठरला याचे फार मोठे श्रेय ॲड. के. टी. सुळे व ॲड. मदन फडणीस यांनी केलेल्या मेहनतीला आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे ज्येष्ठ नेते श्री. संभाजीराव जाधव हे स्वतः प्रभारी सदस्य म्हणून न्यायालयीन कामकाज पहात होते. त्यांनी याबाबतची माहिती तपशीलवारपणे आपल्या लेखात नमूद केली आहे. ती शब्दशः पुढीलप्रमाणेः-

"ॲड. के. टी. सुळे यांनी महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापक वर्गास उच्च न्यायालयाच्या माध्यमातून एकाहून एक श्रेष्ठ दर्जाच्या सवलती मिळवून दिल्या; त्या कामात त्यांचे भाचे ॲड. मदन फडणीस यांचेही सहकार्य अभूतपूर्व लाभले; ह्या दोघा ॲडव्होकेट असणाऱ्या मामा-भाच्यांनी 'एमफक्टो' या प्राध्यापक संघाच्या निम्म्याहून जादा लढाया पूर्ण यशस्वी केल्या. त्यावेळी राजकीय वातावरण आणीबाणीमुळे दहशतीचे होते. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांवरही कधी कारवाई होईल, हे सांगता येत नव्हते. लाखोने लोकांच्या अटका होत होत्या; वृत्तपत्रांवर कमालीची नियंत्रणे होती; बातम्या / लेख शासनास दाखवून छापाव्या लागत होते. जवळजवळ सर्व राजकीय विरोधक देशभरच्या तुरुंगात ठेवले होते. अशा आणीबाणीने पूर्णतः ग्रासलेल्या प्रतिकूल वातावरणात ॲड.सुळे व ॲड. मदन फडणीस यांनी प्रथम ४ **ऑक्टोबर, १९७५ च्या शासन आदेशास स्थगिती मिळविली.** पुढे लगेच ऑक्टोबर, १९७५ व मार्च-एप्रिल, १९७६ च्या **विद्यापीठ परीक्षांचा मेहनताना** दि. ६-२-१९७६ रोजी उच्च न्यायालयातून मिळवून दिला. असा मेहनताना देण्याची शंभर वर्षांहून अधिक काळ चालत आलेली प्रथा, विद्यार्थ्यांकडून विद्यापीठांनी अगोदरच घेतलेली परीक्षा फी आणि सर्व प्राध्यापकांना परीक्षेच्या कामाचे समान वाटप करण्यातील व्यवहार्य अडीअडचणी इत्यादी मुद्यांच्या आधारे प्राध्यापकांना कायमचा मिळवून दिलेला विद्यापीठ परीक्षेच्या कामांचा मोबदला आणि त्याहूनही **असे परीक्षा काम प्राध्यापकांना सक्तीचे करता येत नाही, असा न्यायालयाचा निर्णय** ही फार महत्त्वाची बाब ठरलेली आहे. नंतरच्या एका तारखेस ॲड. सुळे साहेबांनी दि.१ जानेवारी १९७३ पासून मिळणाऱ्या रु. ७००-१६०० या **नव्या वेतनश्रेणी पोटी रु. ७५० आगाऊ (ॲडव्हान्स) वाढ सर्व प्राध्यापकांना मिळवून दिली.** (त्यावेळी रु. ७५० ही रक्कम प्राध्यापकांच्या दीड ते दोन महिन्यांचे वेतनाइतकी होती.)" **(संदर्भ दोन पृष्ठ ११३)**

### महासंघाशी चर्चा करण्यास न्यायालयाने शासनाला भाग पाडले

**३२२.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने चिकाटीने हा जो लढा मा.न्यायालयासमोर चालविला त्यामुळे त्या आणीबाणीच्या काळातसुद्धा शासनाला महासंघाशी बोलणी करायला मा. न्यायालयाने भाग पाडले. याबाबत संभाजीराव जाधव यांच्या लेखातील मजकूर पुढीलप्रमाणे :-

"ॲड. के. टी. सुळे हे आपल्या व्यवसायात ज्येष्ठ ॲडव्होकेट्सपैकी एक होते; त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि त्यांच्या केस मांडण्याच्या पद्धतीचा न्यायाधिशांवर आपोआपच गंभीर परिणाम होत असे. **एका रविवारी देखील न्यायाधिशांनी ॲड. सुळेसाहेबांचे ह्या केस संदर्भातील म्हणणे ऐकण्यासाठी तारीख दिली आणि म्हणणे ऐकून घेतल्यावर निर्णयही दिला होता.** तो निकाल म्हणजेच परीक्षेचा मेहनताना देण्यासंबंधीचा होय. वकिलांच्या व्यक्तिमत्वाचा न्यायाधिशांवर इतका परिणाम झाल्याची उदाहरणे अगदी दुर्मिळच होत. अखेरीस एकदा न्यायाधिशांनी महाराष्ट्र शासनाचे त्यावेळचे शिक्षण सचिव श्री. डी. एम. सुकथनकर यांना स्पष्टपणे सांगितले. **ॲड. सुळे यांनी प्राध्यापकांसाठी जे जे मांडले आहे, ते ते सर्व युजीसीच्या म्हणण्यानुसारच मांडले आहे. युजीसीच्या मार्गदर्शक तत्वाबाहेर जाऊन काहीही मागितलेले नाही. महाराष्ट्र शासनास २० टक्के रक्कम प्राध्यापकांच्या नव्या वेतनापोटी द्यावी लागत आहे, म्हणून महाराष्ट्र शासनास युजीसी बाहेरील अटी नव्याने घालता येणार नाहीत;** युजीसीचा जन्मच मुळी प्राध्यापकांच्या सेवाशर्ती व इतर बाबी संबंध देशभर समान करण्यासाठी झालेला आहे. भारतीय लोकसभेने तसा कायदा सन १९५६ मध्ये केलेला आहे. तो शासनाने प्रथम अभ्यासावा. **सद्यःपरिस्थितीत म्हणजे आणीबाणीच्या काळात शासनाने 'एमफक्टो' या प्राध्यापक महासंघाबरोबर तातडीने चर्चा करावी आणि तडजोड घडवून आणावी; अन्यथा ह्या याचिकेचा निकाल आजच लागल्यासारखा आहे; असे स्पष्टपणे महाराष्ट्र शासनास सुनाविले.** त्यामुळे शासनास आपण केलेल्या गंभीर चुका ध्यानात आल्या आणि म्हणून शासनाने दि. ६-९-१९७६ रोजी 'एमफक्टो'बरोबर बोलणी करण्याचे मान्य केले आणि याचिकेचे कामकाज स्थगित ठेवले गेले; 'एमफक्टो' या प्राध्यापक संघटनेने मिळविलेले हे एक अपूर्व यश होते, ह्यात शंकाच नाही. ॲड. सुळे आणि ॲड. मदन फडणीस यांची ह्या कामातील कामगिरी केवळ शब्दांतीत अशीच मानावी लागते; दोघांनीही आपले काम विना मोबदला केले, हे तर आणखी शब्दांतीत आहे, ह्यात कसलीच शंका नाही! महाराष्ट्रातील प्राध्यापकांवरील ह्या दोघांचे ऋण कधी फिटणार देखील नाही, अशा कायम स्वरूपाचे ते आहे." **(संदर्भ दोन पृष्ठ ११२)**

**३२३.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा हा संघर्ष सुरू असतांना नुटाच्या क्षेत्रामध्ये आणीबाणीच्या या काळात घडलेल्या दोन घटनांचा मुद्दाम उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. यातील पहिली घटना म्हणजे 'नुटा'ने ५ नोव्हेंबर १९७५ रोजी प्रकाशित केलेल्या "नवीन वेतनश्रेणीबाबतचा शासकीय ठराव : एक निवेदन" या लहानशा पुस्तिकेबाबतचा असून दुसरा प्रसंग नागपूर मधील दोन प्राध्यापकांना सेवामुक्त करण्यासाठीची परवानगी देण्याबाबत महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने केलेली विनंती नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने फेटाळून लावण्याबाबतची आहे.

**३२३.१** संघटनेचा विरोध सर्व शक्तीनिशी मोडून काढावा असा शासनाने निर्धार केला होता. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांना अटक करून हा विरोध कमी होत नसेल तर संलग्न विद्यापीठ निहाय संघटनांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनासुद्धा स्थानबद्ध करण्याचे धोरण शासनाच्या पातळीवर ठरले होते. त्याप्रमाणे विद्यापीठ निहाय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या याद्याही तयार करण्यात आल्या होत्या. शासनाच्या धोरणाप्रमाणे त्या त्या जिल्ह्यातील अशा पदाधिकाऱ्यांच्या याद्या बहुधा त्या त्या जिल्ह्यातील सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना दाखविण्यात आल्या होत्या किंवा देण्यात आल्या होत्या. ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयाला विरोध करणारी महासंघाच्या कार्यकारी मंडळाची मुंबई येथील बैठक आटोपून आम्ही सर्व पदाधिकारी आपआपल्या गावी परत आलो तेव्हा असा निर्णय झाल्याची चुणूक आम्हाला दिसून आली. व्यक्तिशः मी त्यावेळेला नुटाचा अध्यक्ष होतो. माझ्याविषयी सद्‌भावना बाळगणाऱ्या अमरावती येथील सत्ताधारी पक्षाच्या दोन विधानमंडळ सदस्यांनी मला बोलावून याविषयीची कल्पना दिली. "या भानगडीत मी पडू नये व या कटकटीपासून दूर रहावे" अशा प्रकारचा सल्ला मला त्यांनी दिला. संघटना कशासाठी संघर्ष करीत आहे याची त्यांना कल्पना नव्हती व ते जाणून घेण्यात त्यांना रसही नव्हता. केवळ माझ्यावरील स्नेहापोटी ते मला तो सल्ला देत होते, हे उघड होते. सत्ताधारी

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला तर्फे

''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा बुलेटीन'च्या विशेषांकास आमच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छूक : मा. हर्षवर्धन प्र. देशमुख, अध्यक्ष (श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती) : डॉ.आर.एम.भिसे, प्राचार्य

पक्षाचे तिसरे एक ज्येष्ठ विधानमंडळ सदस्य व ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी श्री.पी.के. उर्फ अण्णासाहेब देशमुख यांनी मात्र याबाबतीत माझ्याशी जे बोलणे केले ते नमूद करणे मला आवश्यक वाटते. तुमच्याशी काही महत्त्वाचे बोलायचे आहे असा फोनवरून त्यांचा निरोप आल्यामुळे मी जेव्हा त्यांना भेटायला गेलो तेव्हा बोलण्याची सुरुवातच त्यांनी अस्खलीत इंग्रजीत पुढील प्रमाणे केली. ते म्हणाले "B.T. ! You are under clouds. If it is a trifle matter forget it, but if it is a matter of principle, don't feel shy of fighting, Fight it out. Don't be crouch down." अण्णासाहेबांनी सर्व विषय समजावून घेतला व त्याबाबत यथोचित मार्गदर्शन केले. अण्णासाहेबांच्या या बोलण्यातून शासनाच्या स्तरावर होत असलेल्या हालचालीची पूर्ण कल्पना आम्हाला आलेली होती.

**३२३.२** मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, पुणे, नागपूर सर्वच विद्यापीठ संघटनांचे आम्ही पदाधिकारी एकमेकांशी फोनवरून संपर्कात होतो. मला आजही आठवते, त्यावेळी फोनवरून संपर्क झाल्याबरोबर गंमतीने पहिली विचारणा "काहो! आहात की 'गेला' आहात?" या शब्दात होत असे. सर्व पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या क्षेत्रामध्ये या शासन निर्णयाला विरोध करण्याचा निर्णय ठामपणे राबविण्याचे ठरविले होते. त्यावेळी "नुटा बुलेटीन" सुरू झालेले नव्हते. तेव्हा सारा मजकूर लिहून काढून संघटनेचा अध्यक्ष या नात्याने याबाबत एक लहानशी पुस्तिका प्रसिद्ध करावी असे संघटनेने ठरविले. या पुस्तिकेचा सर्व मजकूर तयार झाला. अमरावती येथे प्राध्यापकांची सभा घेऊन तो मजकूर वाचून दाखविण्यात आला व पुस्तिका प्रकाशनाच्या तयारीला माझे सर्व सहकारी लागले. दरम्यानच्या काळामध्ये नुटाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक घेण्यात आली व सर्व मजकूर वाचून संमत करण्यात आला."**नवीन वेतन श्रेणी बाबतचा शासकीय ठराव - एक निवेदन**" असा या पुस्तिकेचा मथळा असावा असे ठरले. आणीबाणीमुळे वातावरणात एक प्रकारचा तणाव व भिती होती. मी स्वतः व माझ्या काही सहकाऱ्यांनी ज्यावेळेला हे निवेदन छापून घेण्यासाठी काही परिचित मुद्रणालयामध्ये प्रयत्न केला. तेंव्हा "या कटकटीत तुम्हीही पडू नका व आम्हालाही पाडू नका" अशा प्रकारचा सल्ला मिळाला. कायद्याप्रमाणे अशा पुस्तिकेवर लेखकाचे, प्रकाशकाचे व मुद्रकाचे नाव छापणे बंधनकारक असते हे येथे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**३२३.३** ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी स्व. श्री. बाळासाहेब मराठे हे अमरावती येथून प्रकाशित होणाऱ्या दै. हिंदुस्थानचे संस्थापक संपादक होते. माझ्या विद्यार्थी जीवनामध्ये मी दैनिक 'हिंदुस्थान' मध्ये काम करीत माझे शिक्षण पूर्ण केले होते. १९६४ मध्ये अधिव्याख्याता झाल्यानंतरसुद्धा 'हिंदुस्थान'मध्ये माझी नियमित बैठक रहात असे. दै. हिंदुस्थान हे 'हिंदुस्थान' प्रेसमधून छापल्या जात असे व त्याचवेळेला इतर छपाईच्या कामांसाठी 'महाराष्ट्र प्रेस' या नावाची एक समांतर व्यवस्था हिंदुस्थानमध्ये उपलब्ध होती व बाळासाहेबांचे धाकटे चिरंजीव श्री उल्हास मराठे यांचेकडे ती व्यवस्था होती. सदरहू पुस्तिकेच्या मुद्रणामध्ये येत असलेल्या अडचणी पाहून मी याबाबत बाळासाहेबांशी चर्चा केली. त्यांना समस्येचे स्वरूप सांगितले. सर्व माहिती काळजीपूर्वक ऐकून घेतल्यावर बाळासाहेबांनी जे उद्गार काढले ते असे की "ते तुझे एम.फील वगैरे काय आहे ते मला काही माहिती नाही. पण तू त्या संघटनेचा अध्यक्ष आहेस. शासनाने तुमच्यावर काही अन्याय केलेला आहे. तुमच्या नेत्यांना स्थानबद्ध करण्यात आलेले आहे. अशावेळी मागे न हटण्याचा जो निर्णय तुम्ही लोकांनी घेतला आहे. तो योग्यच आहे. राहता राहीला पुस्तिकेच्या मुद्रणाचा प्रश्न. ती पुस्तिका छापायची की नाही हे तुलाच ठरवावयाचे आहे. पण ती छापायची ठरले तर त्याबाबत पुढची जबाबदारी माझ्यावर सोपव. त्याची तू काळजी करू नकोस. उद्या तुरुंगात जायची वेळ आली तर लेखक या नात्याने भाऊराव व मुद्रक या नात्याने माझा उल्हाससुद्धा तुझ्याबरोबर येईल." त्यांच्या या उद्‍गारांनी मला मोठाच आधार मिळाला. मी म्हणालो "बाळासाहेब ही पुस्तिका छापायचीच असे आमचे ठरले आहे." सर्व मजकुराची प्रत बाळासाहेबांनी हाती घेतली व २४ तासाच्या आत ती लहानशी पुस्तिका छापून तयार झाली. लहानशा आकाराच्या १८ पानांच्या "**नवीन वेतन श्रेणी बाबतचा शासकीय ठराव - एक निवेदन**" या मथळ्याच्या प्रा.बी.टी.देशमुख लेखक असलेल्या पुस्तिकेच्या शेवटच्या पानावर मुद्रक म्हणून "उल्हास बाळकृष्ण मराठे (उ.बा.मराठे) महाराष्ट्र प्रेस अमरावती" असे मुद्रकाचे नाव छापलेले आहे. त्यावेळेला प्राध्यापकांच्या सभा घेऊन या पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. या लहानशा पुस्तिकेचा पुढे कसा उपयोग झाला याबाबतची माहीती पुढे यथासमय येईलच.

**३२४.** "**नवीन वेतन श्रेणी बाबतचा शासकीय ठराव : एक निवेदन**" ही जी लहानशी पुस्तिका ५ नोव्हेंबर १९७५ रोजी 'नुटा'ने प्रकाशित केली होती, तिच्या पूर्वार्धामध्ये वेतनश्रेण्या लागू करतांना पात्रतेच्या अटींमध्ये शासनाने दिलेला शब्द एकदम कसा उलटा फिरविला याची तपशीलवार माहिती देण्यात आली होती. या पुस्तिकेच्या पुढच्या भागात केंद्र शासनाच्या योजनेतील "मूळ अटी" ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासन निर्णयाने कशा उलटसुलट करून टाकल्या होत्या याची माहिती देण्यात आली होती. **सहपत्र : सहा** म्हणून सोबत प्रसृत.

**३२५.** नागपूर विद्यापीठ क्षेत्रातील दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे आणीबाणीच्या काळात अनेक व्यक्तींना 'मिसा' अंतर्गत स्थानबद्धतेत ठेवण्यात आले होते. नागपूर येथील मथुरादास मोहता विज्ञान महाविद्यालयात काम करणारे प्रा. एम. ए. शेंडे व प्रा. एस. आर. मंगळगिरी या दोन प्राध्यापकांना अटक करण्यात आली होती. या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने ९ सप्टेंबर १९७६ रोजी एक पत्र पाठवून या दोन प्राध्यापकांना सेवामुक्त करण्यासाठी नागपूर विद्यापीठाची परवानगी मागितली होती. नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाच्या १८ सप्टेंबर १९७६ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्रमांक ८९ अन्वये हा विषय विचारार्थ ठेवण्यात आला होता. विद्यापीठाने अशी परवानगी द्यावी म्हणून शासनातर्फे कार्यकारी मंडळाच्या अनेक सदस्यांना निरोप देण्यात येत होते.

**३२६.** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांवर आलेले हे एक मोठे संकट आहे. कार्यकारी मंडळाच्या काही सदस्यांची भेट घेऊन मी याबाबतचे म्हणणे त्यांच्याकडे मांडले. कार्यकारी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री.बाबासाहेब घारफळकर, उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री.एन.एल.अभ्यंकर, ज्येष्ठ विधिज्ञ श्री.व्ही.आर.मनोहर यांनी आमच्या भुमिकेप्रती अनुकूलता दर्शविली. श्री.व्ही.आर.मनोहर यांनी काढलेले उद्‍गार आजही मला आठवतात. ते म्हणाले, "अहो बी.टी.! आमचे ज्येष्ठ अधिवक्ता श्री.राम जेठमलानी यांना काही कारण नसतांना स्थानबद्धतेत ठेवण्यात आले आहे. कार्यकारी मंडळाच्या बैठकीत तुम्ही शिक्षक प्रतिनिधींनी तुमची बाजू ठामपणे मांडली पाहिजे." त्या वेळच्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे दोन प्रतिनिधी सिनेटमधून विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळावर निवडून जात असत. मी स्वतः त्यापैकी एक प्रतिनिधी या नात्याने विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचा सदस्य म्हणून नुकताच निवडून गेलो होतो. दुसरे सदस्य हे शासकीय महाविद्यालयात कार्यरत असल्याने ते उपरोक्त प्रस्तावाला विरोध करणारे भाषण करतील हे शक्य नव्हते. हा प्रस्ताव चर्चेला आला त्यावेळी याबाबतची विरोधी भूमिका मांडण्याची जबाबदारी ही महत्त्वाची होती.

**३२७.** प्रस्ताव चर्चेला आला त्यावेळी त्या प्रस्तावाला विरोध करतांना मी जे मुख्य मुद्दे मांडले ते पुढीलप्रमाणे :- (१) या शिक्षकांना सेवामुक्त का करण्यात यावे? याबाबतचे कोणतेही तपशील आमच्यासमोर ठेवण्यात आलेले नाहीत. (२) केवळ शासनाने त्यांना स्थानबद्धतेत ठेवले आहे हे कारण

*सहपत्र : सहा (परिच्छेद ३२४ पहा)*

***नविन वेतन श्रेणी बाबतचा शासकीय ठराव : एक निवेदन***

Publication of Nagpur University Teachers Association

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या वतीने अध्यक्ष प्रा. बी. टी. देशमुख यांनी तयार केलेले हे निवेदन संघाच्या कार्यकारी मंडळाने महाराष्ट्राच्या माननीय शिक्षणमंत्री श्रीमती प्रभाताई राव यांना सादर करण्यासाठी सम्मत केले आहे.

**५/११/१९७५**

प्रकाशक :- प्रा. अरविंद बारहाते, शंकर नगर, नागपूर :

मुद्रक :- उ. बा. मराठे, महाराष्ट्र प्रेस, अमरावती

**हे सहपत्र शेवटी पृष्ठ २१७ वर दिलेले आहे.**

**एस.एम.सी. शिक्षण प्रसारक मंडळ, वाशिम द्वारा संचालित**

**सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशिम**

***''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा बुलेटीन'च्या विशेषांका करीता शुभेच्छा***

शुभेच्छूक : प्रा. हरिभाऊ क्षीरसागर, संस्थाध्यक्ष डॉ. संजय चौधरी, प्र. प्राचार्य

शिक्षकवृंद : प्रा. अनिल खाडे, डॉ. नागेश्वर कन्हाके, डॉ. शुभांगी दामले, डॉ. प्रज्ञा क्षीरसागर, डॉ. विजय पांडे, प्रा. प्रकाश राठोड, डॉ. मेघा देशमुख

सेवामुक्तीसाठी पुरेसे कारण होवू शकत नाही. (३) स्थानबद्धतेची कारणे शासनाच्या दप्तरी व परवानगी मात्र कारणे नसतांना किंवा कारणे ठावूक नसतांना विद्यापीठाने द्यावयाची हे न्यायसंगत नाही. (४) खुद्द शासकीय सेवेमध्ये कार्यरत असलेल्या अनेक शासकीय कर्मचाऱ्यांना स्थानबद्धतेत ठेवण्यात आले होते. त्यांच्या बाबतीत "त्यांना सध्या निलंबित केल्याचे समजावे" असा शासननिर्णय शासनानेच काढला होता. त्याचे मी सभागृहात वाचन केले. (५) शासकीय कर्मचाऱ्यांना स्थानबद्धतेत ठेवण्यात आले असेल तर त्यांना निलंबित (Suspended) समजायचे, मात्र संलग्न महाविद्यालयातील शिक्षकाला स्थानबद्धतेत ठेवण्यात आले असेल तर त्याला सेवामुक्त (Terminate) करायचे ही गोष्ट न्यायसंगत नाही. (६) संलग्न महाविद्यालयातील शिक्षकाला सेवामुक्त करावयाचे असेल तर त्याची प्रक्रिया "कॉलेज कोड" या ऑर्डिनन्स मध्ये सांगितली आहे, त्याप्रमाणेच प्रक्रिया पूर्ण करावी लागेल तशी ती पूर्ण करण्यात आलेली नाही व त्यामुळे हा प्रस्ताव मान्य करू नये असे मी प्रतिपादन केले.

**३२८.** त्या दिवशी कार्यकारी मंडळाच्या बैठकीत महाविद्यालयाने केलेली ती विनंती मान्य करण्यात आली नाही. कार्यकारी मंडळाचा हा निर्णय एकमताचा होता. नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने घेतलेल्या अनेक गौरवशाली निर्णयांमध्ये या निर्णयाचा समावेश करावा लागेल. आणीबाणीच्या अत्यंत तणावपूर्ण वातावरणात सुद्धा ज्या कार्यकारी मंडळाने ही विनंती मान्य न करण्याचा निर्णय एकमताने घेतला त्या कार्यकारी मंडळाचे आपण एक सदस्य होतो या गोष्टीचा मला नेहमीच अभिमान वाटत आलेला आहे.

### सत्ताधारी पक्षातीलच दोन गटांमध्ये ही सत्ता स्पर्धा

**३२९.** आणीबाणीच्या या काळातील एका राजकीय घटनाक्रमाचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. सत्ताधारी पक्षावर विरोधी पक्षाने मात करणे किंवा विरोधी पक्षाला सत्ताधारी पक्षाने हात दाखविणे ही लोकशाही व्यवस्थेमधील सामान्य प्रक्रिया आहे. विरोधी पक्ष त्या काळात फारसा/फारसे मजबूत नसल्यामुळे **सत्ताधारी पक्षातीलच दोन गटांमध्ये ही सत्ता स्पर्धा** जोरात चालत असल्याचे दृश्य अनेकदा पहायला मिळत असे. आणीबाणीच्या काळातील त्या वातावरणामध्ये या स्पर्धेने चांगलाच जोर धरला होता. मोठ्या प्रमाणामध्ये व्यक्तिगत लाभासाठी साखर कारखानदारीचा उपभोग घेण्याचा तो काळ नव्हता. खरोखर शेतकऱ्यांच्या हिताचा विचार डोळ्यासमोर ठेवून अनेक नेत्यांनी सचोटीने साखर कारखानदारी चालवून लोकमान्यता त्या काळात मिळविली होती. सहकारी तत्वावर चालविण्यात येणाऱ्या या कारखानदारीला शासनाचे पाठबळ नसल्यास ती कारखानदारी अडचणीत येत असे. सत्ताधारी पक्षात असूनसुद्धा भागभांडवल मिळण्यामध्ये शासनाने अडचणी उभ्या केल्याबद्दलच्या तक्रारी सत्ताधारी पक्षातील अनेकांनी त्यावेळी जाहीरपणे मांडल्या.

### तीन मंत्र्यांना राज्यमंत्रिमंडळातून वगळण्यात आले

**३३०.** आणीबाणीच्या या गदारोळातच फेब्रुवारी १९७६ मध्ये सर्वश्री वसंतदादा पाटील, मधुकरराव उर्फ बाळासाहेब चौधरी व राम बेलोसे या **तीन मंत्र्यांना राज्यमंत्रिमंडळातून वगळण्यात आले.** मंडळे, महामंडळे यावर नेमणुका करतांना सत्ताधारी पक्षाच्या एका गटावर अन्याय केला जात आहे, अशा तक्रारी जाहीरपणे होऊ लागल्या होत्या. क्रिया झाली की प्रतिक्रिया होणारच. त्या प्रतिक्रिया ज्याच्या त्याच्या स्वभावानुसार व व्यक्तिगत ठेवणीनुसार होणार. श्री. मधुकरराव उर्फ बाळासाहेब चौधरी हे आणीबाणीच्या या जुलुमाबद्दलचा आपला असंतोष जाहीरपणे प्रकट करीत असत. एका भाषणात तर त्यांनी "या देशात एक गांधी आला, त्याने मातीतून माणसे उभी केली. नंतर ह्या दुसऱ्या गांधी आल्यात त्यांनी माणसांचीच माती केली." ***(पृष्ठ १५० "लोकसेवक-बाळासाहेब चौधरी")*** असे उद्‌गार काढले होते. पक्षांतर्गत कटकटी त्या काळात किती वाढल्या होत्या हे यावरून लक्षात येईल. श्री.वसंतदादा पाटील यांनी आणीबाणीतील या कटकटीला कंटाळून "आपण राजकारण संन्यास घेत आहोत व परत न येण्यासाठी मुंबई सोडून सांगलीला जात आहोत." असे जाहीर निवेदन केले. "केंद्राच्या वेतनश्रेण्या जशाच्या तशा लागू करू" असा विधानसभेत शब्द दिलेला असतांना आणीबाणी लागू झाल्यावर तो शब्द पूर्णपणे फिरविल्यामुळे संतप्त झालेल्या शिक्षकांना या राजकीय घडामोडीचे अर्थ अजिबात कळत नव्हते अशातला काही भाग नव्हता.

### उभय नेत्यांची स्थानबद्धता

**३३१.** तिकडे पुण्याच्या येरवडा या मध्यवर्ती तुरुंगामध्ये डॉ.लिलाधर केणी व प्रा. किशोर ठेकेदत्त या दोघांनी काढलेल्या १५ महिन्याच्या स्थानबद्धतेच्या कालखंडामध्ये आपला विद्याव्यासंग, वाचन व लेखनाच्या माध्यमातून सातत्याने चालू ठेवला. या काळात "तडाखेबंद फिरण्याचा व्यायाम" हा त्यांचा मोठ्या मजबुतीने जोपासलेला आवडता छंद होता असे त्यांचे अनेक सहकारी सांगत. डॉ. केणी यांनी अनेक विद्यापीठांनी परिक्षणार्थ पाठविलेल्या पी.एच.डी. च्या प्रबंधाचे मूल्यमापन केले. इतिहासातील अनेक मर्मग्राही विषयावर आपल्या सहकारी स्थानबध्दांसमोर व्याख्याने दिली. डॉ. किशोर ठेकेदत्त यांनी स्थानबद्धतेच्या या काळामध्ये कार्ल मार्क्सच्या 'दास कॅपिटल'चे खंड तपशीलवार वाचण्यामध्ये आपला वेळ कामी लावला. त्या काळात त्यांनी काही काव्यरचनाही केल्या. त्यापैकी 'Dream' या मथळ्याची एक कविता त्यांच्या सहकाऱ्यांच्या हाती लागली व ती 'Economic Times' मध्ये त्यावेळी छापून आली. 'Quantum Theory' वर त्यांनी लिहिलेला एक लेख 'Social Scientist' या नियतकालिकामध्ये त्यावेळी छापून आलेला होता.

### संपूर्ण स्वातंत्र्य व स्वातंत्र्याचा संपूर्ण अभाव यातील अंतर

**३३२.** गणिताचे प्राध्यापक असलेल्या डॉ. किशोर ठेकेदत्त यांच्या एका सहकारी प्राध्यापकाने स्थानबद्धतेत असतांना त्यांना एक पत्र लिहून "मुंबई (संपूर्ण स्वातंत्र्य) व येरवडा (स्वातंत्र्याचा संपूर्ण अभाव) या दोन शहरातील अंतर हे बरेच मोठे आहे" असे नमूद केले. त्यावर डॉ. किशोर ठेकेदत्त यांनी आपल्या सहकारी प्राध्यापकाला पोस्ट कार्ड पाठवून उत्तर दिले, ते असे की "मुंबई आणि येरवडा यांच्यामधील अंतर खूप मोठे आहे हे खरे आहे, पण गणिताच्या प्राध्यापकाला ते मोजता येणार नाही इतके ते मोठे नाही." ज्या आपल्या सहकाऱ्याला त्यांनी हे पत्र लिहिले ते दुसरे तिसरे कोणीही नसून त्यानंतरच्या काळात अनेक वर्षे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्षपद भूषविलेले माजी अध्यक्ष प्रा. सी. आर. सदाशिवन हे होते. प्रा. सदाशिवन यांनी "Formation of the MFUCTO" या आपल्या लेखामध्ये स्वतः शब्दबद्ध केलेले हे वर्णन शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"Teachers outside the jail in Maharashtra remembered the leaders in jail and a number of teachers sent letters to them, I had also the pleasure of sending one letter to Dr. Theckedath in which I had stated that ***"it is a long distance between Mumbai and Erwada, between freedom and the absence of it",*** I did not expect that the letter would reach him because it may be destroyed on the way to the jail because there was strict censorship..... But to my great surprise, after about a month or so, I received a reply on a post card in the handwriting of Prof. Theckedath in which he stated, **"it is true that it is a long distance between Mumbai and Erwada but it is not so long that a teacher of Mathematics cannot fathom."** **(संदर्भ दोन पृष्ठ १०८)** प्रा.सदाशिवन यांना आलेल्या या पोस्टकार्डवर "through the Censor, okayed." असा शिक्का मारलेला होता.

### मनाला चटका लावणारी माहिती

**३३३.** विद्याव्यासंगाने ओतप्रोत भरलेल्या आपल्या या यशस्वी व्यावसायिक जीवनामध्ये संघटनेच्या नेतृत्त्वाचे हे जोखमीचे व कटकटीचे काम आपण कशासाठी स्वीकारले? असा नापसंतीचा शब्द त्या १५ महिन्याच्या व त्यानंतरच्या काळात कधीही या उभय नेत्यांच्या तोंडून आम्हाला ऐकायला मिळाला नाही. **या प्रदीर्घ स्थानबद्धतेमुळे आपल्या वैयक्तिक जीवनामध्ये आलेल्या आर्थिक संकटाला तोंड देतांना होणारी यातायात व दगदग यांचा पुसटसा उल्लेख सुद्धा कधी आपल्या**

**रामराव गोपाळराव झनक शिक्षण संस्था, चिवरा द्वारा संचालित**

***रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय, मालेगांव जि. वाशिम***

***"वेतन आयोग संघर्ष" विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

मा. सुरेश नामदेवराव शिंदे, अध्यक्ष — मुरलीधर रावजी पवार, प्राचार्य

प्रा. सुनिल विश्वनाथ देव्हडे, प्रा. नंदकिशोर लक्ष्मण गायकवाड, प्रा. भरत पांडुरंग आव्हाळे, प्रा. डॉ. बाळासाहेब आनंदराव वाघ,
प्रा. डॉ. लता रामचंद्र जावळे, प्रा. योगेश्वर सखाराम निकस

**सहकाऱ्यांच्या कानावर पडू नये म्हणून जी दक्षता ते घेत असत त्याची आठवण झाली म्हणजे आजही मन आदराने भरून येते.** स्थानबद्धतेत असतांना 'सुटका' करून घेण्याच्या कोणत्याही मार्गाचा या उभय नेत्यांनी विचारसुद्धा केला नाही, याची **मनाला चटका लावणारी माहिती** प्रा. सदाशिवन यांच्या लेखातून उपलब्ध होते. ती पुढील शब्दात :-

**"The Government from time to time dangled the carrot in the form of a printed 'Undertaking' which if signed would let them get released.** There was also a possibility of taking 'parole' by making application and giving some reason to satisfy the Home Ministry. Prof. Theckedath had in fact a genuine reason to apply for parole because one of his sons, Devtosh, was to be operated upon. But Prof. Kenny and Prof. Theckedath preferred to remain inside the jail rather than sign humiliating undertaking or seek parole." **(संदर्भ दोन पृष्ठ १०८)**

## २ जानेवारी १९७७ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक

**३३४.** १९७६ च्या नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यामध्ये देशातील संबंध वातावरणच बदलत चालले होते. लवकरच आणीबाणी संपुष्टात येणार हे स्पष्ट दिसू लागले होते. निवडणुका जाहीर केल्या जातील अशी लक्षणे सुद्धा समोर दिसत होती. अशा या वातावरणामध्ये २ **जानेवारी १९७७ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक** झाली व त्यामध्ये दोन महत्त्वपूर्ण ठराव संमत करण्यात आले. त्यातील ठराव क्रमांक एक पुढीलप्रमाणे होता :-

"RESOLUTION NO. 1 : "This meeting of the Executive Committee of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations held on 2nd January 1977 under the Chairmanship of Prof. V.B.Kamath, the Officiating President, welcome the steps that are being taken by certain sections concerned to normalise the situation prevailing in the country today on the initiative of the Prime Minister. To accelerate this process of normalisation and to create the right atmosphere in the University community, which is so essential for hastening the pace of socio-economic transformation of the society, the MFUCTO suggests the following specific measures for immediate implementation :-

(1) withdrawal of the orders of detention served on teachers and their release without further delay.

(2) Delinking of the new UGC Pay Scales from other Terms and Conditions of service and their implementaion with effect from 1-1-1973.

(3) Reopening of the dialogue with College and University teachers for a meaningful and successful implementation of the New 10+2+3 Pattern of Education." (*P1NB1977*)

*सहपत्र : सात (परिच्छेद ३४० पहा)*

**Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations**

Kimatrai Building, Maharshi Karve Marg, Bombay 400 002

**31st March, 1977**

To,
All Members of the Executive Committee,
MFUCTO
Subject :- Resolution from NUTA.

Dear Friend,

I trust that you have received the invitation for the Meeting of the Executive Committee to be held on 4th April 1977. As you know, this is an important meeting where we shall be reviewing the position regarding our demands and deciding on a course of action. I hope you will make it convenient to attend this meeting.

I have just received a letter from Prof. B. T. Deshmukh, President of the Nagpur University Teachers' Association, which is being reproduced below. You are requested to place this before an emergency meeting of your Executive Committee and come with your views regarding this.

With fraternal greetings,

Yours Sincerely,
sd/- **K. K. Theckedath**
Gen. Secretary, MFUCTO

***** ***** *****

Extract from letter of Prof. B. T. Deshmukh (No.NT/F/3 )
Date : 29-3-1977

Dear Shri Theckedath,

I am enclosing herewith one resolution for consideration of the meeting of the Executive Committee of MFUCTO on 4th April, 1977. If possible please circulate the resolution so that members from different areas may consult their units.

Yours Sincerely,
Sd/- **B. T. Deshmukh**

**Text of Resolution**

"महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्यांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने आकसाची वृत्ती सोडून द्यावी, दडपशाहीचा विचार मनातून काढून टाकावा व त्यांच्या न्याय्य मागण्या ताबडतोब मान्य कराव्यात. अन्यथा दिनांक १५-४-१९७७ पासून महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक विद्यापीठ परीक्षेच्या कामाशी संपूर्णपणे असहकार करतील."

*सहपत्र : आठ (परिच्छेद ३४१ पहा)*

**Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations**

The Executive Committee of the MFUCTO which met in Bombay on 4th April 1977 unanimously adopted the following resolution.

(Sd/- K. K. Theckedath)
General Secretary MFUCTO

***** ***** *****

**TEXT OF THE RESOLUTION:**

Taking into consideration the recent developments in the country, Maharashtra, as well as in the six non-agricultural universities in the state, this meeting of the Executive Committee of the MFUCTO, held on 4th April 1977 in Bombay, has come to a firm conclusion that without a total boycott of all university and related examinations by all College and university teachers, the authorities concerned are not likely to concede our long standing and reasonable demands. Neither the government nor the universities have solved the problems of the teachers so far, especially those created by them during the last two years. They cannot be expected to tackle them to our satisfaction without a proper demonstration of our strength, solidarity and solidity of our organisation.

MFUCTO is prepared to negotiate with the State Government and the universities at any time, and it is our keen desire to come to a fair understanding with these authorities as quickly as possible. The MFUCTO is scheduled to start its negotiations with the Minister of Education Maharashtra, from 11th April 1977 and the Executive Committee will remain in continuous session from 10th to 13th April on which day it will formulate its final plan of action including the fixing of a date from which the total boycott of all examination work will commence.

The teachers in general, and the MFUCTO in particular, have always been conscious of their duties and responsibilities to the student community and society; but it is deeply, regretted that we are forced to adopt this strong measure as a reaction to the continued apathy and callous attitude of the Government of Maharashtra and the universities.

This is a call to all the 12,000 college and university teachers in Maharashtra to get well prepared for this struggle."

*****

### महासंघाच्या अध्यक्ष व सचिव पदाचा पदभार स्वीकारला

**३३५.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष व सचिव या दोघांनाही १ नोव्हेंबर १९७५ रोजी अटक करण्यात आलेली होती व जानेवारी १९७७ मध्ये त्यांची मुक्तता करण्यात आली. अगदी दिवसांच्या भाषेत बोलायचे झाल्यास ४५४ दिवस स्थानबद्धतेमध्ये त्यांना काढावे लागले. डॉ. लिलाधर केणी व प्रा. किशोर ठेकेदत्त यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य असे की, १ नोव्हेंबर १९७५ पासून जवळ जवळ **१५ महिने स्थानबद्धतेत राहिल्यानंतर मुक्तता झाल्यावर जणू काही १५ दिवसाची सुटी संपवून अध्यक्ष व सचिव परत येताहेत असे वाटावे इतक्या सहजपणे २७ जानेवारी १९७७ रोजी पुण्याहून मुंबईला व्ही.टी. च्या प्लॅटफॉर्मवर उतरल्यानंतर पहिले काम त्यांनी काय केले असेल? तर संघटनेच्या कार्यालयात जाऊन कार्यवाहक अध्यक्ष श्री. व्ही.बी.कामथ व कार्यवाहक सचिव श्री. एकनाथ मांजरेकर यांच्याकडून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिव पदाचा पदभार स्वीकारला.**

### कार्यवाहक महासचिवांनी दिलेली माहिती

**३३६.** संघटनेच्या या उभय नेत्यांना झालेली अटक, १५ महिन्यानंतर त्यांची झालेली सुटका व त्यांनी पदभार स्वीकारणे याबाबतची ही तपशीलवार हकिकत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे तत्कालीन कार्यवाहक सचिव श्री. ई.एन. मांजरेकर यांनी प्रसिद्धीला दिलेल्या दिनांक २७ जानेवारी १९७७ रोजी काढलेल्या एका "वृत्तपत्रीय प्रसारणा"मध्ये आलेली आहे. ते पत्रक मी मुद्दाम शब्दशः पुढे जसेच्या तसे देत आहे. :-

"MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANISATION : Kimatrai Building, 79 Maharashi Karve Marg, : Bombay 400 002. : **27th January, 1977** : Dr. L.B. Kenny and Prof. K.K.Theckedath, President and General Secretary of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations and also of the Bombay University Teachers' Union, who were arrested under MISA on 1st November 1975 and detained since then for 15 months in Yeravada Central prison, Pune, **were released yesterday.**

Dr. Kenny and Prof. Theckedath were given a very warm and enthusiastic welcome at V.T. Railway Station this morning by their Co-workers in the Teachers' Movement, relatives and other well-wishers. Among those present to receive them were Prof. V.B. Kamath, the Officiating President of the M.F.U.C.T.O.and B.U.T.U., Prof. A.N. Oza, representing the Bombay University Academic Staff Association, and Dr. S.S.Hoskot, a senior College teacher.

Immediately after their return to Bombay Dr. Kenny and Prof. Theckedath have taken over the reins of the M.F.U.C.T.O. and the B.U.T.U. from the present Officiating President and the Officiating Secretary. Sd/- **E.N.Manjrekar,** Officiating Secretary." (*P05NB1977*)

### महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने धैर्यपूर्वक कार्य सुरू ठेवले

**३३७.** सन १९७५ ते १९७७ या अत्यंत कटकटीच्या काळामध्ये अनेक संघटनांनी आपली कार्ये आणि कार्यालये बंद ठेवलेली असतांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने मात्र धैर्यपूर्वक आपले कार्य सुरुच ठेवल्याबाबतचा यथोचित उल्लेख प्रा. सी. आर. सदाशिवन यांच्या लेखामध्ये आलेला आहे, तो पुढील शब्दात :-

**"Sacrifices By Leaders Unparalleled :** The contributions of our veteran leaders Prof. L. B. Kenny, Prof. K. K. Theckedath, Prof. E. N. Manjrekar, Prof. B.T. Deshmukh, Prof. Sambhaji Jadhav, the late Prof, Hemant Wagh, the late Prof. C. R. Patil, the late Prof. Ms. Cynthia Deshmukh and such others kept the teachers' organizations alive and our movements going at the most critical time in the history of our nation during 1975 and 1977 when emergency was in vogue. **It is significant to note that while many trade unions preferred to keep their offices closed and keep away from fighting for their rights, our organizations continued to function, hold meeting, give call for boycott Examinations and even challenge the Government by moving the High Court."**

### ७ मार्च १९७७ ला सामुहिक अर्ज सादर केला

**३३८.** फेब्रुवारी १९७७ या महिन्यात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या निर्णयानुसार राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांकडे एक सामुहिक अर्ज (Mass Petition) सादर करण्याची तयारी जोरात सुरू झाली होती. या अर्जाचा मसुदा महासंघाने तयार केलेला होता. या मसुद्यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांची अंमलबजावणी, वेतनव्यवस्था व याशिवाय इतर प्रश्नांची तपशीलवार मांडणी करण्यात आली होती. सर्व विद्यापीठ स्तरावरील संघटनांच्या तयारीचे स्वरूप कसे होते हे लक्षात यावे म्हणून 'नुटा'तर्फे शिक्षकांना देण्यात आलेली सूचना नमूना म्हणून मी नमूद करीत आहे. ती पुढीलप्रमाणे :-

"MASS DEPUTATION AND PETITION TO CHIEF MINISTER : A Petiton highlighting some special problems in Maharashtra will be submitted to the Chief Minister of Maharashtra, Bombay on 7.3.77. Full text of the printed petition is reproduced on pages 9, 10, 11 of G.B. 77. In case the printed copy is not received in any college, a typed petition can be used. A printed copy of the petition has already been despatched to one teacher in every college, by the Secretary, NUTA. All the teachers in that college are requested to sign the petiton and send it directly to "K.K.Theckdath, General Secretary, MFUCTO, 79, Kimatrai Buliding, Maharshi Karve Marg, Bombay 400 002" on or before 5.3.77"

दिनांक ७ मार्च १९७७ रोजी एक हजारावर प्राध्यापकांनी मुंबई येथे मोर्चाने जावून महाराष्ट्रातील पाच हजार तिनशे प्राध्यापकांच्या सह्यानिशी या निवेदनाच्या प्रति मंत्रालयात सादर केल्यात.

### 'नुटा'ची अभियाचित सभा

**३३९.** सन १९७७ च्या सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये तीव्र अस्वस्थता होती. त्याची लहान मोठी अनेक कारणे असली तरी मुख्य दोन कारणे होती. एक म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याच्या प्रश्नावर शासनाने पूर्णपणे पलटी मारलेली होती व दुसरे म्हणजे अनियमित वेतनाच्या समस्येने महाराष्ट्रातील उच्च शिक्षणक्षेत्र पूर्णपणे ग्रासून टाकलेले होते. ही अस्वस्थता इतकी होती की, 'नुटा'च्या अध्यक्षांनी घटनेतील खंड VI (a) (i) चा वापर करून संघटनेची अभियाचित सभा बोलवावी अशी मागणी फार मोठ्या संख्येने सदस्यांनी लेखी निवेदनाद्वारे अध्यक्षांकडे केली होती. अध्यक्षांनी ती विनंती मान्य करून बोलाविलेली अभियाचित सभा दिनांक ४ मार्च १९७७ रोजी भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे पार पडली. (*P12NB1977*) 'नुटा'ची स्थापना (१९७३) झाल्यापासून तर आजपर्यंत 'नुटा'च्या घटनेतील तरतुदींचा वापर करून अभियाचित सभा (Requisitioned Meeting) बोलाविण्यात आल्याचे हे एक व एकमेव उदाहरण होय. या सभेत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

### महासंघाच्या बैठकीसाठी ठराव

**३४०.** सदरहू अभियाचित सभेत घेण्यात आलेले निर्णय लक्षात घेऊन 'नुटा'चे अध्यक्ष प्रा. बी. टी. देशमुख यांनी एक ठराव दिनांक २९ मार्च १९७७

स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्था, अमरावती संचालित 'नॅक'द्वारा 'ब' दर्जा मानांकित
स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ, ता.जि. अमरावती
अभ्यासक्रम : बी.ए., डिप्लोमा इन फॅशन डिझायनींग, कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लीश
वैशिष्ट्ये : सुसज्ज इमारत, अनुभवी प्राध्यापक वर्ग, ग्रंथालय, संगणक विभाग, अद्ययावत व्यायाम शाळा, पर्यावरणपूरक परिसर
''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा
श्री. सोमेश्वर पुसदकर, अध्यक्ष डॉ. विजय दरणे, प्राचार्य

च्या पत्रान्वये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या महासचिवांकडे पाठविला. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे महासचिव प्रा. किशोर ठेकेदत्त यांनी ३१ मार्च १९७७ च्या पत्रान्वये तो ठराव महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांकडे प्रसृत केला. दिनांक ४ एप्रिल १९७७ रोजी होणाऱ्या महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये हा ठराव विचारात घेण्यात येईल असेही त्यांनी ३१ मार्च १९७७ च्या त्यांच्या पत्रात नमूद केले होते. या सर्व घटनाक्रमाची माहिती नमूद असलेले ३१ मार्च १९७७ चे ते पत्र मी **सहपत्र : सात** म्हणून प्रसृत करीत आहे. (*P24NB1977*)

## दिनांक ४ एप्रिल १९७७ च्या बैठकीतील मंजूर ठराव

**३४१.** दिनांक ४ एप्रिल १९७७ रोजी झालेल्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये उच्च शिक्षणक्षेत्रासमोर असलेल्या या समस्यांचा सविस्तर ऊहापोह झाला. त्यानंतर एक तपशीलवार ठराव संमत करण्यात आला. या ठरावामध्ये गेल्या दोन वर्षांपासून पडून असलेल्या व निर्माण करण्यात आलेल्या समस्यांबाबत शासनातर्फे कोणतीही उपाययोजना केली जात नाही याबाबत संपूर्ण असमाधान व्यक्त करण्यात आले होते व आंदोलनाशिवाय यातून काहीही मार्ग निघणार नसल्याने महाराष्ट्रातील १२ हजार विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी संघर्षासाठी तयार रहावे असे नमूद करण्यात आले होते. हा संपूर्ण ठराव मी **सहपत्र : आठ** म्हणून सोबत प्रसृत करीत आहे. (*P25NB1977*)

## महासंघाने आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला

**३४२.** सन १९७७ च्या एप्रिल महिन्यातील सुरुवातीच्या पंधरा दिवसांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या दृष्टीने अत्यंत अस्थिरतेचे वातावरण होते. १५ एप्रिल १९७७ पासून परीक्षा बहिष्कार आंदोलनाचा निर्णय महासंघाने जाहीर केलेला होता. तत्कालीन शिक्षणमंत्री श्रीमती प्रभाताई राव यांनी १३ एप्रिल १९७५ रोजी चर्चेसाठी बोलाविले होते. सर्वच प्रश्नांवर चर्चा झाली, पण कोणताही निर्णय होत नव्हता. या सर्व बाबी निर्णयासाठी मंत्रिमंडळासमोर न्याव्या लागतील असे त्यांचे म्हणणे होते. याचे आणखी एक मुख्य कारण म्हणजे ज्या सरकारमध्ये त्या मंत्री होत्या ते सरकारच मूळात राहते की जाते? अशा स्थितीत होते. १३ एप्रिलची बैठक संपतांना १५ एप्रिल रोजी पुन्हा बैठक घेऊ असे मा. शिक्षणमंत्र्यांनी सांगितले. मात्र १५ एप्रिल १९७७ च्या बैठकीला त्या स्वतः उपस्थित राहिल्या नाहीत. शिक्षण सचिवांशी चर्चा झाली पण त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही.

## दहा दिवसाने आंदोलन पुढे ढकलले

**३४३.** या अत्यंत अस्थिर वातावरणामध्ये महासंघाने १५ एप्रिल १९७७ पासून सुरू होणारे परीक्षा बहिष्कार आंदोलन १० दिवसांनी पुढे ढकलले व ते २५ एप्रिल १९७७ पासून सुरू होईल असा निर्णय घेतला. महाराष्ट्रातील राजकीय वातावरण झपाट्याने बदलत होते. सत्ताधारी पक्षाच्या अंतर्गत घडामोडीत श्री. शंकरराव चव्हाण यांचे सरकार संपुष्टात येवून त्यांच्या जागी श्री.वसंतदादा पाटील यांची सत्ताधारी विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड झाली व ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार हे निश्चित झाले होते. चर्चगेट जवळील रिट्झ हॉटेलमध्ये त्यांना भेटून महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी मागण्यांचे व परीक्षा बहिष्काराच्या निर्णयाचे निवेदन त्यांना सादर केले. त्याच दिवशी त्यांनी २२ एप्रिल रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघास चर्चेसाठी निमंत्रण दिले. ती चर्चा त्या दिवशी झाली. एका नव्या ऐतिहासिक पर्वाची ही सुरुवात होती.

## नवे मुख्यमंत्री, नवे अर्थमंत्री, नव्या शिक्षणमंत्री

**३४४.** दिनांक २२ एप्रिल १९७७ रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या मंत्रालयातील कार्यालयामध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकी ज्या दालनात होतात त्या दालनामध्ये बरोबर ठरलेल्या वेळी ही बैठक सुरू झाली. त्या दिवशीपर्यंत मंत्रिमंडळाचे खातेवाटप सुद्धा जाहीर झालेले नव्हते. आम्ही महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाचे सर्व सभासद दालनात बसलो असतांना बैठकीच्या ५ मिनिटे अगोदर श्री. यशवंतराव मोहिते व श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे दालनात आगमन झाले. यापैकी अर्थमंत्री कोण? व शिक्षणमंत्री कोण? अशी आमची आपसात कुजबूज सुरू झाली. तेवढ्यात मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे दालनात

*सहपत्र : नऊ (परिच्छेद ३४५ पहा)*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

Kimatrai Building, Karve Road, Bombay 400 002

**24th April, 1977**

The Executive Committee of the MFUCTO met the Chief Minister Shri Vasantrao B. Patil in his Chamber on 22nd April, 1977 and this meeting was continued on 23rd April 1977 when a delegation consisting of Prof.L. B. Kenny, President, Prof. K.K. Theckedath, General Secretary, Prof. V. B.Kamath, Treasurer, Prof. Mrs. N.G.Tarlekar, Vice-President, Prof.N.D.Mehta, Prof. Vasant Pujari, Prof. B.T.Deshmukh, Prof.Sambhaji Jadhav met him. The following were present on 23rd April from the side of the Government : Chief Minister, Finance Minister, Education Minister, Education Secretary and Finance Secretary.

At the end of prolonged negotiations a consensus was arrived at between the MFUCTO and the Government of Maharashtra and a statement was issued signed by Shri D.M.Sukhtankar, Secretary Education Department on behalf of the Goverment and Prof. L.B.Kenny, Prof.V.B.Kamath and Prof.K.K.Theckedath, on behalf of the MFUCTO. The main points on which an agreement has been arrived at are as follows:-

1. **Suitable scheme to ensure prompt and full payment of salaries** of the teaching and non-teaching staff of non government affiliated colleges will be evolved. The scheme will be finalised before the end of June 77.

2. **Regarding implementation of the UGC Scales of pay** it was agreed that all those who possess qualifications prescribed by the University would be eligible for these scales. This means that the condition of M.Phil, Ph.D. for the present incumbents which had been earlier introduced has been dropped. (This implies that those who do not possess the University qualifications would also get the scales but they would have to acquire the qualifications within five years.)

3. As regards **the retrenchment cases of 1975,** it was agreed that these cases are pending because there is no legally constituted machinery to redress the grievances. The Government assured that this lacuna would be removed by a suitable amendment of the University Acts before 30th June, 1977. In each case the legal process would not be dilatory and the cases would be settled within two months.

4. **Demotion to Junior Colleges :** As regards the P-1 category of teachers (viz. those who had completed two years continuous service as on 7.2.75 or those who had been confirmed before 7.2.75) It was noted that the teachers who had been fully absorbed at the Junior College level on the basis of the option given by them to that effect had been put to a disadvantage as compared to other teachers. It was ensured by the Govt. that they would not be put to any disadvantage including the matter of getting the revised UGC scales.

5. Other problems which remain to be trashed out are:- **(a)** Problem of surplus part-time teachers. **(b)** Common cadre of teachers in Junior College and Degree colleges as on 15.7.1976. **(c)** Upgradation of demonstrators (College and University) **(d)** Norms for strength of classes and divisions and **(e)** Code of Conduct. It was agreed that all these issued would be finalised by this Government on or before 30th June, 1977.

6. The matter of the revised scales for Librarians, Directors of Physical Education and Method Masters and teachers in other faculties would also be further discussed with the representatives of the MFUCTO with a view to arriving at an amicable settlement.

7. In view of the assurances contained in this statement the MFUCTO Executive Committee **declares the withdrawal of the boycott of examinations** scheduled to begin on 25th April 1977.

Sd/- L.B. Kenny, President    Sd/- K.K. Theckedath, Secretary

*****

आगमन झाले. श्री. यशवंतराव मोहिते हे आता महाराष्ट्राचे अर्थमंत्री व श्रीमती प्रतिभाताई पाटील या आता महाराष्ट्राच्या शिक्षणमंत्री झालेल्या आहेत हे त्या चर्चेच्या वेळी कळले. प्रत्यक्ष खातेवाटप त्या दिवशी सायंकाळी जाहीर झाले.

### सर्व प्रश्नांवर चर्चा, काही प्रश्नांवर निर्णय

**३४५.** दिनांक २२ एप्रिल रोजी सुरू झालेली ही बैठक दुसऱ्या दिवशी म्हणजे २३ एप्रिलला सुद्धा सुरू राहिली. अनेक प्रश्नांवर चर्चा झाल्या व काही प्रश्नांवर त्याच दिवशी निर्णयसुद्धा झाले. नुसते निर्णय झाले नाही, तर त्याच्या नोंदी करून २३ तारखेला उभयपक्षी मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले. हे मतैक्यपत्र स्वाक्षरीत होण्यापूर्वी अनेक तास ज्या तपशीलवार चर्चा झाल्या **या चर्चेमधील एक प्रसंग सांगण्यासारखा आहे.** ही चर्चा केंव्हा झाली, या चर्चेला कोणकोण उपस्थित होते, याची माहिती देणारा एक परिच्छेद महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष डॉ.लिलाधर केणी व सरकार्यवाह प्रा. किशोर ठेकेदत्त यांनी दिनांक २४ एप्रिल १९७७ रोजी प्रसृत केलेल्या एका प्रसिद्धीपत्रकातून मी पुढे जसाच्या तसा नमूद करीत आहे. :-

"The Executive Committee of the MFUCTO met the Chief Minister Shri. Vasantrao B.Patil in his Chamber on 22nd April, 1977 and this meeting was continued on 23rd April, 1977 when a delegation consisting of Prof. L.B.Kenny, President, Prof. K.K.Theckedath, General Secretary, Prof. V.B.Kamath, Treasurer, Prof. Mrs. N.G.Tarlekar, Vice President, Prof. N.D. Mehta, Prof. Vasant Pujari, Prof. B.T.Deshmukh, Prof. Sambhaji Jadhav met him. The following were present on 23rd April from the side of the Government : Chief Minister, Finance Minister, Education Minister, Education Secretary and Finance Secretary. At the end of prolonged negotiations a consensus was arrived at between the MFUCTO and the Government of Maharashtra and a statement was issued signed by shri D.M. Sukhtankar, Secretary Education Department on behalf of the Government and Prof. L.B.Kenny, Prof. V.B.Kamath and Prof. K.K.Theckedath, on behalf of the MFUCTO."

२४ एप्रिल १९७७ रोजी महासंघाच्या उभय नेत्यांनी जे प्रसिद्धी पत्रक प्रसृत केले, त्यात हे आंदोलन मागे घेण्यात येत असल्याचे नमूद असून त्याशिवाय मतैक्य झालेल्या मुद्याबाबतचा बराच मजकूर त्यात उपलब्ध असल्यामुळे मी ते **सहपत्र : नऊ** म्हणून प्रसृत करीत आहे. (*P35NB1977*)

### शासनाने शब्द पाळला नाही

**३४६.** दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी ही चर्चा सुरु होती. मुख्यमंत्री मा. श्री. वसंतदादा पाटील हे अध्यक्षस्थानी होते. मा.वसंतदादांशी होणारी चर्चा असल्याने ती मुख्यत्वे मराठीतूनच होत होती. आणीबाणीच्या काळात झालेला जाच पक्षांतर्गत राजकारणामध्ये मा. वसंतदादाना सुद्धा बराच सहन करावा लागला होता. जवळ जवळ राजकारणातून संन्यास घेऊन दादा सांगलीला परत गेले होते. **आणीबाणी संपल्यानंतर झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षांतर्गत सत्ताबदल होऊन मा. वसंतदादा मुख्यमंत्री झाले होते, ही यापूर्वी सांगितलेली गोष्ट येथे लक्षात ठेवण्यासारखी आहे.** चर्चा सुरु असतांना शैक्षणिक पात्रतेच्या मुद्यावरील विचार संघटनेच्या वतीने मी मांडत होतो. मी सुरुवात केली. "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे सेवेत असलेल्या लोकांना एम्.फील ची अट लागू नाही. नवीन पात्रतेच्या अटी सेवेत असलेल्या लोकांना लागू नाहीत. तसे कबूल करण्यात आले होते. **शिक्षण मंत्र्यांनी ४ एप्रिल १९७५ ला विधानसभेत केलेल्या निवेदनामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेप्रमाणेच महाराष्ट्रात अंमलबजावणी होईल असे स्पष्टपणे नमूद आहे. मात्र नंतर शासनाने आपला विचार बदलला. शब्द पाळला नाही. आणीबाणी लागू झाली याचा गैरफायदा घेतला व ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयामध्ये आगावूच्या अटी टाकल्या**"

### शासनाने शब्द पाळला नाही तेव्हा तुम्ही काय करीत होता?

**३४७.** या महासंघाने राज्यव्यापी आंदोलनाचा निर्णय पूर्वीच घोषित केलेला आहे. आता आपण मुख्यमंत्री पदाची सूत्रे हाती घेतली आहेत. राज्यासमोरील हा मोठा प्रश्न आहे. तातडीने यांच्याशी चर्चा करून काहीतरी मार्ग आपण काढू. या भावनेने मा. मुख्यमंत्र्यांनी महासंघाला चर्चेची तारीख दिलेली होती. मात्र आणीबाणीतील स्थितीबाबतचा उल्लेख माझ्या प्रतिपादनामध्ये येताच दादा अस्वस्थ झाले. वाक्य संपत नाही तर "**तुम्हाला त्यावेळी आमच्या शासनाने शब्द दिला होता. आणीबाणीत तो मोडला गेला. पाळला नाही असे तुम्ही आता म्हणता; त्यावेळी तुम्ही कां विरोध केला नाही?**" असे सात्त्विक संतापाचे उद्‌गार मा. वसंतदादाच्या तोंडून बाहेर पडले. आम्ही सारेच अवाक् झालो. यावर उत्तर देण्यासाठी जे शब्द वापरण्याची आवश्यकता होती, ते शब्द डॉ. केणी किंवा डॉ.थेकेदत्त यांच्या तोंडून बाहेर पडणे शक्य नव्हते, त्यांचा तो स्वभाव नव्हता. माझ्या कडून मी ताबडतोबच या विचारांचा प्रतिवाद केला तो पुढील शब्दात :-

"**मा. मुख्यमंत्री महोदय! आम्ही जेवढा विरोध करायला पाहिजे होता, तेवढा केला नाही असे आपण म्हणू शकता पण आम्ही त्यावेळी विरोधच केला नाही हे आपले म्हणणे बरोबर नाही**" "नवीन वेतनश्रेणीबाबतचा शासकीय ठराव : एक निवेदन" या स्वलिखित पुस्तिकेची एक प्रत त्यांच्यासमोर टाकत, मी म्हणालो. "**दादर- माटूंग्यातील एका महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या सभेमध्ये ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासन निर्णयाला विरोध करणारी भाषणे केल्यानंतर तुम्ही आमच्या अध्यक्ष व सचिवांना अटक करून १५ महिनेपर्यंत स्थानबद्धतेत ठेवले असे असतांना, आम्ही त्यावेळी विरोध केला नाही हे आपण कसे काय म्हणू शकता?**"

### त्यावेळी कोण होते तुमचे अध्यक्ष व सचिव?

**३४८.** मा. वसंतदादांना या घटनांची खरोखरच माहिती नव्हती. "**१५ महिनेपर्यंत तुमच्या अध्यक्ष व सचिवांना स्थानबद्धतेत ठेवले? त्यावेळी कोण होते तुमचे अध्यक्ष व सचिव?**" अशी मोठ्या उत्सुकतेने दादांनी विचारणा केली. आमच्या सर्वांच्या नजरा त्या चर्चेत सहभागी असलेल्या व आमचे नेतृत्व करीत असलेल्या डॉ. केणी व श्री. ठेकेदत्त यांच्याकडे वळल्या. अत्यंत निर्विकार चेहऱ्याने डॉ. केणी यांनी दादांना नमस्कार केला. तसाच नमस्कार करून किशोर ठेकेदत्त यांनी आपली ओळख करून दिली. मुख्यमंत्री असलेल्या वसंतदादा सारख्या ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकाच्या मनावर या घटनांचा व कथनाचा परिणाम झाल्याशिवाय राहीला नाही. आणीबाणीत सुद्धा या मंडळीनी सारे बरेवाईट परिणाम भोगण्याची तयारी ठेवून या तरतुदींना विरोध केला होता. हे ऐकल्यावर दादांच्या चेहऱ्यावरील भाव भराभर बदलले ही गोष्ट मला आजही डोळ्यासमोर स्पष्टपणे दिसते.

### तुमचे म्हणणे मान्य करायला आम्हाला काही अडचण नाही

**३४९. पुढच्या चर्चेचा एकंदर नुरच बदलला.** "तुम्ही एम्.फील बद्दल, पात्रतेच्या अटीबद्दल काय म्हणालात? पुन्हा सांगा" असे मुख्यमंत्री म्हणाले. मी पुन्हा एकदा तेच विचार मांडले. त्यावर दादांनी त्यांच्या स्वभावाला शोभेल अशा ठामपणे पुढील उद्‌गार काढले. "**तुमचे म्हणणे मान्य करायला आम्हाला काही अडचण नाही.**" ही सारी चर्चा मराठीतून झाली असली तरी यावर झालेले २३ एप्रिल १९७७ चे हे मतैक्यपत्र मा. शिक्षण सचिव श्री. द.म. सुखटणकर यांनी इंग्रजीत नोंदविलेले आहे. उभय पक्षी स्वाक्षरीत झालेल्या या मतैक्यपत्राच्या परिच्छेद १ (i) मध्ये ही बाब पुढील शब्दात नोंदविण्यात आली आहे:-

"(i) As regards **educational qualifications,** the main argument of the federation was that in the statement made by the Minister for Education on the floor of the Assembly on 4th April, 1975, the Government had categorically given a commitment to the effect that the U.G.C. scales will be implemented as they are, in respect of those already in service who had the qualifications laid down by the respective Universities. The government should stick to this

जीवन विकास शिक्षण संस्था, रिसोड द्वारा संचालित

**स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड जि. वाशिम**

*'नॅक' बंगलोर द्वारा 'ब' मानांकन प्राप्त*

**नुटा संघटनेने प्रकाशित केलेल्या ''वेतन आयोग संघर्ष'' विशेषांकास हार्दिक शुभेच्छा**

श्री.बाबाराव पाटील, अध्यक्ष | श्री. अमित पाटील, सचिव | डॉ. जे.बी.देव्हडे, प्राचार्य

commitment given on the floor of the House.

**The Chief Minister said that he did not see any difficulty in accepting this"**

दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी उभयपक्षी स्वाक्षरीत झालेले मतैक्यपत्र सोबत **सहपत्र : दहा** म्हणून प्रसृत केलेले आहे.

### असे उदाहरण संघटनात्मक पातळीवर भारतात क्वचितच सापडेल

**३५०.** मला येथे हे नमूद केले पाहिजे की, डॉ. लिलाधर केणी व प्रा. किशोर ठेकेदत्त या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या आमच्या नेत्यांच्या धिरोदात्त वर्तनाने महासंघाची केवळ प्रतिष्ठाच वाढली असे नव्हे, तर महासंघाच्या स्थापनेनंतरच्या २-४ वर्षात संघटनात्मक कामकाजाचा मोठाच मजबूत पाया घातला गेला. **मा. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या या व यानंतरच्या चर्चेमध्ये एकामागून एक मुद्दे सुटत गेले. २३ एप्रिल १९७७ ते २३ ऑगस्ट १९७७ या चार महिन्याच्या काळात खुद्द मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठका होऊन ३ मतैक्यपत्रे नोंदविली गेलीत. असे उदाहरण संघटनात्मक पातळीवर भारतात क्वचितच सापडेल.** याचे जेवढे श्रेय संघटनेने उभ्या केलेल्या आंदोलनाच्या शक्तीला आहे तेवढेच, श्रेय आमच्या उभय नेत्यांच्या धिरोदात्त नेतृत्वगुणांना आहे हे कुणालाही नाकारता येणार नाही. नवीन वेतनश्रेणी, पात्रतेच्या अटी, कार्यभार, व्हेकेशन, परीक्षेचे पारिश्रमिक, वेतनाची व्यवस्था, थकलेल्या वेतनाचा प्रश्न, सेवामुक्त झालेल्या शिक्षकांचे प्रश्न, अतिरिक्त शिक्षकांचे प्रश्न, या व यासारख्या कितीतरी प्रश्नांवर अनुकूल निर्णय या मतैक्यपत्रामध्ये नोंदविण्यात आल्याचे आपल्याला आढळून येईल.

### पहिल्या मतैक्यपत्रातील महत्त्वाच्या बाबी

**३५१.** दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी एका बाजूला महाराष्ट्र राज्य शासन व दुसऱ्या बाजूला महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ यांच्यामध्ये हे पहिले मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले. जवळ जवळ दोन दिवसातील अनेक तासांच्या चर्चेनंतर हे मतैक्यपत्र नोंदविण्यात आले होते. मतैक्यपत्रावर संघटनेच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष डॉ. एल. बी. केणी व संघटनेचे सरकार्यवाह प्रा. किशोर ठेकेदत्त तसेच प्रा. व्ही. बी. कामथ संघटनेचे कोषाध्यक्ष या तिघांच्या सह्या असून राज्यशासनाच्या वतीने शिक्षण सचिव श्री. द. म. सुकथनकर यांनी स्वाक्षरी केलेली आहे. या सर्व चर्चेच्या वेळी राज्याचे मा. मुख्यमंत्री, वित्तमंत्री, शिक्षणमंत्री, वित्त सचिव व शिक्षण सचिव या चर्चेला पूर्णवेळ उपस्थित होते ही अतिशय महत्त्वाची गोष्ट समजली पाहिजे. हे मतैक्यपत्र सोबत **सहपत्र : दहा** म्हणून प्रसृत केलेले आहे. या पहिल्या मतैक्यपत्रामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन वेतनश्रेण्यांची महाराष्ट्रामध्ये अंमलबजावणी करणे हा पहिला आणि महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला म्हणून सांगता येईल. या प्रश्नाच्या पोटात लहान लहान असे तीन चार उपप्रश्न अंतर्भूत होते. (१) पात्रतेच्या अटी (२) कार्यभाराच्या अटी (३) सुटी कालावधीच्या अटी (४) परीक्षेच्या कामाचा मेहनताना या सर्वच प्रश्नांच्या बाबतीत त्या दोन दिवसात अत्यंत उपयुक्त चर्चा झाली व निर्णयसुद्धा नोंदबद्ध करण्यात आले. दुसरा महत्त्वाचा प्रश्न हा थकित पगाराविषयीचा होता व तिसरा महत्त्वाचा प्रश्न सेवेतील शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्यात आले होते व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये विचित्र बदलही करण्यात आले होते. त्यानंतरचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे अनेक शिक्षकांना सेवामुक्त करण्यात आले होते. या प्रश्नाच्या बाबतीत त्या दिवशी काय निर्णय झाले? या विषयीची तपशीलवार माहिती पुढील परिच्छेदातून नमूद करण्यात येत आहे.

### नव्या आकृतीबंधाच्या आगमनाचे विपरित परिणाम

**३५२.** डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या सेकंडरी एज्युकेशन कमिशनने ११+२+२ चा आकृतिबंध टाकून द्यावा व त्याऐवजी १०+१+३ किंवा ११+३ ची व्यवस्था स्वीकारावी, अशी शिफारस केली. त्यावेळच्या मध्यप्रदेश सरकारने हा बदल स्वीकारला व क्रमशः १९५८ मध्ये मुदलीयार पॅटर्न महाविद्यालयामध्ये येऊन थडकला व त्यामुळे विदर्भातील आकृतिबंध १४ वर्षांचा झाला व तसा तो १९७५ पर्यंत टिकलाही. उलट त्यावेळच्या मुंबई सरकारने मुदलीयार पॅटर्न स्वीकारला नाही व त्यामुळे मुंबई,

*सहपत्र : दहा (परिच्छेद ३४९ पहा)*

## CONSENSUS NO.1 : 23.4.1977

### Consensus Reached in the Discussions of the Representatives Of the Maharashtra Federation of University And College Teachers Organisations With the Chief Minister of Maharashtra

**On behalf of Government**
1. Chief Minister in the Chair
2. Minister for Finance
3. Minister for Education
4. Secretary, Finance Department
5. Secretary, Education Department
6. Deputy Secretary, Education Department

**On behalf of M.F.U.C.T.O.**
1. Shri L.B. Keny, President
2. Shri V.B. Kamath
3. Shri K.K. Theckedath and other Executive Committee Members as per list attached.

**1. Implementation of U.G.C. Recommended scales of pay.** In this connection, the discussion mainly centred round the following points :-

i) Educational qualifications
ii) Work load,
iii) Vacation; and
iv) Remuneration for examination work.

i) As regards educational qualifications, the main argument of the Federation was that in the statement made by the Minister for Education on the floor of the Assembly on 4th April, 1975, the Government had categorically given a commitment to the effect that the U.G.C. scales will be implemented as they are, in respect of those already in service who had the qualifications laid down by the respective Universities. The Government should stick to this commitment given on the floor of the House.

**The Chief Minister said that he did not see any difficulty in accepting this.**

**ii) Work Load :-** As regards the work load, the Sen Committee made certain recommendations. The U.G.C. considered the matter thereafter and made its recommendations which have been reproduced in the Government of India letter dated 16.1.1975. It was agreed that within the parameters laid down by these authorities, the actual work load, (including hours of class room instruction, number of hours for which teachers should be present on the premises of the College University and other cognate details) **will be finally decided upon after consultation with the Universities and also after consultation with the representatives of M.F.U.C.T.O.**

**iii) Vacation :** It was noted that the condition regarding vacation which had been introduced in the Government Resolution of 4th October, 1975 had not been recommended by the Government of India. It was a condition laid down by the State Government on its own. In this connection, M.F.U.C.T.O. invited attention to the recommendations made by the Kothari Commission. **It was agreed that in the light of these recommendations, the final decision should be taken by the State Government.**

**iv) Examination Remuneration :** In this regard, the U.G.C. and the Government of India had recommended that no remuneration will be payable in respect of examinations held by the institutions concerned. The State Government had, however, changed this in the Government Resolution of 4th October, 1975 to the effect that no remuneration will be payable for examination work in any University/College within the state. Subsequently, the State Government had relaxed this and agreed that remuneration may be paid for examination work undertaken by a teacher from a University other than the University within whose jurisdiction that teacher was working. The M.F.U.C.T.O. invited attention in this connection to the Sen Committees' recommendations. It was agreed that the final decision in this behalf will be taken by the State Government after further examination of the issue **in the light of the views expressed by the M.F.U.C.T.O.**

**2. Clearance of accumulated arrears regarding pay and allowances** of teaching and non-teaching staff of non-Government affiliated Colleges in the State and enforcement of a scheme or institutionalised arrangement for securing prompt and full payment of the said staff.

The M.F.U.C.T.O. invited attention in this connection to what

पुणे, कोल्हापूर विद्यापीठांतून मूळ १५ वर्षांचा आकृतिबंध १९७५ पावेतो अबाधित राहिला. कोठारी कमिशनचा अहवाल आला आणि १०+२+३ ची अंमलबजावणी सुरू झाली. १९७५ च्या दरम्यान हा आकृतिबंध महाविद्यालयांच्या दारात येऊन ठेपला. अधिक दोनचे वर्ग या नव्या आकृतिबंधानुसार विद्यालयातून राहावे, अशी कोठारी कमिशनने शिफारस केली होती. मात्र इमारत, प्रयोगशाळा, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालये ही एका दिवशी निर्माण होणारी किंवा एका दिवशी मोडून टाकण्यासारखी साधनसामुग्री नाही. **त्यामुळेच अकरावी, बारावीचे वर्ग हे जसे निवडक शाळांमध्ये वरिष्ठ वर्ग म्हणून राहतील तसेच ते महाविद्यालयातून कनिष्ठ वर्ग म्हणून राहतील, हे सुरुवातीपासूनच स्पष्ट दिसत होते.** १४ वर्षांचा आकृतिबंध १५ वर्षांमध्ये रुपांतरित होतांना विदर्भ व मराठवाड्यातील उच्च शिक्षण व्यवस्थेला मोठ्या यातना भोगाव्या लागल्या. १० वा वर्ग उत्तीर्ण झालेले विद्यार्थी नव्या आकृतीबंधातील अधिक दोन मधील ११ व्या वर्गात गेले, तेव्हा महाविद्यालयातील पहिल्या वर्षाचे वर्ग ओस पडले. हे कृत्रिम व तात्पुरते संकट असले तरी त्यामुळे तात्पुरते का होईना पण शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरले. फी चे उत्पन्न मोठ्या प्रमाणात कमी झाल्यामुळे हजारो शिक्षकांचे पगार विलंबाने होण्याच्या प्रकाराने थैमान घातले.

### अतिरिक्त शिक्षकांना संरक्षण

**३५३.** नवीन आकृतिबंधामुळे शेकडो शिक्षक ज्यावेळी अतिरिक्त झाले, त्यावेळेला शासनाने एक शासन निर्णय काढून आणीबाणीच्या काळात त्यांची वर्गवारी पी-१ ते पी-५ अशा पाच वर्गांमध्ये केली होती. पी-१ श्रेणीतील शिक्षक म्हणजे ज्याची सेवा दोन वर्षांपेक्षा जास्त झालेली आहे असा शिक्षक. अशा शिक्षकांना जर त्यांच्या महाविद्यालयामध्ये कार्यभार नाही पण कनिष्ठ महाविद्यालयात कार्यभार उपलब्ध होत असेल तर त्याने वरीष्ठ महाविद्यालयातील सेवा चालू ठेवण्यासाठी राज्यातील कोणत्याही शहरातील दुसऱ्या महाविद्यालयामध्ये जाण्याचा पर्याय निवडावा किंवा त्याला त्याच्याच महाविद्यालयात राहावयाचे असेल तर त्यांनी ज्युनिअर कॉलेजच्या वेतनश्रेणीवर कनिष्ठ महाविद्यालयात काम करावे असा त्यांना पर्याय देण्यात आला होता. संघटनेला ही व्यवस्था अजिबात मान्य नव्हती. त्याबाबत मुख्य प्रतिपादन असे होते की, एकतर हे जे संकट उभे झाले त्यामध्ये त्या शिक्षकांचा काहीही दोष नाही. दुसरे असे की, आकृतीबंधामुळे हे संकट तात्पुरते ओढवलेले असून त्या संकटाचे आयुष्य दोन तीन वर्षापेक्षा जास्त असणार नाही. आपल्या महाविद्यालयात कार्यभार उपलब्ध नाही म्हणून दुसऱ्या महाविद्यालयात किंवा दुसऱ्या शहरातील महाविद्यालयात समायोजित होण्याच्या पर्यायाचा विचार करता येवू शकतो पण त्याच महाविद्यालयाच्या वर्गावर वेतनश्रेणी अवनत करून काम करायला लावणे योग्य नाही. अशी संघटनेची मांडणी होती. एकदा शासननिर्णय काढून तसा पर्याय उपलब्ध करून दिला की अनेक 'कच्चे' लोक असा पर्याय मान्य करण्यास तयार होतात. तसे ते त्यावेळीही झाले. या चर्चेमध्ये शासनाने ही गोष्ट मान्य केली की, अतिरिक्त होण्यात या शिक्षकांचा कोणताही दोष नसल्यामुळे जरी **त्यांनी आणीबाणीच्या काळात कनिष्ठ महाविद्यालयामध्ये राहावयाचा पर्याय भरून दिला असेल तरी त्यांचे "वरीष्ठ महाविद्यालयीन शिक्षक" हे स्थान अबाधित राहील, त्यांच्या वेतनश्रेणीमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. इतकेच नव्हेतर त्यांना नवीन वेतनश्रेणी देण्यापासून सुद्धा वंचित ठेवले जाणार नाही.** ही बाव उभयपक्षी या मतैक्यपत्रात मान्य करण्यात आलेली होती. ती पुढील शब्दात :-

"It was decided that relevant information relating to such PI category teachers who had given option in favour of absorption at the Junior College level in their respective colleges should be collected and it should be ensured that they are not put to any disadvantage including the matter of getting the benefit of revised U.G.C. scales merely on account of their having exercised an option in favour of absorption at the Junior College level in their respective colleges."

### वेतनाच्या थकबाकीचा प्रश्न

**३५४.** विदर्भ व मराठवाड्यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या महाविद्यालयातून

the Minister for Education had said in her statement on the 4th April, 1975 on the floor of the Assembly. The relevant portion of the statement is as follows :-

"Government feels that College Teachers should get their pay in full and on due dates. Government also agree in principle that college teachers should get their salaries by cheques to be issued by the Management. It will be the endeavour of Government to see that the Management actually translate this proposal in practice with a view to ensuring full and timely payment to college teachers".

In her further statement made on 5.4.1975, the Minister for Education had stated as follows :-

"I have categorically promised to ensure that private managements pay the salaries regularly and for full amounts through cheques".

**It was agreed that to fulfil these commitments made by Government, a suitable scheme to ensure prompt and full payment of salaries** of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated colleges will be evolved after consultation with the Managements of Colleges and the M.F.U.C.T.O. The scheme **will be finalised before the end of June, 1977.**

As regards accumulated arrears of pay and allowances, the Chief Minister assured that Government will examine the question of giving further **adhoc assistance** to the colleges so that these arrears could be cleared as early as possible.

**3. Retrenchment cases of 1975.**

It was noted that the main reason why these cases (of 116 retrenched teachers) have remained pending is that there is no legally constituted machinery to redress the grievances of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated Colleges regarding their service conditions. **It was agreed that this lacuna will be removed by a suitable amendment of the University Acts.** The Chief Minister, however, observed that while undertaking this amendment, it ought to be ensured that the legal process does not become lengthy and dilatory and that the cases of disputes are settled promptly and, in any case, within a period of 2 months. The details of the amendment will be speedily worked out.

**4. Cases of teachers rendered** surplus or absorbed in Junior College classes owing to the implementation of the +2 pattern.

The main cases referred to in this connection were those in regard to PI category teachers who had been fully absorbed at the Junior College level on the basis of the option given by them to that effect. It was noted that, as against these teachers, the teachers who had not given any option but had been rendered fully surplus at both the College level and at the Junior College level, had been continued at the college level in their respective colleges.

This had put the PI category teachers who had given an option to be absorbed at the Junior College level (in their respective colleges) to a disadvantage. It was decided that relevant information relating to such PI category teachers who had given option in favour of absorption at the Junior College level in their respective colleges should be collected and **it should be ensured that they are not put to any disadvantage including the matter of getting the benefit of revised U.G.C. scales merely on account of their having exercised an option in favour of absorption at the Junior College level in their respective colleges.**

**5.** It was agreed that the following issues will also be thrashed out :-

a) Problem of surplus part time teachers;
b) Common cadre of teachers in Junior Colleges and Degree Colleges as on 15.7.1976.
c) Upgradation of demonstrators (college and University)
d) Norms for strength of classes and Divisions; and
e) Code of Conduct.

It was agreed that all the issues mentioned in the preceeding five paragraphs will be thrashed out and final **decisions will be taken by Government on or before 30th June, 1977.**

**6.** As regards some of the remaining issues (like the revised scales of pay for Librarians, Directors of Physical Education and Method Masters and certain other categories of College personnel in other faculties, and others) these would be further discussed with the representatives of the M.F.U.C.T.O. in due course, with a view to arriving at an amicable settlement.

Sd./- L.B. Kenny
President, MFUCTO

Sd/-V.B. Kamath
Treasurer, MFUCTO

Sd/- K.K. Theckedath Gen. Secretary, MFUCTO

D.M. Sukthankar 23-4-77
Secretary, E&Y.S.D. Government of Maharashtra

*****

मोठ्या प्रमाणात कमी झाल्यामुळे महाविद्यालयाच्या उत्पन्नावरसुद्धा खूप मोठा परिणाम झालेला होता आणि त्यामुळे अनेक महाविद्यालयात अनेक महिन्यांचे पगार थकत होते. शासनाने आणलेल्या नव्या आकृतीबंधाचा तो परिणाम होता. काही काही ठिकाणी तर वेतन अकरा अकरा महिन्यांच्या विलंबाने होत असे. देशातील अनेक राज्यांमध्ये महाविद्यालयीन शिक्षकांचे पगार कोषागारामार्फत देण्याची व्यवस्था सुरू करण्यात आलेली होती. त्यावेळेच्या उत्तरप्रदेश सरकारने याबाबतीत घेतलेला पुढाकार हा त्यावेळेला सर्वांच्या चर्चेचा विषय होता. खुद्द महाराष्ट्र राज्यामध्ये माध्यमिक शिक्षकांच्या स्तरापर्यंत ही व्यवस्था लागू करण्यात आलेली होती व ती समाधानकारकपणे अंमलात होती. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची अशी मागणी होती की, त्या प्रकारची व्यवस्था ही विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावरसुद्धा लागू करण्यात यावी. आणीबाणी सुरू होण्यापूर्वी त्या वेळेच्या शिक्षणमंत्र्यांनी जरी ही मागणी पूर्णपणे मान्य केलेली नव्हती, तरी याबाबतीत पुढे पाऊल टाकणारे निवेदन त्यांनी दिनांक ४ एप्रिल १९७५ रोजी विधानसभेमध्ये केलेले होते. त्या निवेदनात त्यांनी असे नमूद केले होते की, :- "Government feels that College Teachers should get their pay in full and on due dates. Government also agree in principle that college teachers should get their salaries by cheques to be issued by the Management. It will be the endeavour of Government to see that the Management actually translate this proposal in practice with a view to ensuring full and timely payment to college teachers". त्यानंतर ५ एप्रिल १९७५ रोजी पुन्हा सभागृहात त्यावेळच्या शिक्षणमंत्र्यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केलेले होते :- "I have categorically promised to ensure that private managements pay the salaries regularly and for full amounts through cheques".

### नव्या वेतनव्यवस्थेच्या उदयाची सुरुवात

**३५५.** उपरोक्त जी आश्वासने एप्रिल १९७५ मध्ये त्यावेळच्या शासनातर्फे देण्यात आलेली होती त्याबाबतीत या चर्चेमध्ये असे ठरले की, "**वेतन नीटपणे**

*सहपत्र : अकरा (परिच्छेद ३५८ पहा)*

## CONSENSUS NO.2 : SIGNED ON 15.7.1977

**Consensus reached in the discussions of the representatives of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations with the Chief Minister of Maharashtra on 4th June 1977, and subsequent meeting held on 8th July 1977.**

Following were present on 4th June, 1977;

**ON BEHALF OF GOVERNMENT**

1. Chief Minister in the Chair,
2. Minister for Education
3. Minister of State for Education
4. Secretary, Education & Youth Services Department
5. Director of Higher Education and Youth Services Department.
6. Deputy Secretaries, Education and Youth Services Department.

**VICE - CHANCELLORS**

1. Shri D.Y. Gohokar, Vice Chancellor, Nagpur University
2. Shri D.A.Dabholkar, Vice Chancellor, Poone University
3. Shri P.G.Patil, Vice Chancellor, Shivaji University
4. Smt. Madhuriben Shah, Vice Chancellor, S.N.D.T. University
5. Shri Ram Joshi, Vice Chancellor, Bombay University

**ON BEHALF OF M.F.U.C.T.O.**

1. Shri L.B. Kenny, President
2. Smt. Nalini Tarlekar, Vice-President
3. Shri K.K. Theekerdath, Secretary

& Other Executive Committee Members and Shri. V.B. Kamath on 8th July, 1977.

2. The discussions mainly centred round the four points and the detailed issues relating thereto mentioned in the note circulated by the Education & Youth Services Department while pending further consideration of some of the aspects relating thereto full consesus could not be reached on the point relating to "Work Load". Consensus was reached on the remaining three points, namely "Size of a Class", "Vacation" and "Remuneration for Examination Work" and the same has been recorded below :-

**(I) SIZE OF A CLASS :-**

The existing stipulation of the different Universities in regard to the maximum strength of students in a class (upto the first degree level) were noted. It was agreed in principle that a class of a large size with more than 100 students was not conducive to attainment of higher academic standards and that the size of a class will have to be progressively reduced to 60 students so as to improve the student-teacher ratio. As a first step towards the attainment of this ideal, it was agreed that the maximum strength of students in a class upto the first degree level of the new three-year degree course in college affiliated to the Bombay, Poona, Shivaji and S.N.D.T. Women's Universities should be 100 students; the University authorities may however, in their discretion authorise the heads of Colleges to exceed this limit of 100 students by 10 (i.e. upto 110 students in a class). In exceptional cases where there are compelling circumstances, the University authorities may permit admission of a few more students (in any case not more than five) in a class even in excess of 110.

**So far as the Marathwada and Nagpur Universities are concerned, it was agreed that the status quo should be maintained** (i.e. the maximum size of a class shall be 80 students with powers to the University authorities to allow, in their discretion, admissions of students in excess of this limit).

**(II) VACATION**

It was agreed that the following illustrative calendar for an academic year, including vacation recommended by **the Kothari Commission should be accepted** and the non-Agricultural Universities in the State should be requested to adopt and implement the same from the current academic year 1977-78:

**FIRST WORKING TERM**

Jun. 20 to November 5 ... 139 days

FIRST VACATION

November 6 to December 5 ... 30 days

**SECOND WORKING TERM**

December 6 to April 20 ... 136 days

SECOND VACATION

April 21 to June 19 ... 60 days

As regards the utilisation of vacation it was agreed to leave it to the good sense of the teaching community to accept voluntarily, as they have been so far doing, the work that may be entrusted to them by University/College.

**(III) REMUNERATION FOR EXAMINATION WORK :-**

**It was agreed that University/College teachers would be entitled to examination remuneration** only in respect of external examinations conducted by Universities. For internal assessment/home examinations being conducted by the colleges Universities at present or which may be introduced as a measure of examination reform (including the semester system), no remuneration shall be payable to the University/ College teachers irrespective of the fact whether the marks obtained by a student in such internal assessment/home examinations are decided to be taken into account or not to be taken in account while declaring the final result of the student.

3. It was agreed that the authorities of the Universities should be requested to frame their relevant statutes in the light of the consensus reached as aforesaid.

Sd./- L.B. Kenny 15-7-77 Sd/-V.B. Kamath 15-7-77
President, MFUCTO Treasurer, MFUCTO
Sd/- K.K. Theckedath 15-7-77 Gen. Secretary, MFUCTO
D.M. Sukthankar 15-7-77
Secretary, E&Y.S.D. Government of Maharashtra

*****

**अदा करण्यासाठीच्या एका निश्चित योजनेला जून १९७७ पूर्वी अंतिम स्वरूप देण्यात येईल.**" थकबाकी निपटून काढण्यासाठी तदर्थ सहाय्य करण्याच्या प्रश्नाचा राज्यशासन अभ्यास करेल व लवकरात लवकर याबाबतीत निर्णय घेईल, असेही या मतैक्यपत्रामध्ये नमूद आहे. पुढे हा निर्णय शासनाने लवकर घेतला नाही व ठरल्याप्रमाणे जून १९७७ पूर्वी वेतनाची व्यवस्थासुद्धा अंमलात आली नाही. त्यासाठी पुढे फार मोठा संघर्ष शिक्षक संघटनांना करावा लागला हे खरे असले तरी **विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावर पुढे अस्तित्वात आलेल्या वेतन वितरणाच्या व्यवस्थेचे मूळ हे या पहिल्या मतैक्यपत्रामध्ये आहे ही गोष्ट निर्विवाद होय.**

## न्यायाधिकरणाच्या उदयाची सुरुवात

**३५६.** महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षकांच्या सेवामुक्ती विषयीच्या कोणत्याही कायदेशीर तरतुदी त्या काळामध्ये अस्तित्वात नव्हत्या. सेवामुक्त शिक्षकांनी विद्यापीठाकडे दाद मागावी व विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीने उभयपक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर कार्यकारी मंडळाला अहवाल सादर करावा. कार्यकारी मंडळाने त्याबाबतीत निर्णय घ्यावा अशा प्रकारची तरतूद "कॉलेज कोड" मध्ये होती, ही गोष्ट खरी असली तरी विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयाचे पालन करण्याचे कोणतेही बंधन हे महाविद्यालयांवर नसल्यामुळे वर्षानुवर्षे प्रकरणे विद्यापीठात व त्यानंतर उच्च न्यायालयात पडून रहात असत. उच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर सुद्धा प्रकरण सर्वोच्च न्यायालयातून बाहेर निघण्यास आणखी काही वर्षांचा काळ लागत असे. याबाबतीत न्यायाधिकरणासारखी व्यवस्था अस्तित्वात असावी अशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची मागणी होती. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने शासनाच्या ही गोष्ट लक्षात आणून दिली होती की, महाराष्ट्रातील निरनिराळ्या विद्यापीठांतून जवळ जवळ ११६ शिक्षकांना सेवामुक्त करण्यात आलेले असून सेवामुक्तीच्या या अरिष्टावर दाद मागण्यासाठी कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे या पहिल्या मतैक्यपत्रामध्ये उभयपक्षी ही गोष्ट मान्य करण्यात आली की, "**विद्यापीठाच्या कायद्यामध्ये दुरुस्ती करून अशा प्रकारची यंत्रणा स्थापित करण्यात यावी.**" खुद्द मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, "कायद्यामध्ये बदल करतांना कायदेशीर प्रक्रिया ही किचकट व लांबलचक होऊ नये याची काळजी घ्यावी व कोणत्याही परिस्थितीत दोन महिन्यांच्या आत अशा प्रकरणांचा निकाल लागला पाहिजे." मुख्यमंत्र्यांच्या या मताची कार्यवृत्तामध्ये नोंद करण्यात आली व कायद्यामध्ये बदल करण्याची प्रक्रिया तातडीने पार पाडण्यात यावी असेही या मतैक्यपत्रामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. **विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना पुढे जी न्यायाधिकरणाची व्यवस्था उपलब्ध झाली त्याचे मूळ हे या मतैक्यपत्रामध्ये आहे ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे.**

## नवीन वेतनश्रेण्यांबाबतच्या इतर अटींची चर्चा

**३५७.** नवीन वेतन श्रेण्या अंमलात आणण्या संदर्भात पात्रतेच्या अटींबाबत यापूर्वीच तपशीलवार माहिती दिलेली आहे. कार्यभाराच्या अटी, सुटी कालावधीच्या अटी व परीक्षा मेहनताना देण्याबाबतच्या अटी या आणखी तीन अटींद्वारे लादलेली विकृती शासनाच्या लक्षात आणून देण्यात आली. त्याबाबतीत **आपली भूमिका ही केंद्रशासनाच्या योजनेपेक्षा वेगळी असणार नाही असे शासनातर्फे स्पष्ट करण्यात आले.** त्यानंतर ऑक्टोबर १९७५ च्या शासन निर्णयातील अटी दुरुस्त करणारे उभयपक्षी एक संमतीपत्र उच्च न्यायालयात दाखल करावे अशा प्रकारचा विचार त्या चर्चेमध्ये निश्चित करण्यात आला.

## दुसरे मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले

**३५८.** विद्यापीठांशी संबंधित बाबींची चर्चा होतांना, तसेच त्यावर निर्णय होतांना विद्यापीठांचे मा. कुलगुरू त्या बैठकांना उपस्थित असले पाहिजेत अशी स्वाभाविकपणे उभयपक्षी भावना होती. पुढच्या बैठकी ४ जून १९७७, ८ जुलै १९७७ व १५ जुलै १९७७ रोजी झाल्या व दुसरे मतैक्यपत्र दिनांक १५ जुलै १९७७ रोजी स्वाक्षरीत झाले. हे दुसरे मतैक्यपत्र स्वाक्षरीत होण्यापूर्वी जी चर्चा झाली त्यामध्ये मुख्यत्वे विद्यापीठांशी संबंधित असलेल्या चार बाबी समाविष्ट होत्या. **एक म्हणजे** वर्गात विद्यार्थ्यांची संख्या किती असावी? याबाबतच्या अटी, **दुसरे म्हणजे** सुटी काळाबाबतच्या अटी, **तिसरे म्हणजे** परीक्षेच्या मेहनतान्याबाबतच्या अटी आणि **चौथे म्हणजे** कार्यभाराविषयीच्या अटी. या चार पैकी पहिल्या तीन विषयावर निश्चित निर्णय होऊन उभयपक्षी मान्य असलेले सारे निर्णय दुसऱ्या मतैक्यपत्रामध्ये नोंदवद्ध करण्यात आले. हे दुसरे मतैक्यपत्र **सहपत्र : अकरा** म्हणून सोबत दिलेले आहे. या चर्चेच्या वेळी शासनाच्या व महासंघाच्या प्रतिनिधींशिवाय नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. वाय. गोहोकार, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. ए. दाभोळकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राम जोशी हे चार कुलगुरू सुद्धा उपस्थित होते.

## वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या

**३५९.** विदर्भाचा भाग जुन्या मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात आलेला होता. मराठवाड्याचा भाग निजामाच्या हैद्राबाद राज्यातून महाराष्ट्रात आलेला होता. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये वर्गात विद्यार्थ्यांची संख्या किती असावी याबाबतीत एकवाक्यता नव्हती. विशेषतः मुंबई, पुणे आणि कोल्हापूर मध्ये वर्गात १२० च्या वर सुद्धा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची पद्धत नियमानुकूल करून घेण्यात आली होती. याउलट जुन्या मध्यप्रदेशातून आलेल्या नागपूर विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे वर्गात ८० विद्यार्थी असा नियम अस्तित्वात होता. या प्रश्नावर बरीच तपशीलवार चर्चा झाली. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे याबाबतचे म्हणणे असे होते की, विद्यार्थ्यांची संख्या ही केंद्रीय आयोगाने केलेल्या शिफारशी प्रमाणे ६० असावी त्यापेक्षा ती जास्त असू नये. बरीच चर्चा झाल्यावर ही संख्या १०० असावी व त्यामध्ये गरजेनुसार १० टक्के वाढ करण्याचा अधिकार हा विद्यापीठाला असावा अशा प्रकारची व्यवस्था मान्य करण्यात आली. मुंबई, पुणे, शिवाजी व एस.एन.डी.टी. या विद्यापीठांमध्ये अगोदरच १२० च्या वर विद्यार्थी वर्गात बसत असल्यामुळे तिथे याबाबतीत काहीही अडचण नव्हती. इतकेच नव्हे तर या तीनही विद्यापीठातील आमच्या सहकारी नेत्यांना त्या व्यवस्थेमुळे आनंदच झाला होता. विदर्भामध्ये व मराठवाड्यामध्ये यामुळे नवीनच संकट निर्माण होणार होते. देशाच्या पातळीवर विद्यार्थ्यांची वर्गातील संख्या ६० मान्य झालेली असतांना ती १२० वरून १०० वर येणे ही गोष्ट योग्य दिशेने वाटचाल करणारी होती. मात्र ती ८० वरून १०० वर जाणे हे योग्य नव्हते. हा एक विचार होताच पण त्यामुळे काही शिक्षक अतिरिक्त होण्याचे नवे संकट समोर येण्याची शक्यता स्पष्ट दिसू लागली. मराठवाड्यातील प्रतिनिधी भयभीत नजरेने माझ्याकडे पहात होते. मलाही काही सुचत नव्हते. हे एक नवीन संकट येत आहे अशी भावना माझ्या मनामध्ये निर्माण झाली व माझ्या महाविद्यालयीन विद्यार्थी दशेतील भूगोल विभाग व तेथील वर्गखोल्यांचा भूगोल व इतिहास माझ्या नजरेसमोर उभा राहिला.

## शासकीय महाविद्यालयीतल वर्गखोल्यांचा आकार

**३६०.** विदर्भ महाविद्यालयामध्ये मी विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला त्यावेळी त्यावेळच्या मध्यप्रदेश शासनाने बांधलेली भूगोल विभागाची इमारत नुकतीच बांधून तयार झाली होती व तिचे वर्ष दोन वर्षापूर्वी उद्घाटनही झाले होते. आमचे वर्ग त्या भूगोल विभागाच्या इमारतीमध्येच भरत असत. त्या इमारतीत मोठमोठ्या चार वर्गखोल्या होत्या. निदान १५०-२०० तरी विद्यार्थी एका खोलीत बसू शकत असत. आम्ही ६०-७० विद्यार्थी समोर बसल्यावर वर्गखोलीचा मागचा निम्मा भाग रिकामाच राहत असे. हा प्रत्यक्ष अनुभव मी घेतलेला होता. एकूणच महाविद्यालयामध्ये अनेक विषयांना वर्गखोल्यांची अडचण असल्यामुळे या मोठ्या खोल्यांचे मोठेपण फार दिवस टिकले नाही. पुढे गुरुवर्य डॉ. भाऊसाहेब कोलते प्राचार्य म्हणून आल्यावर मध्ये पक्की भिंत बांधून एका खोलीच्या दोन खोल्या करण्यात आल्या. विदर्भ महाविद्यालयाच्या १९२३ ते ३० च्या दरम्यान बांधलेल्या मुख्य इमारतीमध्ये खोल्या मुळात लहानच होत्या. कारण त्यावेळी एवढ्या विद्यार्थी संख्येची कल्पना समोर नव्हतीच.

## विदर्भ व मराठवाड्यासाठी वेगळा निर्णय करावा लागला

**३६१.** विदर्भ महाविद्यालयाचा भूगोल विभाग व त्या विभागातील खोल्यांचा भूगोल व त्यांचा इतिहास माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला व चर्चेमध्ये मी ताडकन उठून उभा राहिलो व माझे प्रतिपादन सुरू केले. "**विद्यार्थी संख्येचा विचार करतांना सर्व विभागांचा सारखा विचार करणे योग्य नाही.** विदर्भ-मराठवाड्यातील वर्गखोल्यांचा आकार ६० विद्यार्थी बसू शकतील अशा बेताचा आहे. ८० पर्यंत विद्यार्थी कसेतरी बसतात. आता आपण १०० चा निकष जर कागदोपत्री मान्य केला तर कोणत्याही वर्गखोलीमध्ये १०० विद्यार्थी सामावून घेण्याची क्षमता नाही. नागपूर महाविद्यालय व विदर्भ महाविद्यालय हे तुमचे शासकीय महाविद्यालय आहे. येथे तुमचे उच्च शिक्षण विभागाचे संचालक


*अमरावती विभागीय शिक्षक संघाकडून*

**नुटा बुलेटीन विशेषांकास हार्दिक शुभेच्छा**

शुभेच्छूक : ॲड. किरणराव सरनाईक, अध्यक्ष, अमरावती विभागीय शिक्षक संघ

बसलेले आहेत. त्यांनी त्या ठिकाणी प्राध्यापक म्हणून काम केलेले आहे. **विचारा त्यांना, १०० विद्यार्थी बसू शकतील अशी एक तरी खोली विदर्भ महाविद्यालयात आहे काय?** एवढ्या मोठ्या विदर्भ महाविद्यालयात भूगोल विभागाच्या नव्या इमारतीत चार मोठ्या खोल्या होत्या. वर्गखोल्यांची अडचण इतकी मोठी होती की, खोलीच्या मधोमध पक्की भिंत बांधून एका खोलीच्या दोन खोल्या केल्या. यालाही आता अनेक वर्षे झालेली आहेत. मी स्वतः ज्या महाविद्यालयाचा विद्यार्थी होतो त्या वऱ्हाडातील पहिल्या शासकीय महाविद्यालयाची स्थिती मी आपणाला सांगितली. मा. मुख्यमंत्री महोदय! आता मी स्वतः शिक्षक म्हणून ज्या महाविद्यालयात काम करतो ते महाविद्यालय शिक्षणमहर्षी डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी सुरू केलेले त्या भागातील पहिले अशासकीय महाविद्यालय आहे. "प्रिन्स ऑफ बेरार होस्टेल"च्या इमारतीमध्ये वर्ग भरतात. होस्टेलसाठी ती खोली मोठी असू शकते. ६० विद्यार्थी बसतात व ८० विद्यार्थी कसेतरी बसू शकतात ही त्या खोलीची महत्तम क्षमता आहे. ती वर्गखोली तशी लहानच आहे. पण आमच्या विद्यार्थ्यांना व आम्हालासुद्धा ती कधी लहान वाटली नाही कारण एका महान विचारापोटी जन्माला आलेली ती व्यवस्था लहान कशी असू शकते? वाडवडिलांनी गोरगरिबांच्या शिक्षणासाठी निर्माण केलेल्या व्यवस्था उध्वस्त होणार नाही याची आपण सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. कृत्रिमरिताने आपण ही गोष्ट केलीच तर शेकडो शिक्षक अतिरिक्त होतील. त्यातून विदर्भ व मराठवाड्यात नवीन प्रश्न निर्माण होतील. निर्माण झालेले जुने प्रश्न सोडविण्यासाठी आपण बसलो आहोत. ते करतांना पुन्हा नवीन प्रश्न निर्माण होतील असे काहीही करता कामा नये. या दोन विभागात वर्गसंख्या जशी आहे तशीच ठेवण्यात यावी." माझ्या या प्रतिपादनाचा खूपच चांगला परिणाम झाला. उच्च शिक्षण संचालक बोलले काही नाही पण त्यांनी संमतीदर्शक मान हलविली. मा. मुख्यमंत्र्यांनी सहजोद्‌गार काढले, ते असे की, "१०० विद्यार्थी वर्गात बसूच शकत नसतील तर असा नियम करण्यात काय अर्थ आहे?" मूळ मतैक्यपत्रामधील या विषयावरच्या मूळ परिच्छेदामध्ये खालील मजकूर जोडावा असे ठरले :-

"**So far as the Marathwada and Nagpur Universities are concerned, it was agreed that the status quo should be maintained** (i.e. the maximum size of a class shall be 80 students with powers to the University authorities to allow, in their discretion, admissions of students in excess of this limit)."

### चुकीची गोष्ट सांगून त्याचा काहीही उपयोग होत नसतो

**३६२.** आमची चर्चा संपल्यानंतर जेव्हा आम्ही बाहेर आलो तेव्हा एकमताने १०० हा संख्येचा नियम मान्य झाल्यावर ज्या तर्कशुद्ध पद्धतीने युक्तिवाद करून विदर्भ-मराठवाड्यासाठी ८० चा नियम मी पदरात पाडून घेतला, त्याबद्दल माझ्या सहकाऱ्यांनी माझे अभिनंदन केले. मात्र एक दोघांनी मला गमतीने अशी विचारणा केली की, "अहो बी. टी.! विदर्भ महाविद्यालयाच्या भूगोल विभागाचा जो भूगोल व इतिहास तुम्ही सांगितला तशी परिस्थिती खरोखरीच तेथे आहे का हो!" मी त्यांना सांगितले "अशा चर्चेमध्ये कोणतीही चुकीची गोष्ट सांगून त्याचा काहीही उपयोग होत नसतो. ते संचालक तेथे बसले होते ना! त्यांनी स्वतः शासकीय महाविद्यालयाच्या व्हरांड्यात वर्ग घेतले आहेत. माझ्या प्रत्येक वाक्यावर मनातल्या मनात ते 'वा रे पठ्ठे!' म्हणत आहेत व मानेने टाळी वाजवत आहेत, असे मला त्यावेळी वाटत होते." माझ्या या निवेदनाने माझ्या सहकाऱ्याचे समाधान झाले असावे असे मला निदान त्यावेळी वाटले.

### 'व्हरांडा महाविद्यालय'

**३६३.** थोडी कथेमध्ये आडकथा होत आहे. ती सांगण्याचा मोह आवरत नाही. गुरुवर्य प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांनी १९९४ मध्ये लिहिलेल्या "अजुनि चालतोची वाट" या आपल्या आत्मचरित्रामध्ये विदर्भ महाविद्यालयाच्या भूगोल विभागातील वर्गखोल्यांच्या भूगोलाचे मोठे यथार्थ वर्णन केलेले आहे. १९६४ मध्ये अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालय या शासकीय महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणून रुजू झाल्यानंतर सुरुवातीच्याच काही दिवसातील प्रसंग त्यांनी नमूद केला आहे. तो त्यांच्याच शब्दात :- "साडेदहा वाजता महाविद्यालय सुरू होण्याच्या वेळेवर माझ्या कार्यालयात आलो आणि लागलीच महाविद्यालयाच्या व्हरांड्यात चक्कर मारून मी जिना चढून वर गेलो. वर जाण्याचा हा जिना अतिशय सुंदर आहे. प्रथम दोन्ही बाजूंना दोन जिन्यांच्या पायऱ्या असून मग दोहोंचा मिळून एकच मोठा रुंद जिना आहे. मी तो चढून वर जातो तोच मला काय दिसले? समोरच व्हरांड्यात इंग्रजीचा स्वाध्याय-वर्ग चालू होता, मागच्या बाजूला सभागृहाच्या सज्जात (बाल्कनी मध्ये) ही इंग्रजीचा स्वाध्याय-वर्ग चालू होता. व्हरांड्यात इतर कोपऱ्यातही असे वर्ग सुरू होते. वर्ग घेण्यासाठी पुरेशा खोल्या नसल्यामुळेच असे करावे लागत होते. यामुळेच की काय, व्ही.एम.व्ही. (V.M.V.) म्हणजे 'विदर्भ महाविद्यालय' नसून 'व्हरांडा महाविद्यालय' होय, असा विनोद गावात सर्वत्र प्रचलित होता, हेही लक्ष्यात आले." **(पृष्ठ ५२९)** पुढे याच आत्मचरित्राच्या पृष्ठ ५३१ वर आपल्याला पुढील मजकूर आढळून येतो :- "महाविद्यालयाच्या परिसरात भूगोल-भवनाची इमारत होती. तिच्यातील खोल्या खूप मोठ्या होत्या. त्यात भरणारे वर्ग त्या मानाने लहान होते, अर्ध्यापेक्षा अधिक खोली रिकामीच राहत असे. ते लक्ष्यात घेऊन, संबंधित अधिकाऱ्यांच्या संमतीने मी त्यातील चार मोठ्या खोल्यांचे विभाजन करून घेतले. त्यामुळे आणखी चार खोल्या उपलब्ध झाल्या."

### विद्यार्थी संख्येबाबत एकमताचा निर्णय

**३६४.** सर्व विद्यापीठांमध्ये एकसारखे निकष लागू करण्यामध्ये किती अडचणी येतात याचे प्रत्यक्ष दर्शन हे आम्हा शिक्षक संघटनेत काम करणाऱ्या प्रतिनिधींना या निमित्ताने झाले होते. शासनाला सुद्धा ती गोष्ट कळून चुकलेली होती आणि त्यामुळेच एकसारखे नियम करता आले नाहीत. शेवटी वर्गात किती विद्यार्थी असावेत याबाबतचा निर्णय झाला. मतैक्यपत्रातील याबाबतचा भाग पुढीलप्रमाणे :-

"**(I) Size Of A Class :-** The existing stipulation of the different Universities in regard to the maximum strength of students in a class (upto the first degree level) were noted. It was agreed in principle that a class of a large size with more than 100 students was not conducive to attainment of higher academic standards and that the size of a class will have to be progressively reduced to 60 students so as to improve the student-teacher ratio. As a first step towards the attainment of this ideal, it was agreed that the maximum strength of students in a class upto the first degree level of the new three-year degree course in college affiliated to the Bombay, Poona, Shivaji and S.N.D.T. Women's Universities should be 100 students; the University authorities may however, in their discretion authorise the heads of Colleges to exceed this limit of 100 students by 10 (i.e. upto 110 students in a class). In exceptional cases where there are compelling circumstances, the University authorities may permit admission of a few more students (in any case not more than five) in a class even in excess of 110.

So far as the Marathwada and Nagpur Universities are concerned, it was agreed that the status quo should be maintained (i.e. the maximum size of a class shall be 80 students with powers to the University authorities to allow, in their discretion, admissions of students in excess of this limit)."

**३६५.** विद्यापीठे व महाविद्यालये यांना असलेल्या सुट्यांचा कालखंड हा नेहमी चर्चेत राहिलेला विषय होता. वस्तुतः हा प्रश्न मोठ्या प्रमाणात भौगोलिक परिस्थितीशी संबंधित होता. तपशीलाने सांगायचे झाल्यास असे सांगता येईल की, विदर्भात उन्हाळ्याच्या दिवसातील तापमान लक्षात घेता व वर्गखोल्यांची भौतिक स्थिती लक्षात घेता वर्ग भरविणे ही गोष्ट कठिण होऊन बसते. याच्या उलट परिस्थिती जम्मू काश्मिर सारख्या राज्यामध्ये असते. हिवाळ्याच्या दिवसामध्ये वर्ग संचालन ही गोष्ट काश्मिरच्या भागामध्ये जवळ जवळ अशक्य होऊन बसते

**स्व.बाबासाहेब वऱ्हाडे शिक्षण संस्था, संभाजीनगर, अमरावती द्वारा संचालित**

**महात्मा ज्योतिबा फुले वाणिज्य, विज्ञान व विठ्ठलराव राऊत कला महाविद्यालय, भातकुली जि.अमरावती**

*''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा*

शुभेच्छूक : डॉ.आकाश वऱ्हाडे, अध्यक्ष डॉ.के.एस.जमधाडे, प्राचार्य

आणि त्यामुळे महाविद्यालयांना त्याकाळात सुटी दिली जाते. दिवाळीच्या सणाचे महत्त्व लक्षात घेऊन भारताच्या बहुतेक भागात त्यावेळी देण्यात येणारी सुटी ही अपरिहार्यच समजली जाते. शिवाय इंग्रज हे स्वतः राज्यकर्ते असल्यामुळे भारतातील लोकांना जेवढे दिवाळी सणाचे महत्त्व तेवढेच महत्त्व त्यावेळेच्या राज्यकर्त्यांना ख्रिसमसच्या सुट्यांचे होते. त्यामुळे त्या काळात डिसेंबर महिन्यात ख्रिसमसची सुटी सुद्धा किमान एखाद दुसऱ्या आठवड्याची रहात असे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ख्रिसमसची सुटी ही कमी करण्यामध्ये राज्यकर्त्यांना काहीही अडचण नव्हती व शिक्षकांना सुद्धा त्याबाबतीत हरकत घेण्याचे कोणतेही कारण नव्हते. केरळमध्ये हे प्रकरण एवढे सरळ नव्हते. सारांश काय तर याबाबतीत देशभर सर्वत्र भिन्नता असल्याने हा विषय कोठारी कमिशनकडे सोपविण्यात आलेला होता व कोठारी कमिशनने दिलेल्या शिफारशी ह्या देशातील सर्व विद्यापीठांनी मान्य कराव्यात अशा प्रकारची भावना होती. त्याप्रमाणेच या चर्चेमध्ये निर्णय झाला तो पुढीलप्रमाणेः-

"**(II) Vacation :-** It was agreed that the following illustrative calendar for an academic year, including vacation recommended by the Kothari Commission should be accepted and the non-Agricultural Universities in the State should be requested to adopt and implement the same from the current academic year 1977-78:

FIRST WORKING TERM

Jun. 20 to November 5 ... 139 days

FIRST VACATION

November 6 to December 5 ... 30 days

SECOND WORKING TERM

December 6 to April 20 ... 136 days

SECOND VACATION

April 21 to June 19 ... 60 days

As regards the utilisation of vacation it was agreed to leave it to the good sense of the teaching community to accept voluntarily, as they have been so far doing, the work that may be entrusted to them by University/College."

### परीक्षेच्या मेहनताऱ्याचा प्रश्न

**३६६.** विद्यापीठाच्या परीक्षेच्या कामाबद्दलचा द्यावयाचा मेहनताना हा विषय कारण नसतांना आणीबाणीत काढलेल्या ऑक्टोबर १९७५ च्या वेतन सुधारणेबाबतच्या नव्या शासननिर्णयाने चर्चेत आला. खरे म्हणजे केंद्राच्या योजनेमध्ये त्याचा समावेश नसतांना व केंद्राची योजना जशीच्या तशी महाराष्ट्रामध्ये अंमलात आणण्याचे ठरलेले असतांना परीक्षेच्या कामाच्या मेहनतान्याचा प्रश्न हा आणीबाणीच्या काळामध्ये त्यात घुसडून देण्यात आलेला होता. वस्तुतः महाविद्यालयाने संचालित केलेल्या परीक्षेच्या कामाच्या बाबतीत महाविद्यालयीन शिक्षकांनी हे पारिश्रमिक न घेता करणे ही प्रथा अनेक वर्षांपासून सुरू होती व त्यानंतरही आजपर्यंत सुरू राहिली. पण विद्यापीठाच्या परीक्षेच्या कामाचा मोबदला न देण्याची बाब आगंतूकपणे राज्यशासनाने त्यामध्ये उगाळली होती. त्याबाबतीत सुद्धा उभयपक्षी संमतीने पुढीलप्रमाणे निर्णय झाला :-

"**(III) Remuneration For Examination Work :-** It was agreed that University/College teachers would be entitled to examination remuneration only in respect of external examinations conducted by Universities. For internal assessment/home examinations being conducted by the colleges Universities at present or which may be introduced as a measure of examination reform (including the semester system), no remuneration shall be payable to the University/ College teachers irrespective of the fact whether the marks obtained by a student in such internal assessment/home examinations are decided to be taken into account or not to be taken in account while declaring the final result of the student."

### कार्यभाराच्या मुद्यावर मतैक्य

**३६७.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ४ ऑक्टोबर १९७५ रोजीच्या शासननिर्णयाला ज्या निरनिराळ्या मुद्यांवर विरोध केला होता त्यापैकी बहुतेक मुद्यांच्या बाबतीत राज्यशासनाच्या सर्वोच्च स्तरावर चर्चा होवून उभयपक्षी एकमत झालेले होते पण एक महत्त्वाचा मुद्दा अजूनही चर्चेसाठी आलेला नव्हता. थोडासा येवून गेला असला तरी त्यावर पुरेशी चर्चा होवून मतैक्य झालेले नव्हते. तो मुद्दा म्हणजे कार्यभारासंबंधीचा मुद्दा होय. केंद्रशासनाच्या मूळ योजनेमध्ये तसा कोणताही भाग नसतांना केवळ आणीबाणीचा फायदा घेऊन अत्यंत विक्षिप्त अटी कार्यभाराबाबत ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयामध्ये टाकण्यात आल्या होत्या. याबाबत तपशीलवार चर्चा होवून या एकाच मुद्यावर तिसरे मतैक्यपत्र उभयपक्षी दिनांक २२ ऑगस्ट २०१७ रोजी स्वाक्षरीत करण्यात आले. ते **सहपत्र : बारा** म्हणून प्रसृत केलेले आहे.

### उच्च न्यायालयापुढील घडामोडी

**३६८.** आता सर्व मुद्यांवर उभयपक्षी एकमत झाल्यानंतर मा.मुंबई उच्च न्यायालयापुढे झालेल्या व होत असलेल्या घडामोडींची माहिती करून घेऊ. विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिलेल्या वेतनश्रेणीची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि. ४ ऑक्टोबर १९७५ रोजी काढलेल्या शासकीय ठरावातील (No. USG- 1174/104287-II dated 4-1075) काही अटींना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने, मुंबई उच्च न्यायालयामध्ये आव्हानित केले होते. दि. २२-४-७७ पासून तर २२-८-७७ पावेतो महाराष्ट्र शासन व महासंघाचे प्रतिनिधी यांच्यामध्ये वेळोवेळी चर्चा व विचारविनिमय होऊन निरनिराळ्या वादग्रस्त मुद्यांच्या बाबतीत मतैक्य झाले व अशा मतैक्याची तीन प्रपत्रे आतापावेतो तयार झालेली होती.

### ३१ ऑक्टोबर १९७७ च्या आत शासननिर्णय काढू

**३६९.** "समझोता पत्र" (Terms of Settlement) तयार करून न्यायालयामध्ये दाखल करण्यासाठी उभयपक्षांना न्यायालयाने १३-९-७७ ही तारीख दिली होती. त्याप्रमाणे मा. न्यायमूर्ती तुळजापूरकर यांच्या चेम्बरमध्ये १३ सप्टेंबर रोजी दुपारी २-४० वाजता कामाला सुरुवात झाली. यावेळी शासनातर्फे शासनाचे वकील श्री. गुरशाणी, शिक्षण सचिव श्री. डी.एम. सुकथनकर व उपसचिव श्री. टेंबे हे हजर होते. प्राध्यापक महासंघातर्फे संघाचे कायदेपंडित श्री. मदन फडणीस, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष डॉ. केणी, सचिव श्री. ठेकेदत्त, कोषाध्यक्ष श्री कामत, नुटातर्फे अध्यक्ष प्रा. बी.टी. देशमुख, उपाध्यक्ष श्री. शरद कळणावत, सचिव श्री. अरविंद बारहाते, प्रा. डी.एस. जाजुर्ले व बी.एस. देशमुख हे हजर होते. सुनावणी होत असतांना वेतनश्रेणी बाबतचा जी.आर. कोणत्या तारखेच्या आत निघेल व १-१-७३ पासूनचे 'ॲरिअर्स' कोणत्या तारखेच्या आत दिले जातील याबाबत शासनाने निश्चित दिनांक ठरवून द्यावेत, अशी महासंघातर्फे मा.न्यायमूर्तीना विनंती करण्यात आली. त्यावर सुधारित वेतनश्रेणी बाबतचा जी.आर. ३१ ऑक्टोबर १९७७ च्या पूर्वी काढला जाईल असे आश्वासन शिक्षण सचिवांनी न्यायमूर्तीसमोर दिले.

### थकबाकीबाबत आताच सांगणे कठीण

**३७०.** नवीन वेतनश्रेणी प्रमाणे १-१-७३ पासूनचे 'ॲरिअर्स' कोणत्या तारखेपावेतो देता येतील हे एकदम आपल्याला सांगता येणार नाही असे शिक्षण सचिवांनी सांगितले. खात्याशी त्याबाबत सल्लामसलत करावी लागेल असे ते म्हणाले. यावर "ही बाब अगोदरच इतकी रेंगाळली आहे की निश्चित तारीख देता येणे किंवा काही ॲडहॉक पेमेंट करता आल्यास करणे जास्त बरे" असा अभिप्राय मा.न्यायमूर्तीनी व्यक्त केला व सल्लामसलत करून तसे ठरवून २२-९-७७ ला पुन्हा हजर होण्यास सांगितले. १ जानेवारी ७३ पासूनच्या वाढीव पगाराची थकबाकी कितीही असली तरी प्रत्येक शिक्षकाला ७५० रू. ॲडहॉक पेमेन्ट केल्या जाईल असे शिक्षण सचिवांनी सांगितले. दिनांक २२-९-७७ रोजी हा समझोता उच्च न्यायालयात दाखल करण्यात आला व खटला मागे घेण्यात आला. *(P87NB1977)*

**Shri Shivaji Education Society Amravati's**
Shri Shivaji Science College, Amravati
College with Potential for Excellence Accredited by NAAC with 'A' Grade with a CGPA of 3.13
*''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा*
With Best Compliments from : Hon'ble Harshvardhan P.Deshmukh, President, Shri Shivaji Education Society, Amravati
Dr.V.G.Thakare, Principal, Shri Shivaji Science College, Amravati

### समझोतापत्राचे तपशील

**३७१.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ वादी व महाराष्ट्र शासन प्रतिवादी असलेल्या या प्रकरणामध्ये दिनांक २२ सप्टेंबर १९७७ रोजी जे समझोतापत्र मा. उच्च न्यायालयासमोर सादर करण्यात आले त्यामध्ये निरनिराळ्या ५ मुद्यांच्या बाबतीत समझोता झाला असल्याचे नमूद आहे. मुळात शासनाने ४ ऑक्टोबर १९७५ रोजी आणीबाणीच्या स्थितीचा फायदा घेऊन त्या शासननिर्णयामध्ये ज्या ५ विकृत स्वरूपाच्या अटी टाकल्या होत्या. त्या अटी कशा स्वरूपात दुरुस्त करण्यात याव्यात याबाबत झालेला हा समझोता होता. त्या अटींची माहिती पुढील परिच्छेदातून नमूद करण्यात येत आहे.

### "वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक" हे स्थान व वेतनश्रेणी कायम राहील

**३७२. ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद होती** :- "The revised scales are applicable to all categories of teachers mentioned in "1" above, employed by the six Universities in the State and Colleges affiliated to them in the Faculties of (i) Arts, (ii) Science (iii) Commerce, and (iv) Education. The revised scales are sanctioned with retrospective effect from 1st January 1973". समझोता पत्रातील विषय क्रमांक एक (Item No. 1) प्रमाणे **उपरोक्त तरतूद काढून टाकून त्याऐवजी पुढील तरतूद शासननिर्णयामध्ये टाकण्यात यावी असे ठरले** :- "The revised scales are applicable to all categories of teachers mentioned in "1" above, employed by six Universities in the State and Colleges affiliated to them in the Faculties of (i) Arts, (ii) Science, (iii) Commerce and (iv) Education. The revised scales are sanctioned with retrospective effect from 1st January 1973. **The teachers in PI Category who had given option in favour of absorption at the Junior College level in their respective colleges, shall not be put to any disadvantage including in the matter of getting the benefit of the revised U.G.C. scales** mentioned in "1" above." वरिष्ठ महाविद्यालयात काम करणाऱ्या शिक्षकांना तेथे कार्यभार उपलब्ध नसल्याने त्याच महाविद्यालयात असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावरील कार्यभार देण्यात आला होता. तसा पर्याय आणीबाणीच्या काळामध्ये त्यांच्याकडून भरून घेण्यात आला होता. आता या समझोत्यामुळे तात्पुरता कार्यभार जरी कनिष्ठ महाविद्यालयात देण्यात आला असला तरी त्याचे **"वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक" हे स्थान व वेतनश्रेणी कायम राहिल व त्यांना नवीन वेतनश्रेणीसुद्धा लागू असेल असा हा बदल होता.**

### 'तास' आणि 'तासिका'

**३७३. ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद होती** :- "Work Load : Teachers in a University/ College will have a work load of not less than 40 clock hours in a week. Out of these 40 hours, a minimum of 20 clock hours will have to be spent by a teacher on the official premises of the Institution for class-room work like, teaching guidance and tutorials or consultation." समझोता पत्रातील विषय क्रमांक तीन (Item No. 3) प्रमाणे **उपरोक्त तरतूद काढून टाकून त्याऐवजी पुढील तरतूद शासननिर्णयामध्ये टाकण्यात यावी असे ठरले** :-

"WORK-LOAD : (**A**) Teachers in a University/College will have a work load of not less than 40 clock hours in a week. (**B**) Out of these 40 clock hours mentioned in (A) above, (**a**) teacher in an affiliated college should be present on the official premises of the college for about 20 to 24 clock hours in a week (about four clock hours per day on an average)" (**b**) Out of the time that a lecturer in an affiliated college is present on the official premises of the college as mentioned in (a) above, he should devote 15 clock hours per week to class room work, i.e. lectures, tutorials, seminars

*सहपत्र : बारा (परिच्छेद ३६७ पहा)*

## CONSENSUS NO.3 : 22.8.1977

**Consensus reached in the discussions of the representatives of the Maharashtra Federation of University and College Teachers Organisations with the Chief Minister on 4th June 1977 and subsequent discussions held ending with 22nd August 1977.**

Consensus reached in the discussions of the representatives of the Maharashtra Federation of University and College Teachers Organisations with the Chief Minister on 4th June 1977 and subsequent discussions held ending with 22nd August 1977.

This is in continuation of the Consensus reached and signed on 15th July 1977.

**Work-load**

a) It was agreed that a teacher in an affiliated college should be present on the official premises of the college for about 20 to 24 clock hours in a week (about four clock hours per day on an average)

b) It was further agreed that out of the time that a lecturer in an affiliated college is present on the official premises of the college as mentioned in (a) above, he should devote 15 clock hours per week to classroom work, i.e. lectures, tutorials, seminars and science practicals / demonstrations. It was also agreed that the time spent on tutorial and seminar work should be considered as equal to the time spent on lecturing work, for the purpose of computing the work-load of classroom work.

c) The MFUCTO expressed the fear that this stipulation of work-load of 15 clock hours per week might result in rendering teachers surplus at the college level. The Chief Minister assured the MFUCTO that care would be taken to ensure that no teacher is rendered surplus at the college level as a result of this new work-load of 15 clock hours.

d) It was agreed that under the new three year degree course which is being introduced from the current year (1977-78), for the purpose of computing the work-load of a lecturer, the time spent on science practical/demonstrations should be considered as equal to the time spent on lecturing work. In respect of demonstrators, if any, attending to only science practicals/ demonstrations, the existing norms regarding their work-load, fixed by the University concerned, should continue.

e) It was agreed that under the old degree course which is in the process of withering away, for the purposes of computing the work-load of a lecturer, the existing norms laid down by the University concerned should continue and status quo should prevail in respect of the ratio laid down by the University concerned for converting the time spent on science practicals/demonstrations into time spent on lecturing work. Similarly, in respect of demonstrators, if any, attending to only science practicals/ demonstrations, the existing norms regarding their work-load, fixed by the University concerned should continue.

f) It was agreed that out of the 15 clock hours to be devoted by a lecturer to classroom work as mentioned in (b) above purely lecturing work will not exceed 13 clock hours, the remaining time being spent on tutorials, seminars and science practicals/demonstrations. It was also agreed that till such time the old degree course continues, while the time spent on science practicals/ demonstrations under the old degree course will be converted into time spent on lecturing work as per the existing conversion ratio laid down by the University concerned, a lecturer will not be required to devote more than 17 clock hours per week to classroom work, i.e. lectures, tutorials, seminars and science practicals/ demonstrations.

**Sd./- L.B. Kenny** — President, MFUCTO
**Sd/-V.B. Kamath** — Treasurer, MFUCTO

Sd/- **K.K. Theckedath Gen. Secretary, MFUCTO**

**D.M. Sukthankar** 22-8-1977
Secretary, E&Y.S.D. Government of Maharashtra

and science-practicals/demonstrations. The time spent on tutorial and seminars work should be considered as equal to the time spent on lecturing work, for the purpose of computing work load of class room work".

प्रत्येक शिक्षकाचा कार्यभार किती असावा याबाबतच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेची ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयाने पूर्णपणे मोडतोड केलेली होती. केवळ आणीबाणीचा फायदा घेऊन "वर्गामध्ये व्याख्यानांच्या २० तासिका (periods) असाव्यात" या मूळ तरतुदीच्या ऐवजी "वर्गामध्ये व्याख्यानांचे २० तास (hours) असावेत" अशी तरतूद करण्यात आली. ती बदलवून पूर्वस्थिती स्थापीत करण्याचा निर्णय झाला. १५ 'तास' म्हणजे २० 'तासिका' होतात हे त्यामुळे अधिकाऱ्यांच्या लक्षात आले.

### शिक्षकांवर वेठबिगारी लादण्याचा प्रयत्न मागे घ्यावा लागला

**३७४. ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ८ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद होती** :- "Vacation does not mean that a teacher is automatically on holidays or otherwise ceases to work for the University/College, even if required to do so and every teacher shall be expected **to undertake such work,** even when the University/**College is not functioning,** as may be assigned to him by the competent authority relevant to his duties as a teacher, whether of a **curricular, cocurricular, extra-curricular or extra-mural nature,** including applied or **field work** relative to his subject or work of the nature of **social service** inside or outside the area of the University/College;" समझोता पत्रातील विषय क्रमांक चार (Item No. 4) प्रमाणे **उपरोक्त तरतूद काढून टाकून त्याऐवजी पुढील तरतूद शासननिर्णयामध्ये टाकण्यात यावी असे ठरले** :- "The following illustrative calendar for an academic year, including vacation, recommended by the **Kothari Commission should be accepted** and the non-Agricultural Universities in the State should be required to adopt and implement the same from the current academic year 1977-78"

शिक्षकांना वेठबिगारीच्या कामाला जुंपण्याचा हुरुप हा सनदी अधिकाऱ्यांना आज जसा आहे तसा तो पूर्वी पासूनच होता. देशात सर्वत्र आणीबाणी लागू आहे याचा फायदा घेऊन सुट्यांच्या काळात शिक्षकांना पिळून काढण्याच्या तरतुदी ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयात टाकण्यात आल्या होत्या. सुटी आहे म्हणून शिक्षकाने त्याकाळात आपल्यावर कोणतेच काम लादता येणार नाही असे समजू नये. त्याकाळात सुद्धा त्याला गरज पडल्यास शैक्षणिक व बिगर शैक्षणिक कामे करावी लागतील. इतकेच नव्हे तर त्याच्याकडे काही समाजसेवेचे काम (social service) सोपविले तर त्याला तेही करावे लागेल. अशा मुलखावेगळ्या तरतुदी शासननिर्णयात घुसाडण्यात आल्या होत्या. भारतीय संघराज्याच्या मुलुखात अशा तरतुदी कोठेही अस्तित्वात नव्हत्या. कोठारी कमिशनने याबाबत केलेल्या भारदस्त शिफारशी सर्व देशभर लागू होत्या. त्याच महाराष्ट्रात लागू करण्याचा शासननिर्णयात बदल करण्याचे ठरले.

### परीक्षेच्या कामाबद्दलचे मानधन

**३७५. ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद होती** :- "The revised pay scales are including of an element of amount of remuneration for examination work. Consequently, the University/College teachers getting the revised scale will not be entitled to any remuneration for examination work in any university/college within the State." समझोता पत्रातील विषय क्रमांक पाच (Item No. 5) प्रमाणे **उपरोक्त तरतूद काढून टाकून त्याऐवजी पुढील तरतूद शासननिर्णयामध्ये टाकण्यात यावी असे ठरले** :- "University/College teachers should be entitled to examination remuneration only in respect of external examinations conducted by the Universities" भारतामध्ये विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षणाची व्यवस्था सुरू झाली तेव्हापासून परीक्षेच्या कामासाठी मेहनताना म्हणून अल्पसे मानधन देण्याची प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे. परीक्षक म्हणून अशी नेमणूक होणे ही गौरवाची गोष्ट समजली जात असे. विद्यापीठ अनुदान आयोगाने या व्यवस्थेमध्ये कोणताही बदल सूचविला नसतांना, **राज्यातील कोणत्याही विद्यापीठातील परीक्षेचे काम त्या शिक्षकावर लादले जावू शकेल. या अटीवरच त्याला विद्यापीठ अनुदान आयोगाची नवीन वेतनश्रेणी अनुज्ञेय असेल,** अशी एक तरतूद आणीबाणीमध्ये लादली गेली होती ती मागे घेऊन पूर्वस्थिती स्थापीत करण्याचा बदल करण्यात आला.

### सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे अनेक निर्णय

**३७६.** वस्तुतः अधिव्याख्यात्याच्या पदासाठी एम्. फील. ची पात्रता विद्यापीठ अनुदान आयोगाने भावी प्रभावाने ठरवून दिलेली होती. पण ती सेवेत असलेल्या सर्व लोकांना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याचा विस्मयकारक निर्णय आणीबाणीचा फायदा घेऊन १९७५ च्या त्या शासननिर्णयामध्ये समाविष्ट होता. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या व उच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयामध्ये पात्रतेच्या अटी नंतर बदलविता येत नाही ही बाब स्पष्ट झालेली आहे. त्यातील काही निर्णय पुढीलप्रमाणे:-

(1) "The proposition that where applications are called for prescribing a particular date as the last date for filing the applications, the eligibility of the candidates shall have to be judged with reference to that date and that date alone, is a well-established one."

(2) "When the selection process has actually commenced and the last date for inviting applications is over, any subsequent change in the requirements regarding qualifications by the University Grants Commission will not affect the process of selection which has already commenced."

(3) "5. It is well-settled rule of construction that every statute or statutory rule is prospective unless it is expressly or by necessary implication made to have retrospective effect."

(4) "Last date of application as per advertisements is a crucial date in accordance with the law laid down by the Hon'ble Supreme Court."

### पात्रतेच्या अटींमध्ये खोड्या करण्याची अधिकाऱ्यांना लागलेली खोड

**३७७.** कोणत्याही पदासाठीची पात्रता ही ते पद ज्यावेळी भरले जाते त्यावेळी ठरविलेली असते. एकदा पदभरती झाल्यावर ती पात्रता बदलण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. नवीन पात्रता ठरविण्यात आली असेल तर ती भावी प्रभावाने लागू केली जाते. पूर्वलक्षी प्रभावाने ती कधीच लागू केली जात नाही कारण ते निसर्ग नियमाच्या विरुद्ध आहे. आय.ए.एस अधिकारी म्हणून भरती झाल्यानंतर भरती झालेल्या व्यक्तीसाठी काही नवी पात्रता ठरविण्यात आली व ती सेवेतील लोकांना लागू केली असे एकही उदाहरण आढळून येणार नाही. शिक्षकांच्या बाबतीत मात्र वेतन पूनर्रचना आली की **पात्रतेच्या अटींमध्ये खोड्या करण्याची एक खोडच** काही सनदी अधिकाऱ्यांना जडली आहे.

### राजकीय नेते व सनदी अधिकारी

**३७८.** मी काही सनदी अधिकारी असा शब्दप्रयोग वारंवार केला आहे, करीत आहे. राजकीय नेते अशावेळी काय करीत असतात? हे निर्णय होत असतांना ते काय झोपा काढत असतात काय? त्यांच्याबद्दल तुम्ही का बोलत नाही? असा प्रश्न याबाबतीत अनेकदा विचारला जातो त्याचे उत्तर नमूद करणे आवश्यक वाटते. राजकीय नेत्यांजवळ अशा प्रकारच्या प्रश्नांची न्याय्यान्याय्यता व गुंतागुंत समजून घेण्याइतकी बुद्धिमत्ता नसते अशातला भाग नाही. मुळात प्रश्न अशी बुद्धिमत्ता असूनसुद्धा ती कारणी लावण्याइतका वेळ त्यांच्याजवळ मुळीच नसतो. सत्ता मिळविणे, मिळविलेली सत्ता टिकवून ठेवणे, त्यामध्ये जमल्यास

*''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा*

**With Best Wishes**

**C.P. & Berar E. S. College, Tulshibag, Nagpur**

वृद्धी करणे, चूक वा बिनचूक मागण्यांच्या झोळ्या घेऊन भेटीला येणाऱ्या लोकांच्या टोळ्यांचे समाधान करतांना त्यांच्या नाकी नऊ येणे, स्वतःच्या मतदार संघातील लोकांच्या राजी नाराजीचा सामना करणे, यातच "रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग" अशी राजकीय नेत्यांची स्थिती असते. "आपल्या मतदारसंघातील सारे प्रश्न व आपल्या खात्यातील एखाद दुसरा महत्त्वाचा प्रश्न" आपल्या मर्जीप्रमाणे मार्गी लागला की गंगेत घोडे न्हाल्याचा आनंद बहुसंख्य मंत्र्यांना होत असतो.

### मंत्री कसे लक्ष घालतात?

**३७९.** सभागृहात एखाद्या प्रश्नाचे देण्यात आलेले उत्तर इतके चुकीचे व हास्यास्पद असते की सभागृहात 'हजामत' झाल्यावर मंत्र्यांना ते उत्तर चुकीचे आहे हे मान्य करावेच लागते व ते दुरुस्तही करावे लागते. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. मंत्र्यांची स्वाक्षरी झाल्याशिवाय प्रश्नाचे उत्तर विधानमंडळ सचिवालयाकडे येत नाही. मग तुम्ही उत्तरे मान्य करावयाची स्वाक्षरी करतांना त्यामध्ये त्यावेळी दुरुस्त्या का केल्या नाहीत? याबाबतीत अनेक मंत्र्यांनी खाजगीमध्ये जी माहिती दिली ती लक्षात घेतली म्हणजे माझ्या डोळ्यासमोर जे चित्र उभे राहते ते चित्र मी नमूद करू इच्छितो. "सोमवारी दुपारी ५ वाजेपर्यंत विधानमंडळात उत्तरे दाखल झालीच पाहिजेत असे बंधन नियमांनी घालून दिलेले आहे, तसे पिठासीन अधिकाऱ्यांचे आदेश आहेत, मंत्री आपल्या मतदार संघाच्या दौऱ्यावरून सोमवारी सकाळी मुंबईला परत आलेले आहेत. दोन ते तीन दिवस ते मुंबईत नसल्यामुळे लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या निवासस्थानावर येऊन धडकल्या आहेत, त्या झुंडीचा सामना करून उशिरा दुपार पर्यंत मंत्रिमहोदय आपल्या मंत्रालयातील कार्यालयामध्ये पोहचलेले आहेत. तिथेसुद्धा लोकांच्या झुंडी त्यांची वाट पहात आहेत. तशातच दुपारी दोन वाजता उपसचिव त्यांच्या टेबलवर ७० प्रश्नांना दिलेली उत्तरे त्यांच्या मान्यतेसाठी त्यांच्या पुढे ठेवतात व तसे करतांना "आज सायंकाळी ५ वाजेपर्यंत ही उत्तरे पाठविण्याची मुदत आहे" असे त्यांना सांगतात. त्या स्थितीत मंत्रिमहोदय त्या ७० उत्तरांकडे पाहतात. उपसचिवांना विचारतात "तुम्ही हे बरोबर पाहिले आहे ना?" आणि ती सारी उत्तरे संमत होवून विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविली जातात. अशा या उत्तरांवर होणाऱ्या उपप्रश्नांच्या भडिमाराचा पुढे प्रश्नोत्तराच्या दिवशी मंत्र्याला सभागृहात प्रत्यक्ष सामना करावा लागतो. याला काही मंत्री अपवाद असतात. नाही अशातला भाग नाही.

### नियमनाच्या दोन तऱ्हा

**३८०.** याच्याउलट परिस्थिती ही विभागाच्या प्रधान सचिवांची किंवा सचिवांची असते. त्यांना भरपूर वेळ असतो. त्यांच्याकडे कोणतीही गर्दी नसते. विभागासमोर असलेल्या प्रश्नांच्या बाबतीत त्यांचे स्वतःचे काही ग्रह व पूर्वग्रह असतात. त्या ग्रह पूर्वग्रहांसहित केलेल्या अंमलबजावणीपासून त्यांचे कोणतेही नुकसान होणारे नसते. त्यांना कोणत्याही निवडणुकीला उभे रहावयाचे नसते व कोणालाही मते मागावयाची नसते. जमलेच तर एखाद्या प्रश्नाची सोडवणूक करतांना "**अर्थपूर्ण चर्चा**" करण्यासाठी पुढे भरपूर वाव राहील व "**लक्ष्मीदर्शनाच्या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ होईल.**" अशी व्यवस्था उभी करण्यामध्ये खालपासून तर वर पर्यंत बहुतेक अधिकाऱ्यांची एकवाक्यता असते. एखादी गोष्ट नियमाप्रमाणे करीत असतांना नियम असा करावयाचा की कोणालाही मंत्रालयामध्ये येण्याची गरज पडणार नाही, ही नियमांची एक तऱ्हा. असा नियम करण्यामध्ये या अधिकाऱ्यांना रस नसतो. प्रत्येक टप्प्यावर मंत्रालयात लोकांना चकरा माराव्या लागतील अशी व्यवस्था निर्माण करण्यामध्ये या अधिकाऱ्यांना मोठाच आनंद वाटत असतो. ती नियमांची दुसरी तऱ्हा. एखाद्या प्राचार्याला निवृत्त होतांना ६० वर्षावरून ६२ वर्षापर्यंत निवृत्तीचे वय वाढवून देण्याचा नियम करतांना कोणालाही मंत्रालयात येण्याची गरज पडणार नाही असा नियम केला तर मग आम्ही मंत्रालयात कशासाठी बसलो आहोत? असा त्यांचा प्रश्न असतो व तशी त्यांची वृत्ती असते. याला काही अधिकारी निश्चितच अपवाद असतात.

### पात्रतेच्या आगावूच्या अटी काढून टाकल्या

**३८१. ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद होती :- "The qualifications are applicable to both existing teachers and the teachers who may be recruited hereinafter."** समझोता पत्रातील विषय क्रमांक दोन (Item No. 2) प्रमाणे **उपरोक्त तरतूद काढून टाकून त्याऐवजी पुढील तरतूद शासननिर्णयामध्ये टाकण्यात यावी असे ठरले :- "The qualifications mentioned in (a)/(b) above are applicable to lecturers/ teachers who may be recruited hereafter i.e. on or after the date of this revised Government Resolution."** केंद्राच्या योजनेप्रमाणे नवीन भरतीसाठी नवीन पात्रतेच्या अटी लागू राहतील. सेवेत असलेल्या व भरतीच्या त्या त्या वेळी असलेली पात्रता धारण करणाऱ्या सर्व शिक्षकांना नवीन वेतनश्रेणी लागू होईल असे होते. ४ ऑक्टोबरच्या शासननिर्णयाने सर्वांना एम्. फील. ची नवी पात्रता लागू असेल अशी तरतूद करण्यात आली होती. ती काढून टाकून केंद्राच्या योजनेप्रमाणे पात्रतेच्या अटी नमूद करणारा हा बदल होता.

### शेवटी एकदाचा संपला हा अध्याय

**३८२.** वरप्रमाणे मान्य झालेले बदल ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासननिर्णयामध्ये करण्यात येतील असे ठरले. नवीन शासननिर्णय ३१ ऑक्टोबर १९७७ च्या पूर्वी निर्गमित करण्यात येईल असे सचिवांनी मा. उच्च न्यायालयात १३ सप्टेंबर रोजी मान्य केले होते. त्याप्रमाणे समझोतापत्राच्या शेवटच्या परिच्छेदात ते नमूद करण्यात आले. ठरल्याप्रमाणे नवीन शासननिर्णय हा दिनांक २५ ऑक्टोबर १९७७ रोजी निर्गमित झाला व तेथेच हा तिसऱ्या वेतन आयोगाशी समकक्ष विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रात लागू करण्याचा अध्याय संपला.

*****


यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा द्वारा संचालित (नॅक द्वारा पुनर्मूल्यांकन $B^{++}$ श्रेणी)

**यशवंत महाविद्यालय, वर्धा उच्च शिक्षण व संशोधन केंद्राचा दर्जा प्राप्त**

गृहविज्ञानाचे शिक्षण, देई स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण (बी.एस्सी. होमसायंस प्रवेशाची सुवर्णसंधी)

*''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा*

शुभेच्छूक : प्रा.एस.बी.देशमुख, अध्यक्ष डॉ.व्ही.ए.देशमुख, प्राचार्य

**दी समर्थ इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन, अचलपूर सिटी व स्व. छगनलाल मुलजीभाई कढी कला महाविद्यालय, अचलपूर कॅम्प ता.अचलपूर जि.अमरावती-४४४८०५**

*''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा*

शुभेच्छूक : डॉ.मेघा सुनील देशपांडे, अध्यक्ष, दी समर्थ इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन, अचलपूर श्रीपाद कृष्णराव तारे, सचिव

डॉ. काशीनाथ बऱ्हाटे, प्राचार्य, स्व.छगनलाल मुलजीभाई कढी कला महाविद्यालय, अचलपूर कॅम्प

वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्थाद्वारा संचालित,

**श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय वडनेर, ता.हिंगणघाट जि.वर्धा**

**वैशिष्ट्ये :** प्रशस्त परिसर, परिपूर्ण इमारत, प्रशस्त क्रिडांगण, समृद्ध ग्रंथालय, अनुभवी प्राध्यापक आणि विद्यापीठाचे परीक्षा केंद्र

**शिकविण्यात येणारे विषय :** इंग्रजी, मराठी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, गृहअर्थशास्त्र, इंग्रजी साहित्य, मराठी साहित्य

**महात्मा फुले विद्यार्थी कौशल्य विकास अभ्यासक्रम :** (१) कृषी सेवा (२) फोटोग्राफी (३) नळ फिटींग (४) मोटर वाईंडीग व डिफेक्टींग

**"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा**

शुभेच्छूक : सौ.हेमलता गमे, अध्यक्ष प्रा.दिवाकर गमे, सचिव डॉ.उत्तम पारेकर, प्राचार्य

*सहपत्र : सहा (परिच्छेद ३२४ पहा)*

# नवीन वेतन श्रेणी बाबतचा शासकीय ठराव : एक निवेदन

Publication of Nagpur University Teachers Association
नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या वतीने अध्यक्ष प्रा. बी. टी. देशमुख यांनी तयार केलेले हे निवेदन संघाच्या कार्यकारी मंडळाने महाराष्ट्राच्या माननीय शिक्षणमंत्री श्रीमती प्रभाताई राव यांना सादर करण्यासाठी सम्मत केले आहे.
**५/११/१९७५**
प्रकाशक :- प्रा. अरविंद बारहाते, शंकर नगर, नागपूर : मुद्रक :- उ. बा. मराठे, महाराष्ट्र प्रेस, अमरावती

विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी लागू करण्यासाठीचा शासकीय ठराव[१] (क्रमांक USG-1174/104287) हा दिनांक ४ ऑक्टोबर ७५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. शासकीय ठराव हे प्रामुख्याने शासनाने (मंत्रिमंडळाने-राजकीय नेतृत्त्वाने) घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचे तपशील ठरवून देण्यासाठी काढले जातात आणि मुख्यत्वेकरून त्या त्या खात्यातील ज्येष्ठ अधिकारी हे अशा ठरावांचा तपशील ठरविण्याचे काम करीत असतात. महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने या बाबत घेतलेल्या निर्णयांची जी घोषणा महाराष्ट्राच्या माननीय शिक्षणमंत्री सौ. प्रभाताई राव यांनी दिनांक ४ एप्रिल १९७५ या दिवशी महाराष्ट्र विधान सभेत केली. त्यामध्ये सुद्धा **"मंत्रिमंडळानेही ही उद्दिष्टे समोर ठेवून पुढीलप्रमाणे प्रमुख निर्णय घेतले आहेत"** असा स्पष्ट उल्लेख आहे. मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय व शासकीय ठरावाने आखून दिलेले तपशील यात अनेक ठिकाणी ज्या विसंगती आलेल्या आहेत त्या दाखवून देण्याचा पुढे अल्पसा प्रयत्न केलेला आहे.

### *(१) पात्रतेच्या अटी*

"विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी जशाच्या तशा शासनाने स्वीकारल्या आहेत. या वेतनश्रेणी विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा विद्यापीठांनी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना देण्यात येतील व ज्या शिक्षकांना दोन्ही अर्हता नाहीत त्यांना त्या अर्हता प्राप्त करीपर्यंत आजची वेतनश्रेणी लागू राहील व त्यांनी अर्हता ५ वर्षांत प्राप्त करावी" माननीय शिक्षणमंत्र्यांच्या निवेदनातील संबंधित भाग जशाच्या तसा वर उधृत केलेला आहे. आता पात्रतेच्या अटी संबंधी शासकीय ठराव काय म्हणतो ते पाहू. या ठरावातील नियम ६ मधील भाग पुढे जसाच्या तसा देत आहोत.

**"6. Qualifications :-** The qualifications prescribed by the University Grants Commission and accepted by the Government of India have also been accepted by the Government of Maharashtra and are precedent to the teacher's becoming eligible for the revised scales on permanent basis. They are given below :-

**(a) University Lecturers :**

(i) A Doctor's degree or published work of an equally high standard; and

(ii) Consistently good academic record with first or high second class (B+) at Master's degree or equivalent degree of a foreign university.

Having regard to the need for developing inter-disciplinary programmes, the degree in (i) and (ii) above may be in relevant subjects.

**(b) College Teachers :**

(i) A consistently good academic record with first or high second class (B plus) at the Master's degree in a relevant subject or an equivalent degree of a foreign university; and

(ii) An M.Phil. degree or a recognised degree beyond the Master's level or published work indicating the capacity of a candidate for independent research work.

**The qualifications are applicable to both existing and the teachers who may be recruited hereafter.** In the case of existing teachers who do not possess the above prescribed qualifications will have to acquire them within a period of five years failing which they will not be allowed to earn future increments after expiry of the five years period in the revised scales. The period of five years will be reckoned from 4th April, 1975.

In respect of new recruitment to the posts of teachers in Universities Colleges, the Universities/Colleges may recruit a person with lower qualifications only in case a person with the prescribed qualifications is not available or is not considered suitable provided that such person will have to acquire the prescribed qualifications within five years from the date of the appointment."

नियम ६ च्या उपनियम (a) व (b) मध्ये दिलेली पात्रता ही विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिली असून भारत सरकारने ती स्वीकारली आहे असे म्हटले आहे. पण हा उल्लेख बरोबर नाही. हे क्रमशः एक एक उल्लेख पाहिला असता सहज दिसून येते.

(१) भारत सरकारच्या शिक्षणखात्याने दिनांक २ नोव्हेंबर १९७४ रोजी महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण सचिवांना पाठविलेल्या पत्रात (No.-F-1-40/74 U. Govt. of India, Department of Education) "The Revision of pay scales, as suggested and payment of Central assistance will be further subject to the conditions stipulated in Appendix-IV" असे म्हटले असून त्या सोबत १९ अटींचे "Conditions for Introduction of revised pay scales" असा मथळा असलेले चौथे परिशिष्टही जोडलेले आहे. या परिशिष्टामधील पाचवी अट पुढीलप्रमाणे आहे :-

**"For future recruitment to the posts of Lecturer**

**Bharat Education Society, Arvi, Dist. Wardha's**
**Narayanrao Kale Smruti Model College, Karanja (G.), Dist. Wardha**
Affiliated to R.T.M. Nagpur University, Nagpur NAAC Re-Accredited (Grade - B)
**Courses :** B.A., B.Com., B.Sc., M.A. (Economics), M.C.M.
**Speacialition :** New Spacious College Building, Dedicated Teaching Staff, KG to PG Education in One Campus.
**"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा**
Adv. D.N. Kale, President — Dr. S.P.Dhanwate, Principal

**Mahila Vikas Sanstha, Wardha's**
New Arts, Commerce & Science College, Wardha
(Recognized by Govt. of Maharashtra & Affilliated to RTM Nagpur University, Nagpur) Accredited by NAAC
**Courses :** B.A., B.A. (Fashion Designing), M.A., B.Com, B.Com (Computer Application), B.B.A., M.Com, B.C.C.A, B.Sc.,M.Sc. & M.S.W.
**"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा**
Dr.R.G.Bhoyar, President

**in Universities as well as in Colleges, the minimum qualifications shall be as may be prescribed by the University Grants Commission from time to time."**

(२) यानंतर भारत सरकारच्या शिक्षणखात्याच्या संचालकांनी दिनांक २०/२/१९७५ रोजी महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण सचिवांना पाठविलेल्या पत्राच्या (F.1-1/75-U.1) दुसऱ्या परिच्छेदात "The University Grants Commission has now decided that the following qualifications **may be prescribed for recruitment to the posts of Lecturers** in the faculties of Arts and Social Sciences, including Commerce and Science in Universities and Colleges." अशी सुरुवात करून पुढे पात्रतेच्या अटी दिलेल्या आहेत. या अटी या ठिकाणाहून जशाच्या तशा शासकीय ठरावाच्या सहाव्या परिच्छेदात घेतल्या असल्यामुळे त्या या ठिकाणी पुन्हा नमूद करण्याचे टाळीत आहोत. **विद्यापीठ अनुदान आयोगाने व भारत सरकारने नवीन वेतन श्रेणी लागू करतांना या अटी नव्याने प्राध्यापक म्हणून भरती होणाऱ्यांकरीता ठरवून दिल्या आहेत हे यावरून स्पष्ट होते.**

(३) महाराष्ट्र शासनाच्या वतीने या संदर्भात विधान सभेत माननीय शिक्षण मंत्र्यांनी केलेल्या घोषणेचा यासंबंधीचा भाग सुरुवातीलाच दिलेला आहे.

(४) त्यानंतरसुद्धा वारंवार ही गोष्ट स्पष्ट करण्यात आली होती. महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण सचिवांनी नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूंना ताबडतोब पाठविलेल्या पत्रात (No.U.S.G. 1175.U) "I would like to clarify that according to the Government decision the revised UGC pay scales will be applicable to all the University and College teachers who, at present, possess qualifications prescribed by the respective Universities." असे कळविले होते.

(५) नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू श्री. गोहोकार साहेब यांनी दिनांक ७ एप्रिल १९७५ रोजी रात्री 'नुटा'च्या कार्यकारी मंडळाच्या काही सभासदांशी २ तास झालेल्या चर्चेमध्ये ही गोष्ट सांगितली होती. इतकेच नव्हेतर शासनाच्या सूचनेवरून वृत्तपत्रामध्ये तसा कुलगुरू या नात्याने जाहीरपणे खुलासा सुद्धा केलेला होता.

(६) दिनांक १६ मे १९७५ चे महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण सचिवांनी काढलेले जे परिपत्रक (क्रमांक USG1175/ला) आहे त्याच्या तिसऱ्या परिच्छेदात "If, even after the scrutiny as above, it is found that **new recruitment is necessary, then only in such cases, persons satisfying the qualifications prescribed by the University Grants Commission at the recruitment base** (Appendix D) plus additional qualification by way of experience etc. prescribed by the respective Universities for such grades, should be recruited after following the usual "recruitment procedure." If a candidate possessing the prescribed qualifications as above is not available or considered suitable, a person possessing comparatively best qualifications should be appointed on the condition he will have to make up for his deficiencies in his qualifications within five years of his appointment, failing which he will not be able to earn future increments." असे स्पष्टपणे म्हटलेले आहे.

या सर्व उल्लेखावरून वर नमूद केलेल्या पात्रतेच्या अटी पुढे होऊ घातलेल्या नेमणुकींच्या संदर्भात आहेत हे स्पष्ट असतांना एकाएकी शासकीय ठरावामध्ये "These qualifications are applicable to both existing and the teachers who may be recruited hereafter." अशी शब्दयोजना पाहून स्वाभाविकपणेच प्राध्यापकांना सुद्धा धक्का बसला व म्हणूनच पात्रतेच्या या सहाव्या नियमामध्ये नमूद केलेल्या अटी ह्या भावी भरतीसाठीच आहेत अशी दुरुस्ती शासकीय ठरावामध्ये केली जावी अशी विनंती आम्ही पुढील कारणांसाठी करीत आहोत.

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाने या पात्रता भावी भरतीसाठी सांगितल्या असून भारत सरकारनेसुद्धा त्या भावी भरतीसाठीच सांगितलेल्या आहेत.

(२) केंद्रीय विद्यापीठांना नवीन वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली असून तीचा प्रत्यक्ष अंमलही सुरू झालेला आहे. पण विद्यमान प्राध्यापकांवर या अटी लादण्यात आलेल्या नाहीत.

(३) उत्तरप्रदेश, बंगाल, बिहार, पंजाब, राजस्थान, गुजरात आणि त्रिपुरा या इतरही सात राज्यांमध्ये नवीन वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली असून पहिल्या दोन राज्यात तीचा प्रत्यक्ष अंमलही सुरू झालेला आहे. पण पात्रतेच्या अटी कोठेही विद्यमान शिक्षकांवर लादण्यात आलेल्या नाहीत.

(४) महाराष्ट्र शासनाच्या वतीने माननीय शिक्षणमंत्र्यांनी विधान सभेत दिलेल्या आश्वासनांच्या विरोधात जाणारी ही तरतूद आहे.

(५) परिशिष्टात दिलेल्या १९ अटींमध्ये भावी भरतीसाठी जशा पात्रतेच्या अटी सांगितल्या आहेत तसेच "निवड समितीची" सुद्धा रचना दिली आहे. भावी भरतीसाठी सुचविलेल्या निवड समितीची रचना स्वागतार्ह असली तरी "विद्यमान प्राध्यापकांनी या निवड समितीसमोर उभे राहून पुढच्या ५ वर्षात आपली निवड करून घ्यावी" असे सांगणे जितके चुकीचे होईल तितकेच "भावी भरतीसाठी सुचविलेल्या पात्रतेच्या अटी विद्यमान शिक्षकांनी पूर्ण कराव्यात" असे सांगणे सुद्धा चूक होईल.

(६) सुधारित वेतनश्रेणी ही शिक्षकेतर कर्मचारी व इतर शासकीय कर्मचारी यांनाही यापूर्वी अनेकदा देण्यात आली. पण असे करतांना पात्रतेच्या अटी बदलविण्याचा किंवा भारी लादण्याचा प्रयत्न किंवा विचार कधीच झालेला नाही. "सुधारित वेतनश्रेणी ही मूलतः सेवेत असलेल्या लोकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा" अशीच कल्पना आहे.


## अमरावती जिल्हा नुटा युनिट, अमरावती

***''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

अमरावती जिल्हा नुटा कार्यकारिणी

डॉ.महेन्द्र मेटे, अध्यक्ष    प्रा.रणजित काळे, उपाध्यक्ष    डॉ.दिलीप हांडे, सचिव    डॉ.मालधुरे, सहसचिव

सदस्य : डॉ. विक्रांत वानखडे, डॉ. तेलमोरे, डॉ. राय

**श्री. गणेशदास राठी छात्रालय समिती, अमरावती द्वारा संचालित श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती** **Accredited 'A' by NAAC and ISO Certified** **अभ्यासक्रम** : कनिष्ठ महा. कला व वाणिज्य एच.एस.सी. व्होकेशनल, बी.ए., एम.ए. (हिंदी,इतिहास,भूगोल,राज्यशास्त्र), एम.कॉम, बी.बी.ए., बी.सी.ए. डी.टॅक्स, डी.बी.एम. **संशोधन विषय** : वाणिज्य, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, व्यवसाय अर्थशास्त्र, पर्शियन भूगोल **इतर संस्था** : अमरावती येथे (१) श्री गणेशदास राठी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय (२) श्री प्रेमकिशोर सिकची विद्यालय (३) श्री गोपीकिसन राठी आ.प्रा.शाळा (४) जी.आर.सि.एस. इंग्लिश स्कूल (५) श्री बद्रीनाथ सारडा बालक मंदीर (६) श्रीमती आनंदीबाई अग्रवाल बालक मंदीर (७) श्री देवरावदादा हायस्कूल, तिवसा (८) श्री तनसुखदास राठी विद्यालय, बऱ्हा (९) दारापूर हायस्कूल, दारापूर (१०) जी.आर.सि.एस. इंग्लिश प्राय. स्कूल, तिवसा (११) जी.आर.सि.एस. इंग्लिश प्राय. स्कूल, बऱ्हा

**"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा**

मा. वसंतकुमारजी मालपाणी, अध्यक्ष    मा. नंदकिशोरजी कलंत्री, सचिव

## विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा जि.यवतमाळ

संस्थेची शाळा, महाविद्यालये : (१) मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा (२) मुंगसाजी महाराज शारीरिक शिक्षण महाविद्यालय, दारव्हा (३) मुंगसाजी महाराज अध्यापक विद्यालय, दारव्हा (४) अभ्यासा इंग्लिश मिडीयम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, यवतमाळ आणि दारव्हा (५) अभ्यासा इंग्लिश मिडीयम स्कूल, बोदेगाव (६) मुंगसाजी महाराज नर्सिंग स्कूल, यवतमाळ आणि दारव्हा (७) स्वामी समर्थ नर्सिंग स्कूल, नेर (८) स्व. वसुंधराबाई घुईखेडकर नर्सिंग स्कूल, अमरावती (९) मुंगसाजी महाराज इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, नेर.

***''वेतन आयोग संघर्ष'' या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

श्री.वसंत घुईखेडकर, अध्यक्ष    डॉ. सौ. संगिता घुईखेडकर, सचिव

(७) सेवेत भरती करतांनाच शैक्षणिक पात्रतेच्या विशिष्ट अटी ठरवून देणे ही वेगळी गोष्ट आहे आणि सेवेत असणाऱ्या शेकडो प्राध्यापकांना विशिष्ट अटींच्या मागे धावायला लावणे ही वेगळी गोष्ट आहे. त्यामध्ये एम. फील. ची पदवी सुद्धा आमच्याकडे अस्तित्वात नाही? ती नव्याने काढली जाणार? त्या पदवीला भराभर ही शेकडो मंडळी बसणार? ज्ञानलालसेमुळे नव्हे तर वेतनवाढ रोखली जाणार म्हणून? हा सारा प्रकारच गहजब करणारा आहे.

हायर सेकंड क्लास एम. ए. च्या परीक्षेत नसला तर त्यांनी ही पात्रता पूर्ण करावी म्हणजे निश्चित काय करावे? Consistently good academic record चे सुद्धा तसेच आहे? आणि या साऱ्या टांगत्या तलवारी डोक्यावर घेऊन "अविचल चित्ते" शिकविण्याचे काम पार पाडावे ते सुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या; भारत सरकारच्या निर्णयाच्या व महाराष्ट्र शासनाच्या घोषणेच्या हे सारे विरोधात आहे याची जाणीव असतांना?

### *(२) वेतनश्रेणी - अटींचा तपशील*

विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्य केलेली वेतनश्रेणी पाहिजे व आयोगाने लावलेल्या अटी मात्र नकोत अशी भूमिका शिक्षकांनी कधीही घेतलेली नाही व आजही त्यांची ती भूमिका नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिलेल्या या अटी आम्ही थोर महत्त्वाच्या मानतो व त्यांची समग्रपणे अंमलबजावणी व्हावी असेच आमचे मत आहे. **यातील एखादी अट आपल्याला गैरसोईची आहे म्हणून शिक्षकांनी तिला विरोध करणे हे जसे गैर आहे तसेच त्यात नसलेल्या अटी शिक्षकांवर लादणे हे सुद्धा गैरच मानले गेले पाहिजे.**

शासकीय ठरावाच्या नियम ५ मध्ये या अटींचा उल्लेख असून ठरावाच्या परिशिष्ट ३ मध्ये त्या अटी देण्यात आल्या आहेत व त्यांची संख्या १४ आहे. (यांना आपण "**शासकीय ठरावातील अटी**" म्हणू) विद्यापीठ अनुदान आयोगाने व भारत सरकारने मान्य केलेल्या अटी भारत सरकारच्या शिक्षण सचिवांनी राज्याच्या शिक्षण सचिवांना २.११.१९७४ रोजी पाठविलेल्या पत्राच्या (F1-40/74-U-1) परिशिष्ट चार मध्ये देण्यात आलेल्या आहेत. (यांची संख्या १९ आहे त्यांना "**मूळ अटी**" असे आपण म्हणू.)

शासकीय ठरावातील १४ अटींपैकी २, ३, ८, १० आणि ११ या अटीसोडून इतर सर्व अटी मूळ तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे त्यांचा विचार न करता विसंगत असलेल्या तरतुदींचाच तेवढा विचार करू.

### (II) आणि (III)

(ii) "For future recruitment to the posts of Lecturer in Universities and Colleges the minimum qualifications shall be as may be determined by the University Grants Commission from time to time." ही मूळात ५ वी अट असून भावी भरतीसाठी ती लागू करणे कसे स्वाभाविक आहे हे सुरुवातीलाच सांगितले आहे पण "(iii) The existing lecturers in colleges who did not possess at the time of their initial recruitment minimum qualifications as prescribed by **THE UNIVERSITY GRANTS COMMISSION** should be required these qualifications within five years. If they fail to do so during this period they shall not be allowed to earn any future increment till they acquire the qualifications." ही जी शासकीय ठरावातील तिसरी अट आहे ती मुळातील (सहावी) अटीपेक्षा एकदम वेगळी अशी आहे. मुळात ही अट पुढीलप्रमाणे आहे :- "The existing lecturers in colleges who did not possess at the time of their initial recruitment minimum qualifications as prescribed **BY THE UNIVERSITY CONCERNED** should be required to attain these qualifications within five years from the date of placement in the revised scale. If they are unable to do so during the period, they shall not be allowd to earn any future increment till they have satisfied this condition." **बदल करण्यात आलेला भाग मुद्दाम ठळकपणे दिलेला आहे.** "विद्यमान प्राध्यापकांपैकी ज्यांना प्राध्यापक म्हणून विद्यापीठाची पात्रता नसेल त्यांना सुद्धा नवीन वेतनश्रेणी लागू केली जाईल मात्र त्यांनी विद्यापीठाने ठरवून दिलेली पात्रता ५ वर्षात मिळविली पाहिजे. नाहीतर त्याला पुढील वेतनवाढी दिल्या जाणार नाहीत" अशी मूळ शिफारस आहे व हीच गोष्ट महाराष्ट्र शासनाने सुद्धा धोरण म्हणून मान्य केलेली असतांना शासकीय ठराव मात्र नेमका त्याविरूद्ध गेलेला आहे.

### (VIII)

शासकीय ठरावातील आठवी अट पुढीलप्रमाणे आहे :- "(viii) **No Teacher / Principal** shall be paid any remuneration for examination work including invigilation work, within any University / Institution in the State." मूळ शिफारसीमध्ये ही अकरावी अट असून ती पुढीलप्रमाणे आहे:-

"(xi) No teacher / Principal shall be paid any remuneration for examination work, including invigilation work, within the University / Institution."

शिक्षकाला तो शिक्षक महाविद्यालयाचा असेल तर महाविद्यालयात व विद्यापीठाचा असेल तर विद्यापीठात केलेल्या परीक्षेच्या कामाचा (पर्यवेक्षण धरून) मोबदला दिला जाणार नाही अशी मूळ तरतूद आहे व ती मुख्यत्वे करून परीक्षा पद्धतीच्या सुधारणेशी संबंधित आहे. खुद्द शासकीय ठरावामध्ये ज्या सेन कमिटीच्या अहवालाच्या आधारावर विद्यापीठाने प्राध्यापकांच्या करिता आचार संहिता तयार करावी असे म्हटले आहे (परिशिष्ट ३ रे अट १४ वी) त्या सेन कमिटीने याबाबत काय म्हटलेले आहे ते पाहू :-

"The Committee is not making any recommendations with regard to the minimum remuneration a teacher may earn from examinerships as it understand that with the reform in the system of examination under active considerations of U.G.C.; this would materially change the remuneration that can be earn by teachers." (Report of the committee on Governance of University and Colleges - Part II Teachers - Para 12 (L)

### X

शासकीय ठरावातील दहावी अट पुढीलप्रमाणे आहे :- "(x) The existing post-graduate teachers in colleges, who are designated as senior Lecturers / Readers in the scale of Rs. 700-1100 shall be placed in the revised scale of Rs. 700-1600." मुळात ही अट पुढीलप्रमाणे आहे :-"(XIII) The existing post-graduate teachers in the colleges, who are designated as senior - Lecturers / Readers; in the scale of Rs. 700-1100 shall be placed in the Revised pay scales 700-1600. Separate orders will issue with regard to fixation of salary of these teachers." खाजगी महाविद्यालयातून पदव्युत्तर विभागाचे जे प्रमुख आहेत त्यांना मूळ शिफारस बदलविल्यामुळे अन्याय होणार हे उघड आहे.

### XI

शासकीय ठरावातील अकरावी अट पुढीलप्रमाणे आहे :-

**श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित**

**मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती**

***"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

श्री. हर्षवर्धनजी देशमुख, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती — डॉ. संयोगिता एस. देशमुख, प्राचार्य

समस्त कार्यकारिणी श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

चांदा शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित

**जनता महाविद्यालय, चंद्रपूर**

Affiliated to Gondwana University, Gadchiroli NAAC Accredited with 'B' Grade with 2.67 CGPA (2014-2019)

Center for Higher Learning and Research for the Department of Botany and Zoology

**अभ्यासक्रम** : वर्ग ११ वी विज्ञान, कला, वाणिज्य, बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी.

***"वेतन आयोग संघर्ष" या विषयावरील 'नुटा'द्वारा प्रकाशित विशेषांकास हार्दिक शुभेच्छा***

शुभेच्छूक : डॉ. सौ. प्रतिभा जिवतोडे, अध्यक्षा — डॉ.अशोक जिवतोडे, सचिव — डॉ. एम.सुभाष, प्राचार्य

"(XI) The assessment at Rs. 1300/- in the scale of Rs. 700-40-1100-50-1300-Assessment-50-1600, prescribed for College lecturers, shall be done by a committee to be appointed by the University." असेसमेन्ट बाबतची तरतूद १३०० च्या पगारमानानंतर मूळ शिफारसीमध्ये आहे ही गोष्ट खरी आहे. असेसमेन्टच्या या तरतुदींमुळे वशिलेबाजीला उत येईल व त्यामुळे ही तरतूद रद्द करावी अशी मागणी अखिल भारतीय प्राध्यापक संघाने (AIFUCTO) केलेली आहे. शासकीय ठरावाने तर आता आणखी दर तीन वर्षांनी "असेसमेंट" लागू केलेले आहे. त्यामुळे या दोनही बाबी रद्द करण्यात याव्यात अशी आमची विनंती आहे. १३०० च्या पगार मानानंतर असेसमेन्टची तरतूद विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मूळ शिफारशीमध्येच आहे व त्यामुळे ती काढून टाकावी असे म्हणण्याचा प्राध्यापकांना अधिकार नाही असे म्हटले जाते व जो पर्यंत मूळ शिफारसीमध्ये बदल होत नाही तोवर महाराष्ट्र शासनाला तशी विनंती करणे योग्य नाही असेच आम्हालाही वाटते. पण त्याच युक्तिवादाच्या आधारावर दर तीन वर्षांनी जे असेसमेन्ट शासकीय ठरावाच्या नियम १३ मध्ये टाकले त्याला तीव्र विरोध नमूद करणे सुद्धा आवश्यक ठरते.

**(३) वार्षिक वेतनवाढ**

पुढची वार्षिक वेतनवाढ केव्हा मिळेल या संबंधीचा भाग शासकीय ठरावाच्या नियम ४ मध्ये सांगितला आहे. याबाबतची मूळ शिफारस ही शासकीय ठरावाच्या परिशिष्ट १ मध्ये देण्यात (Para II) आलेली आहे. त्यामुळे पुढची वेतनवाढ केव्हा मिळेल याबाबतचे दोन वेगवेगळे नियम या शासकीय ठरावामध्ये नमूद असलेले आढळतात. ते परस्पर विरोधी आहेत. तेव्हा याबाबतीत नियम चार गाळून वार्षिक वेतनवाढीसंबंधीच्या मूळ शिफारशी मधील उल्लेख कायम ठेवावा.

**(४) डेमॉन्स्ट्रेटर-ट्युटर**

वस्तुतः डेमॉन्स्ट्रेटर व ट्युटर यांची पात्रता व अधिव्याख्यात्याची पात्रता बहुतेक ठिकाणी सारखीच असल्यामुळे व त्यांचे काम ही सारखेच असल्यामुळे ही पदे समाप्त केली जावीत. त्या पदधारकांची पदोन्नती करावी, अशी गेल्या अनेक दिवसापासूनची मागणी होती. **सेन कमिटीने, विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यातील न्याय्यता लक्षात घेऊन ही मागणी मान्य केली. भारत सरकारनेसुद्धा तीला मान्यता दिली.** महाराष्ट्र शासनाच्या वतीने ४ एप्रिलला जे निवेदन विधानसभेत माननीय शिक्षणमंत्र्यांनी केले त्यांत सुद्धा :- "**जे प्रयोग निर्देशक-पाठ निर्देशक अधिव्याख्यात्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा विद्यापीठाने ठरविलेली अर्हता धारण करीत असतील त्यांची पदे उन्नत करून त्यांना अधिव्याख्यात्यासाठी स्वीकारलेली वेतनश्रेणी देण्यात येईल**" असे स्पष्टपणे म्हटलेले आहे. खुद्द सेन कमिटीच्या रिपोर्टमध्ये सुद्धा "The Committee further feels that there is no need for tutors and demonstrators in universities and colleges, for the existing incumbents the scale should be revised to Rs. 300-600." असे म्हटलेले आहे.

यावरून डेमान्स्ट्रेटर्स व ट्युटर्सना १-१-७३ पासून नवीन वेतनश्रेणी लागू केली जावी ही गोष्ट न्याय्य आहे, हेच लक्षात येते. चर्चेच्या सुरुवातीला ही पदे संपुष्टात आणण्याचे माननीय शिक्षणमंत्र्यांनी मान्य केलेले असतांना चर्चेच्या शेवटी एका ज्येष्ठ अधिकाऱ्यानी तसे ठरलेच नाही असे म्हणून प्राध्यापकांच्या शिष्टमंडळाला जबरदस्त धक्का दिला होता, या गोष्टीची आठवण या वेळी झाल्याशिवाय रहात नाही. ठरावाचा मसुदा तयार करतांना डेमॉन्स्ट्रेटर्स व ट्युटर्स विषयीचा अकारण राग ठरावाच्या नियम १४ मध्ये भरपूर आलेला आहे. (१) "७५-७६ पासून ही पदोन्नती धरावी" व (२) "त्यांना दोन वर्षे लेक्चरर म्हणून प्रोबेशनवर ठेवावे" या दोन अटी म्हणजे या रागाच्याच प्रतिक होत. ८-१० वर्षे ज्यांनी डेमॉन्स्ट्रेटर (शिक्षक) म्हणून काम केलेले आहे तो शिक्षकाचेच (लेक्चरर) काम करीत होता हे तत्वतः मान्य करून ते पद संपुष्टात आणावयाचे व पुन्हा शिक्षक म्हणून त्याला दोन वर्षे "प्रोबेशन" वर ठेवावयाचे ही गोष्ट योग्य नव्हे असेच कुणीही म्हणेल.

**(५) धनादेशाने पगार**

देशातील अनेक राज्यांनी महाविद्यालयीन शिक्षकांचे पगार कोषागारामार्फत देण्याची व्यवस्था लागू केलेली आहे. उत्तरप्रदेशाने याबाबत घेतलेला पुढाकार सर्वश्रुत आहे, आपल्या राज्यामध्ये सुद्धा माध्यमिक शिक्षकांना अशा रितीने पगार दिला जातो. आम्हाला सुद्धा ही व्यवस्था लागू करावी अशी महाविद्यालयीन शिक्षकांची मागणी होती. पण अनेक व्यावहारिक अडचणीमुळे शासनाला ते शक्य झाले नाही व शासनातर्फे त्या मागणीला स्पष्टपणे नकार देण्यात आला. तरी महाराष्ट्र शासनाने एक महत्त्वाचा निर्णय घोषित करून एक पाऊल निश्चितपणे पुढे टाकले. तो निर्णय पुढीलप्रमाणे होता :- "काही प्राध्यापकांना पगार मिळण्याबाबत तक्रारी शासनाकडे आलेल्या आहेत. यासंबंधी प्राध्यापकांची मागणी अशी आहे की, त्यांना शासकीय कोषागारामार्फत पगार मिळावा नियमाप्रमाणे देत असलेला पगार सेवकांना मिळाला पाहिजे असे शासनास वाटते. **चालकाद्वारा शिक्षकांना चेकने वेतन मिळावे हे शासनाने तत्वतः मान्य केलेले आहे.**" (शिक्षणमंत्र्यांच्या दिनांक ४ एप्रिल १९७५ च्या निवेदनातून पॅरा २)

**(६) सुट्यांचा प्रश्न**

दर वर्षाला सहा आठवड्या इतकी सुटी प्राध्यापकाला मिळावी असे शासकीय ठरावामध्ये म्हटलेले आहे. आम्हाला हे अगदी सुरुवातीलाच स्पष्ट केले पाहिजे की, सुट्या मिळविणे हा काही कुणाचा अधिकार असू शकत नाही पण याबाबतचा निर्णय या ठरावामध्ये नमूद करीत असतांना या प्रश्नाचा सर्व बाजूंनी विचार न होता हा निर्णय घेण्यात आलेला आहे. (१) या सुट्यांच्या प्रश्नाबाबत ज्याने त्याने आपआपल्या सोईला येईल ते मांडत सुटावे ही गोष्ट योग्य नाही असे आम्हाला वाटते. राष्ट्रीय पातळीवर या प्रश्नाचा तपशीलवार, सांगोपांग व निश्चित स्वरुपाचा विचार झालेला आहे कुणाच्याही एकांगी विचारापेक्षा या विचाराला जास्त प्राधान्य असावे असे आम्हाला वाटते, कोठारी कमिशनच्या अहवालामध्ये याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे दिलेला आहे :-

(2) "for the college and Universities, the time-table will be some what on the following lines;

July 15 to November 30 - first working term.

December 1 to December 15 - first vacation term (2 weeks)

December 16 to April 30 - Second working term.

(Examination to begin after April 1 & to be finished by April 30)

May 1 - July 14 - Second Vacation term (10 weeks." असे नमूद करून अहवालात पुढे म्हटले आहे. "We realise that, with the large variation in climate, the school calendar will have to vary from area to area. But whatever the calender adopted, it should be ensured that the minimum number of instructional days should not be less than 234 a year for colleges." (Para 2.36 and 2.37 of the education commission Report 1964-66)

सुट्यांचा उपयोग कसा व्हावा याचेही तपशीलवार विवेचन तेथे देण्यात आलेले आहे. तेव्हा शासकीय ठरावातील ८ वा नियम बाजूला सारून त्याबाबतचे तपशील स्टॅट्युट करून ठरविण्याचे काम विद्यापीठाकडे सोपवावे अशी आम्ही विनंती करतो. या प्रश्नाच्या बाबतीत कितीतरी मुद्दे उपस्थित होतात. (हवामानापासून तर उन्हाळ्यात विविध महाविद्यालयांमध्ये उपलब्ध नसलेल्या पाणी पिण्याच्या सोईपर्यंत) या सर्व बाबींचा तपशीलवार विचार होऊनच निर्णय पक्का व्हावा या हेतूने हे विचार मांडले आहे.

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 05.11.2019) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.11.2019**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,.........................................................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................